साप्ताहिक
# माणूस
शनिवार । ४ ऑक्टोबर १९७५ । एक रुपया



साठच दिवसांनी जर्मन विमानांनी अचानक बाँबफेक करून ' हाउस ऑफ कॉमन्स 'ची नासधूस केली ! त्या बाँबफेकीनंतर चर्चिलने त्या उध्वस्त सभागृहाला भेट दिली, तेव्हा ते सभागृह ठिकठिकाणी धुमसत होते. अनेक ठिकाणी त्याची पडझड झाली होती.

चर्चिलने त्या उद्ध्वस्त वास्तूवरून नजर फिरवली. तो उभे राहून भाषणे देत असे ती जागा, सभासदांच्या वसण्याच्या जागा, प्रेक्षकांची गॅलरी यांचे ध्वस्त अवशेष पाहताना तो उदास झाला.....

आपल्या हातातील काठी आपटीत तो त्या सभागृहात हिंडत राहिला.....

त्यानंतर आपल्या सचिवाकडे वळून तो म्हणाला, " हे सभागृह पूर्वी जसे होते तसेच पुन्हा नव्याने बांधून काढा....

**पण सभागृहाचे कामकाज सुरू राहिलंच पाहिजे....**

ब्रिटनची लोकशाही परंपरा फॅसिझमविरोधी युद्धकाळातही खंडित होऊ नये यासाठी चर्चिल यांचा केवढा हा अट्टाहास ! लोकशाहीची निर्जीव, दगडी प्रतीकेही त्यांना जतन करावीशी वाटली....हिटलरशी प्रत्यक्ष टक्कर देतानाही !

---

**चर्चिल जन्मशताब्दी**
**सध्या इंग्लंडमध्ये चालू आहे.**
**त्यानिमित्त खास पुस्तक पुरवणी....**

---

# सूर्याला न्याहाळणारा गरूड

## साप्ताहिक माणूस

**वर्ष पंधरावे – अंक : अठरावा**

**४ ऑक्टोबर १९७५**

**मूल्य : एक रुपया**

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤

# मुक्काम पुणे

**प्रकाश जोशी**

## एक छानदार प्रकाशन समारंभ

☐ सोप्या सरळ भाषेत लिहिणे अवघडच. एखादा अवघड विषय सोपा करून सुंदर सरळ भाषेत लिहिणे भल्याभल्यांना अशक्य होते.

चार इयत्ता शिकलेला वाचकवर्ग निवडून सर्वसामान्यांना सोप्या भाषेतील पुस्तकं पुरवून लेखनवाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी सुरू केलेल्या समाजशिक्षण मालेने ३०० वे पुस्तक प्रकाशित करून रौप्य-महोत्सव साजरा केला. त्य निमित्त घरगुती समारंभ डॉ. सरोजिनी बाबर यांच्या घरीच, साधेपणानं साजरा करण्यात आला. अध्यक्ष-स्थानी होते म. म. द. वा. पोतदार. पंचवीस वर्षापूर्वी इस्लामपूर येथे शिक्षकीपेशातून निवृत्त होताना कृ. भा. बाबर यांनी लोक-शिक्षणाचे ध्येय उराशी बाळगून ज्या समा-रंभात लोकसमाजशिक्षणमालेचा संकल्प सोडला त्याचे अध्यक्षस्थानही पोतदारांकडेच होते !

समाजशिक्षणमालेच्या रूपाने बाबर-कुटुंबियांनी ज्ञानाचे अन्नछत्र उघडले आहे. तेथे सर्व तृप्त होवोत अशी इच्छा पोतदारांनी त्या वेळी व्यक्त केली. निरक्षर समाज म्हणजे अडाणी समाज ही कल्पना बरोबर नाही. अण्णांनी (कृ. भा. बाबर) ते बरोबर जाणले. जुने-नवे शिक्षण नाही ती ज्या भाषेत बोलतात ती खरी भाषा. लक्ष्मीबाई टिळकांनी सांगितले, दत्तोपंत टिळकांनी ते लिहून घेतले. ते मराठीतील उत्तम पुस्तक झाले.

मालेच्या संपादिका डॉ. सरोजिनी बाबर यांच्याकडे मी गेलो त्या वेळी त्या पावत्या समोर मांडून हिशोब लिहिण्यात गर्क होत्या. आजूबाजूची सर्व कपाटं पुस्तकांनी भरलेली. शेजारीच 'मी कोण आहे' या नुकत्याच प्रकाशित केलेल्या पुस्तिकांचे पाठविण्यासाठी बांधून ठेवलेले गठ्ठे.

'काय झालंय, समारंभाच्या तयारीत अनेक कामं राहून गेलीत. ती पूर्ण करतेय्. थोडा हिशोब लिहायचा राहिलाय्. काम करताकरता बोलू आपण.'

मी 'हरकत नाही म्हटलं' तरी माझा थोडासा गोंधळ झालेला त्यांच्या लक्षात आला असावा.

'मालेचं सगळं काम आम्ही घरीच करतो. लेखकांना भेटणं, मजकुराचं संपादन करणं, वाचक मिळवावे लागतात. सध्या खर्च वाढ-लाय. त्यामुळे जाहिराती मिळविणं आलंय्. पत्रं लिहायची असतात. हिशोब व्यवस्थित ठेवावे लागतात. हे मालेचं काम म्हणजे आमचा छंदच म्हणा ना!

सोपं लिहिणारे लेखक मिळत नाहीत ही त्यांची तक्रार. अर्थात त्यासाठी दर महिन्याच्या वीस तारखेला प्रसिद्ध होणारी मालेतील पुस्तकं कधीच अडली नाहीत. कारण सुरु-वातीस कोणी मिळालं नाही तर स्वतः लिहून मोकळं व्हायचं; पण मालेत खंड पडू द्यायचा नाही असं धोरण.

सोप्या भाषेविषयी मी अतिशय आग्रही असते. काही वेळा मी अण्णांनी लिहिलेलं सुद्धा नापसंत केलं आहे. माझं स्वतःचं लिखाण जरी अवघड झालं आहे असं वाटू लागलं तरी मी ते परत लिहिते किंवा दुसरा विषय निवडते. ना. सी. फडके सुद्धा म्हणताहेत लिहीन म्हणून पण अजून झालेलं नाहीच. कोणीही लिहिलं तरी आम्ही आमचे निकष लावतो व मगच प्रसिद्ध करायचे की नाही ते ठरवितो.

: मालेपुढे ठराविक वाचकवर्ग आहे काय ?

ठराविक वाचकवर्ग असा नाही; परंतु मालेतील पुस्तकं, थोडंफार शिकलेल्यांपासून पदवीधरांपर्यंत आवडीनं वाचली जातात. आमच्या वाचकांत स्त्रीवर्ग मोठाआहे.

विषयांची विविधता हे आणखी एक वैशिष्ट्य. ते सातत्यानं जोपासण्याचा आमचा नेहमीच प्रयत्न असतो. बदलती परिस्थिती

'इस्लामिक संस्कृती परिचय' या लेखमालेतील पाचवा लेखांक जागेअभावी या अंकात प्रसिद्ध झाला नाही. तो पुढील अंकात प्रसिद्ध होईल, —संपादक

व आज सामान्य वाचकाला कशाची गरज आहे हे लक्षात घेऊन आम्ही विषय निवडतो. त्यामुळे अणुशक्ती, समाजाचे बदलते स्वरूप, गीतेची थोडी समजूत असे विविध विषय मालेत हाताळले आहेत.

सर्वसामान्यांसाठी चालविलेल्या या मालेचं महत्त्व अजून समाजाला पटलेलं दिसत नाही; पण लवकरच पटेल. अशा प्रकारे चालविलेला भारतातील हा एकमेव प्रयत्न आहे. सध्या समाजशिक्षणमालेचा सामाजिक ट्रस्ट केला असून हा उपक्रम सातत्याने पुढे चालू ठेवण्याचा आमचा निर्धार आहे.

: सध्या इतर विशेष लेखन ?

: दिवाळी अंक. अनेकांची पत्रं येतात, 'आमच्यासाठी लिहा!' नाही म्हणवत नाही. जमेल तेवढं लिहिते. लिहायला फारसा वेळही मिळत नाही. दुपारी १२ ते ४ ही माझी लिहिण्याची वेळ. कारण त्या वेळी मला भेटायला येणारे लोकही कमी असतात. रात्री लवकर झोपण्याची सवय त्यामुळे रात्री काही लिहून होत नाही. कादंबरी लिहायला घेतलीय; पण पूर्ण झालेली नाही.

: लोकगीतांच्या संकलनाचे काम कोठपर्यंत आलंय ?

: खरं सांगू का? सध्या थोडं दुर्लक्ष झालंय; पण काम चालू आहे. नुकताच एक दौरा पूर्ण करून आले. लोकांना वाटतं काय लोकगीत लोकसाहित्य वगैरे; पण कोणी तरी करायलाच पाहिजे नाही का? नाही तर ज्यांच्याजवळ ही ठेव आहे ती त्यांच्या-बरोबरच नाहीशी होईल. ती जपायला हवी!

परवाच एक ८० वर्षांच्या आजीबाई भेटल्या. त्यांच्याकडे परत जायचं आहे. खूप चांगली—चांगली गीतं त्यांच्याकडे मिळतील. आजीबाईंचं व्यक्तिमत्त्वही खूप आकर्षक आहे. त्यांचं एक शब्दचित्र लिहिण्याचा विचार आहे. ◻

## झोपड्या हालल्या

◻ 'स्वच्छ व सुंदर' पुण्याच्या महानगर-पालिकेच्या इमारतीजवळच लागून असलेली झोपडपट्टी हलविण्यात आली आहे. झोपड-पट्ट्या शहराला गालबोट आहेत. त्या हल-विल्या पाहिजेत; पण झोपडपट्ट्या हलवून प्रश्न सुटणार का? त्यांनी जायचे कोठे? आहे तेथेच सुधारणा हवी. असे अनेक वाद-विवाद अनेक दिवसांपासून चालू आहेत. अनेक समित्या झाल्या. अनेक समित्यांचे अनेक दौरे झाले. अनेक उपाययोजना सुचवून झाल्या; पण हा प्रश्नच अतिशय किचकट व गुंतागुंतीचा. कारण झोपडपट्टी ही काहींना शाप तर काहींना वरदान! अनेक व्हेस्टेड इंटरेस्टमुळं या प्रश्नाचा गुंता वाढून तो सुटण्याऐवजी चिघळतच गेलेला.

या वेळेस पालिका-अधिकाऱ्यांनी आणि नगरसेवक— समितीनं ठरविलं की झोपड-पट्टी हलवायची आणि त्याप्रमाणे महापालिके-जवळील झोपडपट्टी, शिवाजीनगर-गुदामा-जवळील, स्वारगेट जकातनाका, मालधक्का अशा तीन-चार ठिकाणच्या झोपडपट्ट्या आता पूर्णपणे उठल्या आहेत. झोपडपट्टी हलविण्यास परवानगी द्या अशी मागणी काही ठिकाणी करण्यात आली; पण हा निर्णय पालिकेने दोन महिन्यांपूर्वी घेऊन तशा सूचनाही त्याच वेळी दिलेल्या असल्याने आता सवलती वगैरे मिळणार नाहीत असे पालिका-अधिकाऱ्यांनी ठामपणे सांगितल्याने झोपडवासीयांचा नाइलाज झाला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या वेळी त्यांच्या बाजूने एकही जनसेवक उभा राहिला नाही! झोपडपट्ट्या काढण्यासाठी सहकार्य देण्याचे आवाहन पोलिसांनी केल्यानंतर झोपडपट्टीवासीयांनी पूर्ण सहकार्य दिले. स्वतःचे सामान त्यांनी स्वतःच बाहेर काढले.

या सर्वांना येरवडा भागात पर्यायी मोकळी जागा देण्यात आली. तिथे पोहोचण्यात एकच घाई; पण नुसत्या जागेने काम भागते? तिथं ना पाणी ना लाइट!

या झोपडपट्ट्या हलविण्यापूर्वीच खरं तर ती सोय पालिकेने करायला हवी होती; पण झोपडपट्टीवासीय तिथे पोचल्यावर पाणी, वीज व संडास यांची सोय करण्याचं काम पालिकेने हाती घेतले.

या सर्वांत भर पडली पावसाची. तोही मुसळधार! त्यामुळं झोपड्या उभारण्याचं काम पावसातच कसंबसं उरकावं लागलं. ◻


# पॅपिलॉन योजना

**पॅपिलॉन**
रवींद्र गुर्जर

**हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा**
अशोक परळीकर

**देवाघरचा पाऊस**
रवींद्र पिंगे

**संचित**
सुमती देवस्थळे

सिनेकलावंतांची व्यक्तिचित्रे (?)

*योजनेचे स्वरूप*

या योजनेत दरमहा एक पुस्तक याप्रमाणे एकूण पाच पुस्तके प्रकाशित होतील. आज नोंदणीशुल्क दहा रुपये भरून पॅपिलॉन पुस्तकयोजनेत सहभागी होणाऱ्या व्यक्तीस मात्र यातील प्रत्येक पुस्तक दरमहा फक्त पाच रुपयात मिळू शकेल.

*इतर माहिती*

पूर्वसूचना मिळाल्यावर ग्राहकाने विशिष्ट मुदतीत पाच रुपये भरून आपले पुस्तक कार्यालयातून घेऊन जावे किंवा ५ रुपये + टपाल—पाठवणीखर्च इतक्या रकमेची त्याला व्ही. पी. केली जाईल. ती त्याने सोडवून घ्यावी.

पैसे शक्यतो मनीऑर्डरने पाठवावेत. चेक असल्यास वटणावळ २ रुपये अधिक पाठवावी. चेक, ड्राफ्ट, म. ऑर्डर राजहंस प्रकाशन या नावे पाठवावी. सोबत नाव, पत्ता संपूर्ण असावा.

**सुमारे ७५ ते १०० रुपयांची ५ पुस्तके फक्त ३५ रुपयांत.**

# मोठ्ठं बक्षिस जिंका

## एक लाख रुपये तुमचे होऊ शकतील

रु. 200 किंवा त्यापेक्षा जास्तच रक्कम भरून 6 ऑक्टोबर 1975 पर्यंत टपालकचेरी बचतबँकेत खाते उघडा. तुम्ही बक्षिसाची वाट पाहत असतानाच, तुमच्या खात्यातील शिलकीवर तुम्हाला वर्षाकाठी 5% प्राप्तिकरमुक्त व्याजहि मिळेल. या खात्यात तुम्हाला पैसे काढण्या-भरण्याचे व्यवहारहि करता येतील. अट एवढीच की 31 मार्च 1976 पर्यंत शिलकी रक्कम 200 रुपयां-पेक्षा कमी होऊ द्यायची नाही. त्यामुळे जुलै 1976 मधील सोडतीत तुम्हाला भाग घेता येईल. तुम्हाला निरनिराळ्या टपालकचेऱ्यांत तुमच्या स्वतःच्या, तसेच, तुमच्या कुटुंबातील प्रत्येकाच्या नावावर एकापेक्षा जास्त खातीहि उघडता येतील. अगदी लहान मुलांच्या नावे सुद्धा!

11,116 बक्षिसें, एकूण रक्कम 20 लाख 50 हजार रुपये

- वर्षाकांठी दोन सोडती बक्षिसे

रु.

एक पहिले बक्षिस 1,00,000

पाच दुसरी बक्षिसे 50,000 प्रत्येकी

दहा तिसरी बक्षिसे 20,000 प्रत्येकी

शंभर चौथी बक्षिसे 5,000 प्रत्येकी

एक हजार पांचवी बक्षिसे 500 प्रत्येकी

दहा हजार सहावी बक्षिसे 50 प्रत्येकी

### महत्त्वाची सूचना

तुम्हाला जुलै 1976 च्या सोडतीत बक्षिस मिळाले नाही तरीहि इतकें मात्र लक्ष्यांत ठेवा, की, तुमची शिल्लक 200 रूपये किंवा त्याहून जास्त असेल तर पुढल्या सर्वच सोडतीत बक्षिस मिळण्याची तरी आशा बाळगता येईल.

## त्वरा करा. तुमचे खाते आजच उघडा.

राष्ट्रीय बचत संघटना
टपाल पेटी क्रमांक 96
नागपूर

davp 75/176

मुक्काम : मुंबई

## नारायण पेडणेकरकृत

# शब्दस्फोट

**गाण्यासह टिपलेला पक्षी**
**रक्ताच्या थारोळ्यात**
**पक्षी–रक्ताच्या थारोळ्यात**
**गाणे–रक्ताच्या थारोळ्यात**

–नारायण पेडणेकर

कोणतं गाणं ? कोणता पक्षी ? कसलं रक्ताचं थारोळं ? असले प्रश्न विचारून ही कविता सहज कुत्सितपणे उडवून लावता येईल; पण गाण्याविषयी, ते गाणाऱ्या पक्ष्याविषयी अमाप प्रेम असलेल्या माणसांना हे जरा कठीणच जाईल.

'कस्तुरीमृग' या नारायण पेडणेकरांच्या काव्यसंग्रहाच्या दुसऱ्या प्रकाशनसमारंभाला या जातीची माणसं मोठ्या संख्येनं उपस्थित होती. अर्थात याखेरीज पत्रकारमंडळीही होतीच. दादरच्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात हा समारंभ आयोजित करण्यात आला होता. अलीकडेच लोकप्रिय होत असलेला 'शब्दस्फोट' नावाचा प्रकारही ( पत्रकारांच्या भाषेत स्टंट ) या वेळी पेडणेकरांनी घडवून आणला.

हा शब्दस्फोट म्हणजे काय ?

तो घडवून आणण्यामागं हेतू कोणता ? हे कवी नारायण पेडणेकरांच्या तोंडूनच ऐकू या; पण त्याआधी प्राध्यापक मे. पु. रेगे यांचं समारंभानिमित्तचं हे प्रास्ताविक.

**मे. पु. रेगे :** पेडणेकर माझे मित्र आहेत. ( 'मी त्यांचा शिष्य आहे–' इति पेडणेकर) खरं आहे. ते माझे शिष्य होते, तेव्हा थोडं शत्रुत्व होतं. आता ते माझे मित्रच आहेत. मी थोड्याश्या प्रसंगी सत्य बोलतो. तेव्हा आजही खरं बोलणार आहे. म्हणजे मला काव्यातलं फारसं समजतं असं नाही. पेडणेकरांनी मला दिलेलं 'कस्तुरीमृग' पुस्तक हरवलं. म्हणजे मी ते जाणूनबुजून हरवलं असं नाही. माझी पुस्तकं लावण्याचं काम माझ्या पत्नीचं. पेडणेकरांचं पुस्तक असंच कुठं तरी माझ्या पुस्तकांच्या गर्दीत हरवलं असेल. चार-सहा महिन्यांनी मिळेलच तिला ते ! तशा मी वाचल्या आहेत ह्या कविता. तेव्हा थोडंसं बोलेनच नंतर. ( नारायण पेडणेकरांकडे वळून ) आता त्यांनी शब्दस्फोटामागची भूमिका स्पष्ट करावी असं मला वाटतं.

**नारायण पेडणेकर :** ( अर्थात् स्फोटकपणे ) आज मी अंधार भोगतोय. हा अंधार व्यक्तिगत नाही. या अंधाराला वाचा फोडावी म्हणून शब्दांचं हे माध्यम वापरण्याचं मी ठरवलं. शब्दांबरोबर रेघोट्याही आल्या. मी न-चित्रकार आहे. माझी न चित्रं आणि कविता यातून माझा 'शब्दस्फोट' जन्मास आला. मूळ सूत्र आहे अंधार. ज्याला सुख म्हणतात ते मला मिळालं आहे. म्हणजे नोकरी. लग्न वगैरे; पण सुखाची कल्पना एवढ्यावरच मर्यादित नाही. म्हणूनच शब्दस्फोट करण्याचं साहस मी करीत आहे. शब्दाचं सामर्थ्य कोणतं ? शब्द बापुडे केवळ वारा ! हे तुम्ही ऐकलेच असेल, पण जनतेत गेल्यावर शब्दांचे वैय्यर्थ सिद्ध होते. आज शब्द मुके झाले आहेत. आज आपण भोगीत आहोत अंधार ! म्हणून हा शब्दस्फोट ! ( हॉलवर सर्वत्र लावलेल्या कापडी फलकांवरल्या कवितांपैकी 'पक्षी' ही कविता प्रचंड स्फोटक पद्धतीनं वाचून दाखवतात. त्यापाठोपाठ 'गांधारी' ही दुसरी एक कविता वाचतात )...जाणिवांचा क्षीण का होईना आविष्कार व्हावा हे शब्दस्फोटामागचे प्रयोजन. याची परिणामकता तुम्ही जाणायची. मी केवळ शब्दस्फोट घडवतो.

( खालच्या पट्टीत ) दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन मुद्दाम होऊन कोणी करीत नाही. तरी साहित्यातली ही ज्युडीशियरी मी बोलाविली आहे. ( शिरीष पै, मे. पु. रेगे, केशव मेश्राम, प्रा. चंपा लिमये इ. ) मात्र त्यांच्यावर माझं कोणतंच बंधन नाही...' प्रा. रेग्यांनी आता अध्यक्षीय सूत्रं हाती घ्यावीत.

**मे. पु. रेगे :** मी सूत्रं पूर्वीच हातात घेतली आहेत. मधून मधून कुणा दुसऱ्याच्या हातात ती मी देणार नाही. कार्यक्रम संपेपर्यंत ती माझ्याच हाती राहतील. ( शिरीषबाईंना प्रकाशन करण्याची विनंती करतात.)

**सौ. शिरीष पै :** ( प्रकाशन झाल्याचं जाहीर करून ) शब्दस्फोट हा तुमच्या हृदयात झाला पाहिजे असं जे पेडणेकर म्हणतात ते खरे आहे. माझ्या वडिलांनी ज्याला मायकोव्हस्की म्हणून आशीर्वाद दिलेत त्यांच्याविषयी मी अधिक काय बोलणार?...

नारायण पेडणेकरांची ही कविता परंपरेला झुगारून देणारी कविता आहे. मी मात्र अय्या ! इश्श ! आदी शब्दांच्या जगात वावरते आहे. नागडी-उघडी अभिव्यक्ती मला जमणार नाही म्हणून पेडणेकरांच्या कवितेतलं सर्वच काही मला समजलं आहे असं मी म्हणू शकणार नाही. तरी सुद्धा मी असं म्हणू शकते की तीव्र वेदना या कवितेत आहेत. माणूस तीव्र वेदना घेऊन जन्माला येतो; पण कवीला शब्द सापडतो. वेदनेच्या मुळाशी जाण्याचा पेडणेकर प्रयत्न करतात. पूर्णता लाभत नाही ही त्यांची पहिली वेदना आहे. ही आध्यात्मिक वेदना आहे. वैयक्तिक व सामाजिक वेदनेलाही पेडणेकरांनी आपल्या काव्यात जागवलं आहे. 'बाप एक मेला' या कवितेत पेडणेकरांनी जिवंत वासनेचं एक भयंकर चित्र रेखाटलं आहे. ते लिहितात––

बाप एक मेला
तर खूप पोरं होती रडायला
छातीच केवळ
पोट पिटू न शकणारी
पोटुशी बाईल...

या शब्दांतून अस्ताव्यस्त विस्तारणाऱ्या समाजाचं षंढपणच पेडणेकरांना व्यथित करत आहे. तीव्र वेदनेपोटी पेडणेकरांच्या कवितेत प्रक्षोभही दिसून येतो... आशीर्वादाऐवजी मी त्यांना शापच देते. त्यांचे हे दुःख, ही वेदना अशीच राहू दे. नाही तर ही शब्दशक्ती संपेल.

**प्रा. सौ. चंपा लिमये–** दहा वर्षांपूर्वी या संग्रहाची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली. म्हणजे आज कवीचं मन प्रगल्भ झाल्याचं दिसेल. असं प्रगल्भ मन 'माझ्या मना बन दगड' ही शिकवण मानणार नाही. कवीचं मन सतत जागृत असायला हवं. परिस्थितीचे पिंजरे कसेही असोत... मनात खरी बोच असेल तर कलावंत काही तरी करील. कलावंताचं हे कार्य पेडणेकरांनी चांगल्या प्रकारे केलं आहे. पेडणेकरांच्या कवितेला अनुभूतीची

खोल बैठक लाभलेली आहे. ती अभ्यासिकेत उबवलेली कविता नाही. पेडणेकरांनी स्वत: दु:ख अनुभवलं आहे.

दिवसेंदिवस मूल्यांचा ऱ्हास होत आहे. पेडणेकरांना यानं वेदना होते. त्यांच्या अनेक कवितांतून याचा प्रत्यय येईल. 'कुणाची बाई कुणाशेजारी' हे जिथं कळत नाही तिथं मर्क्युरी दिव्यांचा धुरकट प्रकाश पेंगत आहे' किंवा– 'नीतीचे रेशनिंग झाले रांगा धरती पापे घोर' या ओळी कुणीही वाचून पहाव्यात.

पेडणेकरांच्या कवितेतले काही शब्द मला अश्लील वाटतात आणि काही कविता तर दुर्बोधच आहेत. उदा–

काजळ डिखाळ ओठ ओल
बुबुळदाट भुखाळ ओल
नुभट मुकाळ ओढ सखोल
खोलच खोल ओढ ऽ ओल...

मला तरी या कवितेचा अर्थ उकललेला नाही. पण पूर्वसूत्र, कस्तुरीमृग यांसारख्या कविता तुम्ही मुळातूनच वाचा.

**प्रा. केशव मेश्राम–** हा संग्रह १९६५ साली प्रसिद्ध झाला. १९६२ ते ६५ हा काळ मराठी काव्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. या काळात वसंत बापट, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, वा. रा. कांत वगैरे स्थिर झालेले होते. दिलीप चित्रे, नारायण सुर्वे, आरती प्रभु हे कवी मोठ्या प्रमाणावर लिहीत होते आणि ना. धो. महानोर आणि ग्रेस हे कवी झपाट्यानं पुढे येत होते. या पार्श्वभूमीवर नारायण पेडणेकर वेगळं लिहितात हे मला जाणवलं होतं. पेडणेकर हे आवाहन करतात. सुर्व्यांप्रमाणे गर्दीत वावरणारा गर्दीची दु:खे वाहणारा हा कवी आहे. शब्द वाकवण्याची स्वत:ची अशी त्याची शक्ती आहे. शब्दांच्या बाह्य नादाचा ते उपयोग करतात. सतत जनसंवाद साधणाऱ्या या कवीला हे अपरिहार्य वाटते.

एखाद्या समस्येला आध्यात्मिकतेची डूब देऊन सौम्यपणा आणता येतो व इतरांचा आवाज बंद करता येतो; पण पेडणेकरांनी मात्र जे जाणवलं तेच मांडलं आहे.

शब्दांची एकाग्र करण्याची शक्ती असते. अन् कवी शब्द जागवतात. हे शब्द स्पर्शून जातात. रसिक मग शब्दांच्या पलीकडे जातो...

चांगली कविता सरळ भिडते 'मे आय कम् इन सर?' असं तिला विचारावं लागत नाही. आज जमलेला रसिकवर्ग म्हणजे पेडणेकर रसिकस्वी आहेत याचा पुरावाच आहे. एक साहित्यिक अनेक शत्रू निर्माण करू शकतो; पण पेडणेकरांनी एवढे मित्र निर्माण केल्यामुळे त्यांचा पहिला संग्रह संपला आहे.

**प्रा. मे. पु. रेगे–** (अध्यक्षीय भाषण) मी चांगल्या कविता चुकून वाचतो. कुणी सांगितलं तर मुद्दाम वाचतो. नाही तर जाऊ द्या म्हणतो. खरं तर भारतात श्रोत्यांसाठी कविता हवी. वाचता येईल असे फारच थोडे लोक आपल्या समाजात आहेत. पंडितांनी आम्हाला कविता समजून घ्यायला मदत करावी आणि मग सामान्य वाचकाला आणि कवितेला मोकळे सोडून द्यावे.

आता पेडणेकरांच्या कवितेबद्दल बोलायचं तर त्यात धक्कादायक, नीतिभ्रष्ट करणारं असं काही आहे असं मला वाटत नाही. अत्र्यांनी मात्राभंगाची एकच चूक दाखविली. म्हणजे त्यांनी फारच प्रेम दाखवले या कवितेबद्दल.

मराठी वाचक अशा भाषेला आता दचकत नाही; पण ही भाषा कायमची आहे असेही नाही.

या कवितेत केवळ सामाजिकताच आहे असे नाही. जे दु:ख पेडणेकरांना सलते आहे ते उत्पादनवाढ वगैरेसारख्या उपायांनी दूर होईल असं म्हणता येणार नाही. या दु:खाला रागाचा, क्रोधाचा सूर आहे. या दु:खाचे मूळ माणुसकी हरवते यात आहे. ही माणुसकी कशात आहे याची पेडणेकरांना जाणीव आहे. स्फोट हा प्रथम अंत:करणात होतो मग शब्दातून. अशा अनेक शब्दस्फोटांचा गलका साहित्यक्षेत्रात होऊ दे.'

कवी नारायण पेडणेकर यांच्या प्रकाशन-समारंभाची आणि 'शब्दस्फोट' कार्यक्रमाची इथं सांगता झाली. कवी नारायण पेडणेकर हा एक भोळाभाबडा पत्रकार. यातल्या भोळ्या शब्दावर काहीजण आक्षेप घेतील पण त्याचं भाबडेपण कुणी नाकारेल असं वाटत नाही. शब्दांवर आत्यंतिक प्रेम करणारा हा माणूस. शब्दाविषयी त्याला वाटणाऱ्या जिव्हाळ्यातून-श्रद्धेतून हा 'शब्दस्फोट' प्रकार अस्तित्वात आला असावा.

'शब्दस्फोट' स्टंट आहे किंवा नाही हा वाद बाजूला ठेवला तरी त्यानं नेमकं काय साधलं या प्रश्नाला नीटसं उत्तर मिळत नाही. आज आपण अंधार भोगतोय. आपल्या जाणिवांचा आविष्कार घडावा हे शब्दस्फोटामागलं प्रयोजन असं पेडणेकर म्हणतात; पण या आविष्कारामागचं प्रयोजन ते स्पष्ट करीत नाहीत. त्यामुळं कागदावरल्या या स्फोटांना अर्थ उरत नाही. असे स्फोट तर केशवसुतांपासून आजतागायत अनेक मंडळी करीतच आहेत; पण त्यातून काही निष्पन्न झाल्याचं दिसत नाही. अंधारानं आज तर सर्वांनाच व्यापून टाकलंय. कवींची अवस्था त्याहूनही बिकट आहे. पेडणेकरांच्या कवितेतला गाण्यासह टिपलेला पक्षी ते स्वत:च आहेत-

तात्पर्य : कवींनी गाणीच गावीत आपआपल्या प्रकृतीप्रमाणे. आनंदाची, दु:खाची किंवा अंधाराची. कागदी स्फोट वगैरे करण्याच्या भानगडीत पडू नये.

पण पेडणेकर तर शब्दस्फोटांची मालिकाच सादर करण्याच्या प्रयत्नात आहेत असे कळते.

करू देत! आजच्या परिस्थितीत असे स्फोट करण्याखेरीज ते तरी दुसरं काय करणार बिचारे!

**–अवधूत परळकर**


बॉम्बे डाइंग
वितरक
डेक्कन जिमखाना, ० लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार
उबदार
फ्लॅनेल
१४ सुंदर रंगात
व
डिझाइन्समध्ये

आपली मुलं जरी जिवंत हाती लागली नाहीत, तरी निदान त्यांची प्रेतं आणि आठवणीसाठी वस्तू मिळाव्यात असं पालकांना वाटणं स्वाभाविक होतं. १६ डिसेंबरला कॅनेसा आणि पेरॅडो पर्वतमाथ्यावर दुपारी पोचले. घसरत घसरत ते पलीकडच्या तळाशी गेले. सूर्यामुळे पश्चिम दिशा समजत होती, त्या रोखानं ते पुढं जाऊ लागले. पेरॅडोची उमेद टिकून होती, पण कॅनेसा पार थकून गेला. बघता बघता ते दरीच्या टोकाला पोचले. समोरचं दृश्य पाहून त्यांचे डोळे निवले. नदीचं वाहतं पाणी आणि हिरवाच हिरवा रंग. मनुष्यवस्ती जवळ आल्यासारखं वाटू लागलं. काही गायी तिथे चरताना दिसल्या. जवळचं मांस आता कुजायला लागलं होतं. एक-दोन दिवसांत त्यांना माणसं भेटायलाच हवी होती आणि एका सकाळी प्रथमच तीन घोडेस्वार त्यांना दिसले. दोघांनाही अत्यानंद झाला. त्या दिवशी त्यांच्याशी संपर्क साधता आला नाही; पण दुसऱ्या दिवशी एकजण नदीच्या पलीकडच्या किनाऱ्यावर येऊन दोघांशी बोलू लागला. पेरॅडोनं त्याच्याकडे एक चिठ्ठी रुमालात गुंडाळून फेकली. त्यात सर्व काही स्पष्ट केलं होतं. २१ डिसेंबर. दोघेही शेतकऱ्यांच्या झोपडीत पोचले. त्यांना अन्नब्रह्माचा लाभ झाला. श्री. पेझ आणि त्यांचे इतर सहकारी मॉन्टेव्हिडिओकडे निघालेच होते; पण ही सुवार्ता समजताच त्यांना हर्षवायू झाला. आपल्या मुलांना केव्हा एकदा बघतो असं त्यांना झालं होतं. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

**मूळ लेखक : पियर्स पॉल रीड । अनुवाद : रवींद्र गुर्जर । लेखांक : दहा**



: १ :

कॅनेसा आणि पेरॅडो त्यांच्या प्रदीर्घ झोपेतून सायंकाळी सात वाजता उठले. लाकडाच्या झोपडीतून बाहेर आले. धूसर प्रकाश पडलेला होता. फूल आणि वनस्पतींचा गंध त्यांना उत्साहित करीत होता. आपण अँडीजमधून सुटल्याचा अवर्णनीय असा आनंद त्यांच्या चेहेऱ्यावर स्पष्ट दिसत होता. घाईघाईनं दोघंही आश्रयदात्या शेतकऱ्याला भेटायला निघाले. मार्गावर मऊ गवत पसरलं होतं. गालिचाच म्हणा ना. आसपास बरेच रानटी गुलाब फुलले होते. दोन मुलांचं आपापसात आजवर खूप संभाषण झालं होतं. आता त्यांना दुसऱ्या कोणाशी तरी बोलायचं होतं. निजण्यापूर्वी भरपूर खाल्लं असलं तरी पुन्हा भूक डोकं वर काढू लागली होती.

एन्‌रिक आणि आरमँडो त्यांचीच वाट पाहत होते. मुलांच्या ओशाळवाण्या चेहेऱ्यांवरून चलाख शेतकऱ्यांच्या लगेच काय ते लक्षात आलं. ताजं दूध, चीज, ब्रेड अन् कॉफी हे पदार्थ मुलांनी रिचवले.

शेकोटीजवळ बसल्यावर कॅनेसानं विचारलं, ' पोलिसांना खबर द्यायला गेला तो कोण ?' एन्‌रिक म्हणाला, ' मार्टिनेझ. तो टेकडीवर शेती करतो. त्यानंच तुम्हाला काल प्रथम पाहिलं. दुरून त्याला वाटलं की तुम्ही शिकारीच आहात. ' मार्टिनेझला तर कॅनेसा लांबून बाईच वाटली होती.

' पण तो नक्की पोलिसांकडेच गेला आहे ना ?'

' होय. कॅरबीनियर्सकडे. '

' ते ठिकाण इथून किती लांब आहे ?'

' दोन शेतकऱ्यांनी एकमेकांकडे प्रश्नार्थक मुद्रेनं पाहिलं.

' वीस मैल ? पन्नास मैल ?'

' एक दिवसाएवढं अंतर आहे, असं म्हणू या ! ' एकजण म्हणाला,

' छे.. दिवस नाही लागणार ! ' दुसरा म्हणाला.

' पायी ?' पेरॅडोनं विचारलं.

' घोड्यावरून. '

' सगळ्यात जवळचं गाव कोणतं ?'

' सॅन फर्नांदो. घोड्यावरून तिथे जायला दोन दिवस लागतात. '

दोन्ही मुलांना आता स्वतःची काळजी नव्हती. चौदाजण अजूनही फेअरचाइल्डमध्ये अडकून पडलेले होते. रॉय, कोच आणि मॉंकोची प्रकृती अत्यंत ढासळलेली होती. त्यालाही दहा दिवस लोटले होते. एक एक तास वाया घालवणं म्हणजे जीवन आणि मृत्यूमधील संघर्ष ठरणार होता.

तेवढ्यात खालच्या खोऱ्यातून त्यांना आरोळ्या ऐकू आल्या. झोपडीबाहेर धावतच जाऊन पाहिल्यावर त्यांना एक जाडजूड इसम धापा टाकत तिकडेच येताना दिसला. त्याच्या खांद्यावर मोठा दोर होता. मागोमाग दुसरा एकजण आला. जवळ आल्यावर पहिल्यानं विचारलं, ' ओके, बॉईज ! तुमचं विमान कुठं आहे ?'

कॅनेसा पर्वतमालिकांकडे बोट दाखवून म्हणाला, ' ते समोर खिडकीसारखं दिसतंय् का ?'

' होय, ' तो इसम म्हणाला.

' मग तिथून पन्नास ते साठ मैल जा. नंतर उजवीकडे वळून पर्वत लागेपर्यंत चाला. पलीकडच्या बाजूला तुम्हाला विमान दिसेल ! '

तो जाडजूड इसम खालीच बसला.

' आणखी कोणी येतंय का ?' पेरॅडोनं काळजीनं विचारलं.

' होय, होय, ' तो म्हणाला. ' पोलिसांची तुकडी येतीय्. '

थोड्याच वेळानं टोकदार टोप्या आणि पायघोळ कोट घातलेले दहाजण तिथे हजर झाले. त्यांच्या मागोमाग ' सेर्जिओ मार्टिनेझ ' आला. याच्याकडेच पेरॅडोनं चिठ्ठी फेकली होती.

दोन्ही मुलांनी सर्वांना मोठ्या प्रेमानं आलिंगनं दिली. मार्टिनेझ म्हणाला, ' देवाचीच मेहेरबानी ! ' तो स्वभावतः अत्यंत भित्रा होता. चेहेऱ्यावरून ते सतत जाणवत होतं. ' माझे आभार मानू नका. चिलीचा सच्चा नागरिक या नात्यानं माझं ते कर्तव्यच होतं. आपण सर्व ईश्वराची लेकरे आहोत ना ! '

दहा जणांतल्या कॅप्टननं विमानाचा नक्की ठावठिकाणा विचारून घेतला. पायी जाण्याविषयी त्याच्या मनात आलेले विचार मुलांच्या मोहिमेचं वर्णन ऐकून कुठल्या कुठे पळाले. ' प्यूंटे निग्रो ' या जवळच्या ठाण्याला जाऊन त्यानं दोघांना सँटियागोहून हेलिकॉप्टर मागवायला सांगितलं.

अंधार पडू लागला. त्या दिवशी काहीही करता येणार नाही हे दोन्ही मुलांच्या लक्षात आलं. चौदा सहकाऱ्यांची चिंता प्रयत्नपूर्वक बाजूला सारून त्यांनी फेअरचाइल्डची जीवघेणी कथा लोकांना सांगायला सुरुवात केली. फक्त एक-दोन तपशील सोडून.

पुन्हा तेच ओशाळवाणे चेहेरे. लगेच तिथे हजर असलेल्या लोकांनी त्यांच्याजवळ असेल-नसेल ते सर्व काही भुकेल्या मुलांपुढे ठेवलं. अंडी, दूध, ब्रेड, ऑरेंजज्यूस इ. त्यांनी सर्व पदार्थांचा पूर्ण समाचार घेतला. ही त्यांची तिसरी ' मेजवानी. ' पण त्यांना बोलण्याचीही भूक जास्त लागलेली होतीच. लोक त्यांची कथा एकाग्र चित्तानं ऐकत होते. शेवटी पहाटे तीनच्या सुमारास कॅप्टननं सगळ्यांना झोपायला सांगितलं. सकाळी हेलिकॉप्टर येण्याची शक्यता होती.

दुसऱ्या दिवशी कॅनेसा आणि पेरॅडो जेव्हा बाहेर आले, तेव्हा एकदम निराशच झाले. सर्वत्र दाट धुकं पसरलं होतं. कॅप्टन, एन्‌रिक्, मार्टिनेझ इ. तसेच चिंताक्रांत झाले होते.

' या परिस्थितीत त्यांना हेलिकॉप्टर उतरवता येईल ?' पेरॅडोनं विचारलं.

' कठीण दिसतंय्. ' कॅप्टन म्हणाला, ' त्यांना आपण दिसणारही नाही ! '

' थोडं थांबा ! ' मार्टिनेझनं दिलासा दिला, ' हे सकाळचं धुकं आहे. लवकरच ते नाहीसं होईल. '

दोन्ही मुलांनी नाश्ता उरकला. पदार्थ साधे असूनही ते खाताना त्यांना अमृतप्राप्तीचा आनंद होत होता. त्या वेळी चौदा सहकाऱ्यांची काळजीसुद्धा तात्पुरती दूर पळे. बऱ्याच अंतरावरून त्यांना कोलाहल ऐकू येऊ लागला. हेलिकॉप्टर येणं शक्यच नव्हतं. आवाज जसजसा जवळ येत गेला तसतशी ती लोकांची गडबड असल्याचं लक्षात आलं.

बहुधा जवळच्या खेड्यातून गावकरी येत असावेत असा त्यांनी अंदाज केला. समोरचं दृश्य पाहून ते थक्कच झाले. असंख्य लोक

बॅगा, कॅमेरे इ. गोष्टी घेऊन त्यांच्याकडे येत होते. 'वाचलेले लोक कुठायत्, ते दोघंजण?' वाढलेले केस आणि दाढ्या पाहून त्यांच्या तात्काळ ध्यानात आलं कोण दोघं ते. वृत्तपत्र आणि रेडिओचे प्रतिनिधी त्यांच्यापर्यंत येऊन थडकले होते.

'एल् मर्क्युरिओ, सँटियागो,' एकजण म्हणाला. त्यानं पॅड आणि पेन्सिल सरसावली.

'बी. बी. सी., लंडन,' टेपरेकॉर्डर सांभाळत दुसरा इसम म्हणाला. त्यानं माईक दोघांसमोर धरला. त्या दरम्यान कॅनेसा आणि पेरॅडोला पन्नास वार्ताहरांनी गराडा घातला.

दोन्ही मुलं पुरती गोंधळून गेली होती. त्यांना आपलं एवढं स्वागत होईल याची कल्पनाच नव्हती. मॉन्टेव्हिडिओमधे फार तर चार ओळी वर्तमानपत्रात येतील असं सगळ्याच मुलांना वाटलं होतं. दोन-अडीच तास चालत कॅमेरे, टेपरेकॉर्डर इ. गोष्टींसह सुसज्ज होऊन येण्याचे कष्ट कोणी घेतील हे त्यांच्या स्वप्नातही नव्हतं. तो रस्ताही अरुंद आणि धोक्याचा होता.

अर्थातच दोघांनी वार्ताहरांच्या सरबत्तीला आनंदानं तोंड दिलं. पुन्हा एक-दोन गोष्टी वगळल्याच, हे सांगायला नकोच. मुख्य म्हणजे जिवंत राहण्यासाठी त्यांनी काय खाल्लं हे सांगण्याचा त्यांना धीरच होत नव्हता. ही वैशिष्टयपूर्ण प्रेस कॉन्फरन्स आटोपल्यावर कॅप्टननं ठरवलं की दोन्ही मुलांना 'प्यूंटो निग्रो' गावाकडे घोड्यावरून रवाना करावं. धुकं जरा कमी झालं असलं तरीही अद्याप हेलिकॉप्टरचा पत्ता नव्हता. अनेक फोटो काढून झाल्यावर ते खेड्याकडे जायला निघाले. दूर जाण्यापूर्वीच त्यांना हेलिकॉप्टरची घरघर ऐकू आली. तो आवाज कानठळ्या बसवत होता. तेव्हा माघारी वळणंच क्रमप्राप्त होतं. तोपर्यंत धुक्यातून तीन हेलिकॉप्टर्स 'लॉस मेटनीज' भागात, नदीजवळ उतरलीसुद्धा! ¤

## : २ :

'लॉस सेरिलॉस' या सँटियागोमधील एस. ए. आर. च्या कार्यालयात, कर्नल मॉरेलनं धाडलेली दोन मुलं सापडल्याची वार्ता पोचताच कोणाचीही तशी खात्री पटेना. उशीर झाला असल्यामुळे त्या रात्री काहीही करता येणं अशक्यच होतं; पण वैमानिक कार्लस गेॅसिया यानं सकाळी सहा वाजता हेलिकॉप्टर्स तयार ठेवायला सांगितलं. पहाटे पहाटे दोन्ही मुलं फेअरचाइल्डमधलीच असण्याची नक्की बातमी आली. तो सुखद असा धक्काच होता.

गेॅसिया, मॅसा आणि अॅव्हिला या तिघांनी हेलिकॉप्टर्स न्यायची होती. सहवैमानिकांऐवजी पाच-सहा मदतनीस बरोबर येणार होते. मेकॅनिक, नर्स, मेडिकल ऑर्डर्ली इ. कमांडर क्लॉडिओ ल्युसेरो जातीनं हजर राहणार होते.

लॉस सेरिलॉसमधे हवा पार बिघडली होती. हिमवर्षावही होत होता; त्यातून दाट धुकं. सात वाजेपर्यंत त्यात काही सुधारणा होण्याची शक्यता दिसेना. म्हणून तिन्ही हेलिकॉप्टर्स ७-१० ला सॅन फर्नांदोकडे निघाली. धुक्यामधून आणि जवळजवळ जमिनीच्या पातळीवरूनच.

सॅनफर्नांदोमधे कर्नल मॉरेल आणि पेझ होतेच.

'काय, पुन्हा तुम्ही?' गेॅसियानं पेझना विचारलं. 'फेअरचाइल्डमधल्या मुलांसाठी तुम्ही इथे आलेले नाहीत ना?'

त्याच्या विनोदाचा भाग सोडला तर, ज्यांची आशा सर्वांनी सोडली होती त्यातले काहीजण तरी जिवंत असावेत अशी एव्हाना खात्री वाटायला लागली होती. मार्टिनेझनं आणलेल्या चिठ्ठीमुळे सर्वजण चकित झाले होते. लॉस मेटनीज भागात सापडलेल्या मुलांची नावंही समजली. रॉबर्टो, कॅनेसा आणि फर्नांदो पेरॅडो हे दोघंही कोसळलेल्या विमानातील उतारू होते, हे नक्की झालं होतं.

सुटकेची योजना आखली गेली. हेलिकॉप्टर्स लॉस मेटनीजकडे लगेच निघणार होती. सोबत कर्नल मॉरेल, एक डॉक्टर आणि परिचारक.

'आणि तुमचं काय, पेझ,' मॉरेल म्हणाले. 'तुम्ही खरं म्हणजे यायलाच पाहिजे!'

'नको. मी उगीच एक जागा अडवत नाही. मी इथेच वाट पाहीन!' पुढे भावनाविवशतेनं पेझ म्हणाले, 'पण जर माझा मुलगा कार्लस मायगेल वाचलेल्या मुलात असेल, तर कृपा करून एवढं पत्र त्याला द्या आणि कर्नलसाहेब, हे माझे बर्फाचे बूट घेऊन जा. त्यांची तुम्हाला गरज भासेल. शिवाय तुम्ही माझ्या पावलांनी चालल्यासारखं होईल.'

हेलिकॉप्टर्स पुन्हा निघाली. टिग्वीरिरिका नदीवरून ती पर्वताकडे वळली. काही फुटांपलीकडचं दिसत नव्हतं. तसंच पुढे जाण्याचा धोका पत्करणे किंवा सरळ खाली उतरणे हे दोनच मार्ग होते. त्यांनी दुसरा मार्ग पत्करला. नदीच्या डावीकडे ते खाली उतरले.

घरघर थांबल्यावर पलीकडच्या किनाऱ्यावरून आवाज ऐकू येऊ लागले. योगायोगानं ते हव्या त्या ठिकाणी पोचले होते. मग दुसऱ्या बाजूला हेलिकॉप्टर्स जाऊन थांबली.

दोन्ही मुलं फेअरचाइल्डमधलीच होती, हे निश्चित व्हायला पाच मिनिटंसुद्धा लागली नाहीत. कॅनेसाची अजूनही अनुकंपनीय दशा होती. डॉक्टरनं त्याची नाडी तपासून, थकलेल्या गात्रांना मालिश सुरू केलं. पेरॅडोनं तसले उपचार करून घ्यायला नकार दिला. मॅसा आणि गेॅसिया यांनी लगेच फेअरचाइल्डच्या शोधासाठी बाहेर पडावं अशी त्याची इच्छा होती. गेॅसियानं सांगितलं की ते लगेच शक्य नव्हतं; पण विमान कुठे होतं याची चौकशी मात्र त्यांनी केली. पेरॅडोनं त्यांच्या प्रवासाचा मार्ग सांगितला.

विमान किती उंचीवर असेल, याची तुला कल्पना आहे?' गेॅसियानं विचारलं.

'नाही बुवा सांगता येणार,' पेरॅडो म्हणाला, 'पण खूपच उंचावर आहे. जवळपास एकही वनस्पती उगवलेली नाही!'

'तुम्ही खाल्लं काय?'

'ओह! आमच्याकडे भरपूर चीज होतं आणि तसलेच काही पदार्थ.'

'विमानाच्या उंची-निदर्शक यंत्रात तुम्हाला आकडा नाही दिसला?'

'होय,' कॅनेसा म्हणाला. 'सात हजार फूट!'

'सात हजार? छान. मग तेवढं जाणं कठीण नाही. आपल्याला ते लगेच सापडू शकेल ना?'

दोन्ही मुलांनी एकमेकांसडे पाहिलं. 'अगदी सहजासहजी नाही सापडणार!' पेरॅडो म्हणाला, 'ते बर्फामधे बुडलेलं आहे.' त्याच्या मनात गोंधळ उडाला होता. जावं का नाही? त्यानं मुलांना परत येऊन सुटका करण्याचं वचन दिलेलं होतं. मनात थोडी भीतीही होती. तो गेर्सियाला म्हणाला, 'मी येईन तुमच्याबरोबर. अर्थात तुमची इच्छा असेल तर. मला मार्ग दाखवता येईल!'

धुकं नाहीसं होण्याची वाट पाहत ते थांबले. तोपर्यंत बरेचसे वार्ताहर चित्तथरारक कथेसह सँटियागोला परतू लागले. तीन तासांनंतर बरचसं स्पष्ट दिसू लागलं. दोन हेलिकॉप्टर्स मुलांना सोडवण्यासाठी न्यावीत असा निर्णय घेण्यात आला. पूर्वीसारखंच पाच-सहा जणांचं पथक सोबत जाणारच होतं. पेरॅडोच्या डोक्यावर शिरस्त्राण आणि तोंडासमोर मायक्रोफोन देण्यात आला.

दुपारचा एक वाजला. अँडीजवरून जाण्याची ती सर्वात वाईट वेळ. म्हणून त्याच खेपेत चौदा मुलांना सोडवावं असा गेर्सियाचा विचार नव्हता. फक्त निश्चित ठिकाण बघायचं होतं. पेरॅडो उत्कृष्ट मार्गदर्शक होता. ज्या ज्या वाटेनं तो कॅनेसाबरोबर आला त्या जागा त्याच्या बरोब्बर लक्षात होत्या. गेर्सियाला तो वेळोवेळी तशा सूचना देत होता.

उड्डाण अवघड होतं; पण ७००० फुटांवर पोचल्यानंतर गेर्सियाला त्या उंचीवर हेलिकॉप्टर निर्धोक असल्याचा आत्मविश्वास वाटू लागला. समोर विस्तीर्ण पर्वतांच्या रांगा : विमानाचा अद्याप पत्ता लागला नव्हता!

'आता कुठे?' त्यानं पेरॅडोला विचारलं.

'सरळ तिकडे!' समोर बोट दाखवून पेरॅडो म्हणाला.

'कुठे म्हणतोस?'

'एकदम सरळ!'

'पण तुम्ही तिथून खाली येणं शक्यच नाही.'

'आम्ही तिथूनच आलो. ते पलीकडच्या बाजूला आहे.'

गेर्सियाचा विश्वासच बसेना. त्या पर्वतमाथ्यावरून खाली उतरणं दोन मुलांना शक्य होतं?'

'कसे काय खाली आलात हो तुम्ही?'

'घसरत, धडपडत...'

गेर्सियानं हेलिकॉप्टर वर चढवलं. मागोमाग मॅसाचं येतच होतं. उंचीवर हवा विरळ होऊ लागल्यानं हेलिकॉप्टरची यंत्रं त्रास देऊ लागली. ती थडथडू लागली. धक्के बसू लागले. उंची-दर्शक काटा १०,००० फूट दाखवत होता तो १३,००० पर्यंत पोचला आणि शिखर आलंच. त्याबरोबर लगेच विरुद्ध बाजूच्या जोरदार वाऱ्यामुळं हेलिकॉप्टर्स एकदम मागे सरकली आणि खाली जाऊ लागली. दुसऱ्या प्रयत्नातही तीच स्थिती झाली. पेरॅडो तर भीतीमुळे जोरात किंचाळला. कोणी तरी एकजण ओरडला, 'कमांडर, आपण इथे चांगलेच संकटात सापडलो आहोत.'

पण गेर्सिया अनुभवी वैमानिक होता. उजव्या बाजूला पर्वताची उंची कमी असल्याचं त्याच्या लक्षात आलं आणि तिकडे मोर्चा वळवून, झंझावाताला तोंड देत अखेर यशस्वीरीत्या पलीकडच्या बाजूला हेलिकॉप्टर एकदाचं गेलं. मागोमाग दुसरंही; पण मार्ग बदलल्यामुळे पेरॅडो बावचळला. आपण कुठे आहोत हे त्याच्या नेमकं लक्षात येईना, विमानही समोर दिसेना. हेलिकॉप्टर्स घिरट्या घालू लागली. पेरॅडोचं अवसानच गळालं. तो सगळीकडे वेड्यासारखं पाहू लागला एखादी ओळखीची खूण सापडते का ते आणि अचानक एका दरीपाशी लक्ष गेल्यावर त्याला परिचयाचं शिखर दिसू लागलं. 'विमान तिथेच खाली असलं पाहिजे!' तो गेर्सियाला म्हणाला.

'मला तर काहीच दिसत नाही.'

'खाली वळा!'

हेलिकॉप्टर खाली जाऊ लागलं. तेच ओळखीचे खडक, कपारी दिसता दिसता अखेर फेअरचाइल्डचा टिपका त्याच्या दृष्टीस पडला.

'ते पाहा आमचं विमान!'

'कुठाय्, कुठाय्? मला कसं ते दिसत नाही?'

'तिथे पाहा!' पेरॅडो ओरडला. 'त्या तिथे!'

आणि हेलिकॉप्टरवरचा ताबा टिकवून गेर्सियाला विमान एकदाचं दिसलं. बाजूच्या खिडकीतून खाली पाहताना त्यांच्या हादरणाऱ्या वाहनाकडे दुर्लक्ष करून चालणार नव्हतं.

'खरंच की!' तोही ओरडला. 'मात्र आत्ताशी ते दिसतंय्! आता माझ्याशी काही बोलू नकोस. एक शब्द सुद्धा नको. खाली जाता येईल का ते आपण बघू या!' ◻

## : ३ :

२० डिसेंबर. बुधवार. फेअरचाइल्डमधल्या चौदा मुलांची मनःस्थिती पार ढासळली होती. तिघंजण मोहिमेवर बाहेर पडून नऊ आणि व्हिजिटिन परत येऊन सहा दिवस उलटले तरीही आशादायक घटना कोणतीच घडली नव्हती. कॅनेसा आणि पेरॅडो या दोघांकडे अन्नसाठा किती होता हे त्यांना ठाऊक होतं. वेळ फारच चालला होता. दुसऱ्या मोहिमेची तयारी करावी लागणार होती—आणि नाताळ अँडीजमधेच साजरा होण्याची चिन्हं दिसत होती.

गुरुवारी सकाळच्या बातम्यांत त्यांच्या सुटकेविषयी कसलाच उल्लेख नव्हता. उलट सी–४७ या युरुग्वेच्या विमानानं चिली देश सोडला हीच वार्ता ऐकू आली. निराशेत आणखी भर. दुपारी रोजचं जेवण उरकून तात्पुरत्या विश्रांतीसाठी सर्वजण विमानात शिरले. त्या वेळी बाहेर ऊन सहन होत नसे.

दुपारनंतर कार्लिटसला अचानक वाटू लागलं—अगदी ठामपणे—की पेरॅडो आणि कॅनेसा लोकांना सापडलेच असणार. बर्फातून चालत तो विमानाच्या पुढच्या भागात आला. फिटो तिथेच होता. त्याच्या कानात हळू आवाजात कार्लिटस म्हणाला, 'ऐक, फिटो. नुसतं ऐकून ठेव! नँदो आणि कॅनेसा मुक्कामाला पोचलेत असं मला तीव्रतेनं वाटतंय्; पण तूर्त हे कोणाला बोलू नकोस!'

फिटो त्याच्याबरोबर पर्वतावर चढू लागला. त्याचा अंतःप्रेरणेवर वगैरे फारसा विश्वास नव्हता; पण त्यानं विचारलं, 'तुला नक्की असं वाटलंय् ना, ते सापडले असतील?'

'होय,' कार्लिटस आत्मविश्वासानं म्हणाला, 'इतरांना एवढ्यासाठीच बोलायचं नाही की ते खोटं निघालं तर उगीच त्यांची घोर निराशा व्हायला नको.'

अंधार पडल्यावर रोज रात्रीप्रमाणेच चौदा जण निजण्याच्या तजविजीला लागले. ज्यांच्याकडे अद्याप सिगारेट्स शिल्लक होत्या त्यांच्या जागेवरून धूर येऊ लागला. हवा थंड झालीच. अँडीजमधील त्यांची ही सत्तरावी रात्र!

सर्वांनी प्रार्थना म्हटली. कार्लिटस काहीच बोलला नाही; पण फर्नांडेझ मात्र एकदम म्हणाला, 'आपले दोन मित्र चिलीला नक्की पोचलेत. आपली उद्या किंवा फारतर परवा सुटका होणारच!'

'मलाही तसंच वाटतंय्.' कार्लिटसला राहवलं नाही. 'दुपारपासून माझी तशी खात्रीच होत चाललीय्. दोघांनी अखेर जिंकली!'

दोन मुलांनी एकच विश्वास प्रकट केल्यामुळे सगळी मुलं सुटकेच्या स्वप्नात दंग झाली. त्यातच निद्रादेवी त्यांच्यावर प्रसन्न झाली.

सकाळी साडेसातला डॅनियल आणि एडचुअर्डो प्रथम बाहेर पडले. रेडिओवर बातम्या लावण्यात आल्या. सुरुवातीलाच त्यांना ऐकू आलं, 'लॉस मेटनीज भागात सापडलेले दोन जण युरुग्वेच्या फेअरचाइल्डमधील असावेत असा अंदाज आहे.' डॅनियल उडी मारून ओरडणार एवढ्यात एडचुअर्डोनं त्याला गप्प केलं. 'थांब! कदाचित तसा गैरसमज झालेला असेल. त्यामुळे मुलांना उगीच खोटी आशा वाटायला नको.' त्यांनी इतर काही स्टेशनं लावण्यासाठी रेडिओचे काटे फिरवले तेव्हा तिथलं वातावरणच एकदम जिवंत झालं. ब्राझील, अर्जेंटिना, युरुग्वेमधल्या सर्व केन्द्रांवरून तीच वार्ता सांगितली जात होती.

नंतर मात्र एज्युअर्डो जीव खाऊन ओरडला. सारी मुलं धावतच रेडिओपाशी जमली. आता स्वतःच्या कानांनी ती अत्यानंदाची आणि महत्त्वपूर्ण बातमी त्यांना ऐकू येऊ लागली. दोन मुलं सापडल्याची वार्ता हळूहळू सर्व देशात जाऊन पोचली होती. त्या दिवसाची विशेष बातमी म्हणून तिला प्राधान्य मिळणं अपरिहार्यच होतं. 'दहा आठवड्यांनंतर दोनजण चिलीला पोचले. इतर चौदा मुलं अद्याप अडकून पडलेली आहेत. त्यांच्या सुटकेची तयारी यापूर्वीच सुरू झालेली आहे.'

मुलांनी शेकडो वेळा कल्पना केलेला तो क्षण जवळ आला होता. हात उंच करून, पर्वतराशींना उद्देशून बोलल्याप्रमाणे सर्वांनी सुटकेचा आनंद व्यक्त केला. देवाचे मनापासून आभार मानले. नाताळ आता अँडीजमधे काढावा लागणार नव्हता. खास त्यासाठी राखून ठेवलेले सिगार काढून प्रत्येक मुलानं मजेत ओढायला सुरुवात केली. त्यांच्यावरील असह्य ताण बराचसा हलका झाला होता.

'आपल्याला आता सगळं काही नीट आवरून ठेवायला पाहिजे,' एज्युअर्डो म्हणाला. 'तुझे केस काय झालेत कार्लिटस! जरा ते विंचर!'

'आणि त्यांचं काय करायचं? मानवी शरीराच्या सांगाड्यांकडे बोट दाखवून डॅनियलनं विचारलं. 'आपण ते पुरून टाकायला पाहिजेत!'

बर्फावर लाथ मारून फिटो म्हणाला, 'हा पृष्ठभाग कठिण असेपर्यंत आपल्याला खड्डे खणता येणार नाहीत ना!'

'त्याची चिंता कशाला करायची?' अल्गोर्ता म्हणाला.

'आणि त्यांनी फोटो घेतले तर?' डॅनियलनं विचारलं.

'आपण त्यांचे कॅमेरे नष्ट करू!' कार्लिटस.

'असो. आपण जे काही केलं ते छपवण्याची काही एक गरज नाही!' एज्युअर्डो म्हणाला.

या बोलण्याचा रोख अल्गोर्ताच्या ध्यानातच आला नाही. झेर्बिनो आणि सॅबेला, लोक सोडवायला आले की काय करायचं यावर विचार करू लागले. 'आपल्याला त्यांच्या विमानाचा आवाज आला की आपण सगळे फेअरचाइल्डमधे जाऊन बसू. ते आल्यावर त्यांना म्हणू, 'हॅलो, तुम्हाला काय हवंय्?'

'आणि त्यांनी चिलीमधल्या सिगारेट्स दिल्या की मी म्हणेन,' झेर्बिनो म्हणाला, 'नो, थँक्स्. मी फक्त स्वतःच्याच ओढतो; पण त्यासाठी मला थोड्या शिल्लक ठेवाव्या लागतील!'

सुटका जवळजवळ निश्चितच धरून सगळी मुलं वेगळ्याच जगात वावरत होती. पेझनं भांग पाडला. सॅबेला–झेर्बिनो जोडीनं सदरे चढवून नेकटाय बांधले. त्यातल्या त्यात बऱ्या कपड्यांचा सगळे शोध घेऊ लागले. अंगातले तर इतके गलिच्छ झाले होते की त्यांना किळसच येऊ लागली. शिल्लक राहिलेल्या टूथपेस्टनं त्यांनी दात स्वच्छ केले. तोंड अर्थातच बर्फानं स्वच्छ केलं.

तयारी तर सगळी झाली; पण हेलिकॉप्टर्स आलीच नाहीत. रेडिओवरून त्यांच्यासाठी म्हटलेली प्रार्थनासुद्धा ऐकू आली; पण दुपारपर्यंत सुटकेचं कोणतंच चिन्हं दिसेना. मुलं गोंधळात पडली. दैनंदिन कार्यक्रम पुन्हा सुरू करावेत किंवा कसं हे त्यांना सुचेना. भूक सगळ्यांनाच लागली होती. सगळी उत्साहाच्या भरात. आजच्यासाठी कापून ठेवलेलं मांस त्यांनी फेकून दिलं होतं. झेर्बिनो आणि डॅनियल त्याचा शोध घेऊन लागले. रॉय आपल्याला चांगल्या संडासात जायला मिळेल म्हणून थांबला होता; पण आता त्याला राहवेना. विमानामागे जाऊन त्यानं 'विधी' उरकला.

ऊष्मा वाढू लागला. काहीजण विमानात शिरले. उतावीळपणे ते अपेक्षित सुटकेची वाट पाहत होते. एडचुअर्डो म्हणाला, 'एवढ्यात एखादा कडा कोसळला तर दुर्दैवाचा कळसच म्हणावा लागेल!'

'भलतंच काही बोलू नकोस!' डॅनियलनं त्याला झटकून टाकलं. "मी इथपर्यंत टिकाव धरल्यानंतर तसं घडणं कदापि शक्य नाही!'

अचानक त्यांच्या कानांवर आरोळी पडली, 'धावा, हिमवादळ!' समोरच्या पर्वतशिखरांवरून पांढरे लोट त्यांच्या दिशेनं येऊ लागले होते. क्षणभर बाहेरची मुलं भयानं गोठून गेली; पण लगेच त्यांच्या लक्षात आलं की तो वर्फ नसून विमानाचा पांढरा धूर होता. 'थोडी कळ काढा, आम्ही आलोच आहोत, असं आश्वासन देण्यासाठी तो धावत धावत पुढे आला होता.

[क्रमशः]

# सो ल क ढी

## □ चला आता कराडला जाऊ

गतवर्षीचे अखिल भारतीय मराठी साहित्य-संमेलन इचलकरंजी येथे आमच्या उपस्थितीत व्यवस्थित पार पडले होते. साक्षात पु. ल. देशपांडे त्या रौप्यमहोत्सवी अधिवेशनाचे अध्यक्ष होते, आठवते? बापूराव नाईकांनी टक्कलहुशारीने प्रयत्न करूनसुद्धा त्या वेळी कोणा मंत्र्याचे पाय संमेलनाच्या व्यासपीठाला लागले नव्हते. जेवणा-राहण्याची व्यवस्था उत्तम होती : म्हणजे अनिमंत्रितांची. निमंत्रितांपैकी काहींना काही गोष्टी काही वेळा काही केल्या मिळाल्या नाहीत : त्यामुळे त्यांची निमंत्रित प्रकृती थोडी बिघडली. मग वर्तमानपत्रांतून त्यांनी आपल्या दुःखाला वाचा फोडली. या गोष्टी मनात अस्पष्टपणे बुदबुदत असतानाच कराडला संमेलनाच्या एकावन्नाव्या अधिवेशनाच्या तयारीला जोरात सुरुवात झाल्याची वार्ता आली. आणीबाणी-मुळे दिवसरात्रीसुद्धा कशा भराभर चालल्या आहेत पाहा.

त्यामुळे कराडचे संमेलन वेळेवर होणार असूनसुद्धा अंमळ लौकरच होणार आहे, असे मला वाटू लागले. कराडला विमानतळ असल्यामुळ चला आता तिथे विमानानेच जाऊयेऊया असे गुलबोलणे कोठे कोठे काना-वर पडत असतानाच अध्यक्षपदासाठी सुचवली गेलेली पाच नावे पाहायला मिळाली. देशोदेशींचे प्रमुख कसे निवडले जातात याची मला बऱ्यापैकी माहिती आहे; परंतु अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष निवडायचे चेकुट्रगुट्रम मला उलगडलेले नाही. एक मात्र होते : निवडणुकीच्या विहिरीत पडलेला अध्यक्षपदाचा गडू स्वतः बाहेर काढल्याचे समाधान अध्यक्षाला पुरेपूर मिळते.

अध्यक्षपदासाठी पुढे आलेली तीन नावे अशीच गळली. काहींना तर असे गळण्यातच सगळे पावते. अखेर दोन नावे उरली : वामनराव चोरघडे आणि दुर्गा भागवत. चोरघडे–धरमपेठ एक्स्टेन्शन, नागपूरचे १चे; दुर्गाबाई–गिल्डर लेन, मुंबई ८ च्या. आम्हाला मात्र दोघेही महाराष्ट्राचे, भारताचे, अखिल विश्वाचे वाटतात. म्हणून या उरल्या-सुरल्या दोघांनाही अर्धे आणि अर्धे अध्यक्षपद द्यावे आणि निवडणूक टाळावी, असे सुचले होते. एकीकडे निवड-णुका होत नाहीत म्हणून विलाप करायचा आणि दुसरीकडे निवडणूक होऊ नये म्हणून प्रयत्न करायचा, असा सर्वत्र तोल सांभा-ळायचा आमचा स्वभाव आहे; पण या वेळी आमचे ईप्सित पुरे झाले नाही. इतिहासातल्या अहिल्याबाई होळकर विरुद्ध राघोबादादा अथवा ताई तेलीण विरुद्ध बापू गोखला यांच्यातल्यासारखा संग्राम उभा राहिला. अलीकडचे आणि ताजे उदाहरण द्यायचे तर मृणाल गोरे विरुद्ध माधवराव परांजपे यांच्यातल्या विधानसभेच्या निवडणुकीतल्या लढतीचे देता येईल. (उदाहरणांनी मूळ विषय अस्पष्ट करण्यात आमचा हातखंडा आहे.) असो.

निवडणूक उभी राहिली आणि 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये माधव मनोहर आणि धोंडो विठ्ठल देशपांडे या दोन अकाळविकाळांचे एक पत्र प्रसिद्ध झाले. त्यात दुर्गा भागवतांच्या शब्दतः अष्टपैलू साहित्यिक कर्तृत्वाचे गौरव-पूर्वक स्मरण करून वामनराव चोरघड्यांनी आपले नाव मागे घ्यावे, असे आवाहन केले होते. (वामनराव पुढेमागे अध्यक्ष होतीलच असा हवालासुद्धा या पत्रात होता हां. दुर्गा-बाई पुढेमागे अध्यक्ष होऊ शकत असल्यामुळे त्या याच वर्षी व्हाव्या, असेही त्याच पत्रात सांगितले होते बरे. बरे बरे फणसात गरे.) या पत्रापाठोपाठ दुसरे एक पत्र आले : त्यात आंतरराष्ट्रीय महिलावर्षानिमित्त दुर्गाबाई विनानिवडणूक अध्यक्षा व्हाव्या, असे म्हटले होते. तिकडे 'नवशक्ती'त अग्रलेख लिहून पु. रा. बेहेऱ्यांनी आपला एक पाठिंबा दुर्गा-बाईंना लावून दिला होता. वामनराव चोरघड्यांच्या आजूबाजूला, मागेपुढे कोणी उभे न राहिल्यामुळे ते निवडणुकीलाच उभे राहिले आणि हप्हप् हरले. त्यांना (एक वामनरावांचे आणि एक चोरघड्यांचे अशी) दोनच मते मिळाली. बाकीची दुर्गाबाईंना मिळाली : दुर्गाबाई विजयी झाल्या.

अध्यक्षा दुर्गाबाई भागवत यांच्याबद्दल विस्ताराने लिहिणे मलासुद्धा अवघड आहे; पण लोकाग्रहास्तव लिहीन; पण ते कधीतरी पुढेमागे. आज एवढेच म्हणतो की साहित्य, धर्म, मानववंशशास्त्र, तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, इतिहास, लोककला, समाजशास्त्र, पु. ल. देशपांडे इत्यादी विषयांवरच्या दुर्गाबाईंच्या अजोड व्यासंगापुढे आम्ही सफशेल विनम्र आहो.

विनम्र होऊनच आम्ही कराडला जाऊ. यशवंतराव चव्हाण तसेच येणार आहेत : इचलकरंजीला ते विनम्र रसिक म्हणून आले होते; कराडला विनम्र स्वागताध्यक्ष म्हणून येतील. साहित्यांतर्गत न्याय म्हणतात तो हा असा.

कराडला होणारे संमेलन इचलकरंजीला झालेल्या संमेलनापेक्षा वेगळे होणार नाही,



अशी मला आशा आहे. ते वेगळे झाले तर माझी नस्ती धंधांदल होईल : अलीकडे ती मला सोसत नाही. ¤


## □ उचकी लागली ती लागलीच

बऱ्याच वर्षांपूर्वी शाहीर अमरशेख आणि पार्टीचा एक तमाशा पाहिला होता. लोकनाट्यालासुद्धा तेव्हा तमाशा म्हणत. अलीकडे मात्र न चुकता लोकनाट्य म्हणतात. तमाशा ही बोलाईच्या मटणासारखी अस्सल झणझणीत वस्तू आहे असे मला खूपजणांनी सांगितले आहे. त्या खूपजणांना न सांगता, मी ती थोडीशी चाखूनही आलो. माझ्या जिभेस काही ती आली नाही.. तरीही तमाशाची तरफदारी करणाऱ्यांच्या ताफ्यात सामील होऊन तमाशाचे तुणतुणे मी वाजवतोच. बरे असते ते. त्यायोगे लोकनाट्याला एक बऱ्यापैकी धकांडी उगाच मारायची सोय होते. असो. अमरशेखांच्या त्या लोकनाट्यातल्या मूर्ख आणि मस्तवाल राजाला उचकीचा रोग होतो; त्याच्यावर अनेक उपाय केले जातात; अखेर एका उपायाने राजा बरा होतो; त्यापूर्वी त्याचा मूर्खपणा आणि मस्तवालपणा सपाट झालेला असतो.

वर्तमानपत्रात नुकतीच एक बातमी वाचली तेव्हा अमरशेखांच्या राजाच्या उचकीची आठवण आली. पाठोपाठ उचकीही लागली. आठवण काढली की उचकी लागतेच नाही तरी. पश्चिम जर्मनीत हॅंझ आयझेक नावाचा पंचावन्न वर्षांचा एक माणूस आहे. वर्षभरापूर्वी त्याच्या पोटावर शस्त्रक्रिया झाली. ती झाली आणि त्याला जी उचकी लागली ती लागलीच. ती मुळी थांबायलाच तयार नाही. सुमारे एकशेपन्नासलाख वेळा तरी आयझेकअण्णांनी उचकी दिली असेल. उचकी झोपेचा भुगा करते. त्यामुळे आयझेकअण्णांची दमछाक झाली आहे. त्यांच्या डॉक्टरांनी जगभर आवाहन करून उपाय सुचवायची विनंती केली आहे. ('माणूस'च्या वाचकांना आवाहन केले जायची चांगलीच सवय आहे. उचकीवरच्या उपायासाठी केलेले हे आवाहन मी तुमच्यापर्यंत पोचवले आहे. कुठे पश्चिम जर्मनीतले आयझेकअण्णा आणि कुठे पश्चिम महाराष्ट्रातले अनंतराव; पण उचकीइतक्याच अनावर उत्स्फूर्तीने मी मदतीला उद्युक्त झालो. अहो, माणसे वेगवेगळी असली तरी त्यांना लागणारी उचकी सारखीच असते.)

आयझेकअण्णांना एक तेवढा दिलासा आहे. उचकीने असे आणि इतके हैराण झालेले ते एकमेवाद्वितीयं नाहीत. एक अमेरिकन माणूस म्हणे १९४८ ते १९५६ या आठ वर्षांत सुमारे एकशेसाठलाख वेळा उचक्या देत राहिला होता. उचकी थांबायला त्याने थोडेथोडके नाहीत, साठहजार उपाय केले; पण त्याला म्हणजे अगदी हुकुमाची उचकी लागली होती. ती अशा फतऱ्या उपायांनी आणि उताऱ्यांनी थोडीच थांबणार! तो उचकीजॉन अखेर एका बुवाला शरण गेला आणि त्याची उचकी विझली. बुवा हा अनेक रोगांवर अक्सीर इलाज आहे हे भल्याभल्या बुद्धिनिष्ठ लोकांनाही पटू नये याचे मला नेहमीच सखेदाश्चर्य वाटत आलेले आहे. खरे म्हणजे बुवे-स्वामी- आचार्य यांच्यासारख्या सवाईमाणसांना बहुउद्देशीय रुग्णोपचारकेंद्रे (म्हणजे पॉलीक्लिनिक्स) उभारण्यासाठी सरकारने आणि जनतेने भरभक्कम अनुदाने द्यायला हवीत. ते बाजूलाच राहिले; उलट बुवोपंथीविरुद्ध काही भडकुटी मंडळी येताजाताखातापिताढेकरदेता तोंड आणि लेखणी टाकत असतात. त्यांना एकदा ही अस्मानी उचकी लागू दे; मग (अव)चट सारे कसे बरोब्बर वठणीवर येतात पाहा!

—अनंतराव






कलकत्त्यातला डलहौसी स्क्वायर. संध्याकाळचा सहाचा सुमार. अशा वेळी खिसेकापूंना फुरसतीचा वेळ कुठला ?

ट्रामच्या समोर गर्दी एकवटत होती, त्या गर्दीत एका नाणावलेल्या गुंडाच्या लाथा, जोडे अन बुक्क्यांनी पूजा चालली होती. ज्यांना हातपाय हालवणं जिवावर आलेलं होतं ते सुद्धा आपलं कर्तव्य पार पाडीत होते.

कुणी म्हणत होता, 'तो एका पायानं लंगडा म्हणून सापडला, नाही तर कसला सापडतोय ?'

एक सद्गृहस्थ म्हणाले, 'हरामखोराची हिंमत तर पहा !' ज्याचं पाकीट मारलं ते सद्गृहस्थ रामनामाचा जप करीत उभे होते.

एकजण त्यांना म्हणाला, 'अहो साहेब, आधी पैसे तर मोजून पहा. असे गुपचुप का उभे राहिला आहात ? द्या त्याला पोलिसाच्या ताब्यात !'

त्या गृहस्थानं घाईघाईनं पैसे मोजले व मग म्हणाले, 'पाचशे रुपये आहेत. सगळेच्या सगळे. मी म्हातारा-माणूस कशाला पोलिसांच्या भानगडीत पडू ? माझे पैसे मला मिळाले. त्याला पण चांगला मार मिळाला. मिटलं सारं !'

# पाप आणि पुण्य

● वसन्त ज. डोळस ●

त्याची हातचलाखी काही कमी प्रतीची नव्हती. त्यानं पैशाचं पाकीट इतक्या हुशारीनं उडवलं होतं की, खुद्द त्या गृहस्थांना देखील कळलं नव्हतं. त्यांच्या हातातील सिगारेट स्वतःच्या शर्टावर पडली नसती तर तितकाच वेळ मिळाला असता आणि तो त्या अवधीत गर्दीत मिसळूनहि गेला असता. मग तो लालाच्या दारूच्या गुत्त्यात गेला असता. तीन बाटल्यांचे राहिलेले पैसे भरले असते आणि खाऊनपिऊन मजेत वेळ घालविला असता त्यानं. या कलकत्त्याच्या महानगरीत एखाद्या गल्लीत तो गेला असता. चेहऱ्यावर पावडरचा लेप चढवून ओठांना लाली लावून छानछोक पोषाख करून गिऱ्हाईक शोधण्यासाठी उभ्या असलेल्या मेहरजान नामक त्याच्या नेहमीच्या वेश्येकडे तो वळला असता आणि एखादी रात्र मजेत घालविली असती.

परंतु बुलाकीराम आज मुद्देमालासह पकडला गेला होता. गर्दी पुष्कळच कमी झाली होती. एखादा थांबून विचारत होता, 'काय झालं ? बिचारा लंगडा तोल जाऊन पडला वाटतं !'

बुलाकीराम जास्त वेळपर्यंत पडून राहिला नाही. कुबड्यांच्या सहाय्याने तो उठून उभा राहिला. मारामुळे सारं अंग ठणकत होतं. दातांतून रक्त निघत होतं. नाकातून रक्त ठिपकत होतं. शर्टावर टपकणाऱ्या रक्ताचे तीन-चार डाग पडले होते.

'हरामखोर निघून गेला !'

असं पुटपुटत त्यानं खिशात हात घातला. खिशात विड्या नव्हत्या. पाकीट चाचपताना विड्या रस्त्यावर पडल्या असाव्यात. त्याला वाईट वाटण्याचं हे एकच कारण नव्हतं. त्यानं आपल्या आवडत्या रखेलीसाठी-मेहेरजानसाठी घेतलेली सेंटची बाटली त्या धक्का-बुक्कीत जमिनीवर पडून फुटली होती. चाललेल्या ट्रामकडे जळता दृष्टिक्षेप टाकून तो म्हणाला, 'हरामखोर !'

आजूबाजूला उभी असलेली काही माणसं त्याच्याबद्दल अजूनहि बोलत होती. जवळच उभा असलेला एकजण म्हणाला, 'हे लोक अगदी डोळ्यांतलं काढतात. त्या दिवशी पहाता पहाता माझं पेन मारलं, या हरामखोराला पोलिसांच्या स्वाधीनच करायला हवा होता !'

'हरामखोर !' बुलाकीरामचा राग अधिक अनावर झाला. हातात सुरा असता आणि संधी मिळाली असती तर त्यानं आतासुद्धा याचं उत्तरं दिलं असतं; परंतु ती ही वेळ नव्हे, असं त्याला वाटलं.

मासळीबाजाराच्या अरुंद गल्लीत अजून अंधार पडला नव्हता. ट्राम, बसेस, रिक्शा आणि टॅक्सी यांची जोरात धावपळ चालली होती. बुलाकीनं फुलं चितारलेला रुमाल खिशातून काढला आणि नाक, तोंड पुसलं. परत कुबड्यांच्या सहाय्याने तो पावलं टाकू लागला. डोकं दुखत होतं. लाथा-बुक्क्यांचा मार बसल्यामुळं सारं शरीर ठणकत होतं.

थोडा वेळ कुठं तरी बसलं पाहिजे. चहा मिळाला असता तर बरं झालं असतं.

अंधःकार पसरू लागला आहे. डोक्यावर टोपी घातलेले विजेचे दिवे जळत आहेत. हदुवा तळ्याच्या किनाऱ्यावर झाडांवर बसलेल्या कावळ्यांची कावकाव चालली आहे. बगीचा लोकांनी गजबजून गेला आहे. त्या ठिकाणी बसण्यात अर्थ नाही. कुठे तरी एकांतात बसलेलं बरं.

'हरामखोर !' ही शिवी बाणाच्या वेगानं अजूनहि त्याच्या तोंडातून बाहेर पडत होती. रागाचा पारा अद्याप उतरला नव्हता. मासळीबाजाराच्या गल्लीत त्याच्याजवळ सुरा असता आणि त्या लोकांपैकी कुणी भेटता तर...! त्याचा राग अजूनहि शब्दरूप घेऊन बाहेर पडत होता. आता चालवत नाही, लाकडाचा पाय आता खूप जड वाटतोय्.

त्याची मेहेरजान नामक रखेली चितपूर-रोडच्या गल्लीत लाइट पोस्टाजवळ केशरी रंगाचं पातळ परिधान करून उभी आहे. बरेच दिवस झाले तिला काहीच दिलं नाही. बिचारीला वाईट वाटेल तिचं वय बरंच असावं. पावडरचा लेप वय झाकू शकत नाही. आगपेटीवर काडी ओढून गिऱ्हाईक तिचा चेहरा पहातं आणि पुढं सरकतं. महागाईचे दिवस. मोठ्या कष्टानं ती जगत आहे; परंतु बुलाकीरामला मेहेरजाननं कधीच निराश केलं नाही. ती त्याच्यावर प्रेम करते. कुणास ठाऊक, भीतीनं का कशानं ? सिंहासारखा हिंसक आणि नागासारखा तो भयंकर आहे. तो एका पायानं लंगडा आहे; परंतु त्यानं केलेला सुऱ्याचा वार कधी वाया जात नाही. म्हणूनच मेहेरजान त्याच्यापुढं आत्मसमर्पण

करते. त्यांच्या प्रेमाच्या गोष्टी चालतात. ती स्वतः त्याला हातानं लहान मुलासारखं भरवते– बुलाकीराम पण आपलं कर्तव्य करतो. खरोखरच मेहेरजान मोठ्या आपत्तीत आहे. तिचं पातळ फाटलं आहे. खायला नाही.–दिवसेंदिवस तिचा चेहरा फिक्कट पडत चालला आहे. अशा वेळी बुलाकीरामनं तिला थोडीफार मदत करायला हवी. कमीत कमी एखादं पातळ तरी घेऊन द्यायला हवं.

किती अलगदपणे पाकीट मारलं होतं. चांगले पाचशे रुपये त्यात होते. थोडक्यात हुकलं. नाही तर आता दुसरीकडं भटकत जायला लागलंच नसतं. आता कुठं तरी दूर गेलं पाहिजे.

' ए रिक्षा '

टुन टुन टुन आवाज करीत रिक्षा आली.

' कुठं जायचं ?'

' गंगाकिनाऱ्यावरील रयतल्ला घाटाकडं! '

' आठ आणे पडतील !' रिक्षावाल्यानं संशयी नजरेनं त्याला न्याहाळलं.

' चालेल. चल !'

टुन टुन टुन आवाज करीत रिक्षा निघाली. सेंट्रल एव्हेन्यूवरून रिक्षा चालली आहे. त्यापुढं मस्जिदवाडी मोहल्ल्यात कोपऱ्यावर मेहेरजानचं घर आहे. परत बुलाकीरामला आठवण झाली पाचशे रुपयांची.

' मला पकडलेला तो माणूस सापडला तर सोडणार नाही हरामखोराला–'

दोन्ही बाजूंना गगनचुंबी इमारती असलेल्या त्या लांबलचक रस्त्यावर वहाणारी सध्याकाळची थंड हवा बुलाकीरामला सुखवीत होती. स्ट्रँडरोडवरून रिक्षा पुढं घाटाच्या रोखानं चालली होती. बुलाकीरामच्या जिवात जीव येऊ लागला. रस्त्यात मेहेरजानसारख्या किती तरी स्त्रिया भेटल्या; परंतु त्या सगळ्याच मेहेरजान नव्हत्या. पैशाशिवाय त्या प्रेम करीत नाहीत. त्यांची पण स्वतःची वेगवेगळी गिऱ्हाइकं आहेत.

स्ट्रँडरोडवरची रेल्वेलाइन ओलांडून रिक्षावाला रयतल्लाघाटाजवळ येऊन पोहोचला.

रेल्वेलाइनवर फुस् फुस् करीत एक इंजिन उभं होतं.

' उतरा, गंगेचा किनारा आला. '

' थांब जरा. मी लंगडा माणूस. जरा सावकाश. '

लाकडाचा पाय जमिनीवर टेकवीत तो म्हणाला. उतरताना त्याचा तोल गेला; पण रिक्षावाल्यानं त्याला सावरलं. लोकांनी मारून मारून त्याला बेदम केलं आहे. शरिरात ताकद राहिली नाही. त्यानं खिशातून आठ आण्यांचं नाणं काढून ते रिक्षावाल्याच्या हातावर टेकवलं. दोन-अडीच रुपये अजून त्याच्या खिशात शिल्लक आहेत.

समोर गंगा वहात आहे. थंडगार वारा वहात आहे. थंडी पडलीय; परंतु बुलाकीरामला आता बरं वाटू लागलंय्. अशा हवेची जणू त्याला आवश्यकताच होती. याचीच तो वाट पहात होता. थोडक्यात पेटलेला क्रोधाग्नि आता विझला.

सगळीकडे शांतता पसरली आहे. त्यात थंड हवा वहात आहे, घाटावर फक्त दोन माणसं बसली होती. थंडी पडलेली पाहून तीपण निघून गेली. पायऱ्या उतरून बुलाकी खाली आला. दोन हातांची ओंजळ करून तो पाणी प्याला अन् तोंडहि धुतलं. आता त्याचा अर्धाअधिक शीण गेला होता. गंगाकाठच्या थंड हवेत झोप येण्याची जादू आहे. किती बरं वाटलंय आता. अंग ठणकायचं बरं झालंय. चटकन् झोप पण लागेल. आगपेटी आहे. जर विड्या असत्या तर थोडा फार वेळ तरी गेला असता. जवळ दुकान आहे; पण कोण जाईल ? चार-दोन पायऱ्या चढून तिथंच तो झोपला.

थंडगार वारा वहात होता. काही तासांपूर्वी घडलेली घटना त्याला एखाद्या स्वप्नासारखी वाटत होती.

मेहेरजान आणि तो, डलहौसी-स्क्वायरवरून शामबाजारकडे निघालेली ट्राम, पाचशे रुपयांनी भरलेलं पाकीट. त्यानंतर......
त्यानंतर ....बुलाकी झोपी गेला.

गंगानदीच्या काठावर अंधःकार पसरला होता. त्यावर हावऱ्याचा उजेड कृष्णपक्षातल्या चांदण्याप्रमाणं टिपकत आहे. झोपेत बुलाकीला स्वप्न पडलं.

तो झिंगलेल्या स्थितीत मेहेरजानच्या दरवाजाजवळ येऊन पडला आहे. तिनं बादलीभर थंड पाणी त्याच्या डोक्यावर ओतलं आहे. थंडीनं दारू उतरली आहे. तो खडबडून उठून बसलाय् आणि पखानं हवा घालीत आहे. घाटावर अंधःकार आहे. आकाशात ढगांच्या आड तारे लपून बसले आहेत. गंगा जोरानं वहात आहे.

बुलाकी दारू प्याला नव्हता. मेहेरजानपण जवळ नव्हती. मार खाल्ल्यामुळ होणाऱ्या



वेदना विसरण्यासाठी तो इथं झोपला होता. उठणार होता; पण चाचरला. सगळीकडे अंधःकार पसरलेला. कुणी तरी पांढरीशुभ्र वेषधारी व्यक्ती पायऱ्या उतरून खाली चालली होती. या अंधःकारात त्या व्यक्तीला बुलाकीराम दिसला नव्हता. बुलाकीराम कान देऊन ऐकत होता. एका स्त्रीचा रडण्याचा आवाज आला. दबक्या आवाजात एक तरुणी रडत होती. पायऱ्या उतरून ती पाण्याच्या रोखानं चालली होती. सर्वनाश...!

बुलाकीच्या मनात विचार आला, ही तरुणी आत्महत्या तर करायला चालली नाही ना ? इतक्या काळोखात ही कशासाठी चालली आहे ? याचा अर्थ काय ? कुबड्यांच्या सहाय्यानं ताडकन् उठून तो उभा राहिला.

त्यानं विचारलं ' कोण आहे ?'

' कोण आहात तुम्ही ?' तरी सुद्धा उत्तर मिळालं नाही. जणू एखादी दगडाची मूर्तीच. ती तरुणी थरथर कापत होती. बुलाकी तिच्यापुढं जाऊन उभा राहिला.

' तुम्ही कोण आहात, इथं काय करता ?'

रडता रडता ती त्याला म्हणत होती, ' मला सोडा, दया करा माझ्यावर. मला पोलिसांच्या स्वाधीन करू नका !'

बुलाकीचं अंतःकरण हेलावलं. खून नाही, गुंडगिरी नाही, दारुबाजी नाही. या वेळी त्याला परोपकार करण्याची एक नामी संधी मिळाली आहे. एक महान कार्य, जे करण्याचं भाग्य त्याला आतापर्यंत कधीच लाभलं नव्हतं. या क्षणाला जणू त्याला नवं रूप प्राप्त झालं आहे.

' घाबरू नका मी पोलीस नाही. ' आगपेटीवर त्यानं काडी पेटविली. त्या उजेडात एक वीस-बावीस वर्षांची चांगल्या घराण्यातील तरुणी हातात काही तरी घेऊन उभी होती.

गळ्यात सोन्याचा हार. बुलाकीच्या मनात आकर्षण निर्माण करून काडीचा उजेड समाप्त झाला. मनातल्या मनात तो पुटपुटला, बऱ्याच पैशाची जरुरी आहे, निर्जन घाटावर एक तरुणी आणि इकके दागिने ! '

लोखंडासारखे दोन हात पुढं करायचा अवकाश ... परंतु नाही ! असं होता कामा नये. आज एक भाग्याचा क्षण आला आहे. आज तो लोभाचा अंगीकार करणार नाही. त्या तरुणीला तो वाचवील. वाटेल ते झालं तरी आज तो तिला जीव देऊ देणार नाही.

बुलाकीनं विचारलं, ' आपल्याजवळ कपड्यात गुंडाळलेलं काय आहे ? '

बुलाकीच्या जिव्हाळ्याच्या बोलण्यामुळं तिनं बोलण्याचा प्रयत्न केला. त्या तरुणीला वाटलं खरोखरच हा पोलीस नाही. मला भिण्याचं काहीच कारण नाही. ती तरुणी कापऱ्या आवाजात म्हणाली, ' हे माझं तान्हं मूल आहे. '

' एक नवजात बालकाला घेऊन तुम्ही जीव द्यायला निघालात ?'

त्या तरुणीचे डोळे आसवांनी डबडबले. तिनं काहीच उत्तर दिलं नाही. बुलाकी म्हणाला, ' आत्महत्या का करता ? याच्यासारखं दुसरं पाप नाही. आत्महत्या केल्यावर भूतयोनीत प्रवेश मिळतो. परमेश्वरानं आत्मा दिला तो अशा रीतीनं नष्ट करण्यासाठी ?'

असं किती तरी एखाद्या महात्म्याप्रमाणं बुलाकी बोलून गेला; परंतु आपण स्वतः काय करतो हा विचार मनात येताच त्याला लाजल्यासारखं झालं. तो त्या तरुणीला उपदेश करीत होता. पण जीवनात असं काहीच शिल्लक राहिलं नव्हतं की, जे बुलाकीनं केलं नाही.

आज या मुहूर्तावर बुलाकीचं परिवर्तन झालं आहे. त्याच्या ओळखीच्या समव्यवसायी दोस्तांना जर हे कळलं तर काय वाटेल ?

बुलाकी म्हणाला, ' तुम्हाला कसला त्रास आहे ? तुमचे पति दारुबाज आहेत, तुम्हांला मारझोड करतात हाच ना ? '

तरुणीनं मान हलविली.

बुलाकी हसला अगदी मनापासून. आज त्याचं परिवर्तन झालंय. तो दुसऱ्याला जसं दुःख देत होता तसं आज तो दुसऱ्याचं दुःख देखील दूर करू शकत होता.

तो म्हणाला, ' एवढासा त्रास होतो म्हणून तुम्ही जीव द्यायला निघालात ?

माझं नाव बुलाकीराम आहे. लक्षात असू द्या. मी मुर्गीहट्टयातला एक कुप्रसिद्ध मवाली आहे. मी कुणाचाहि खून करायला भीत नाही.'

ते ऐकून त्या तरुणीनं एक अस्फुटशी किंकाळी फोडली. तेव्हा मोठ्यानं हसून बुलाकी म्हणाला, ' तुम्ही भिऊ नका मला. तुमच्या पतीचं नाव सांगा. असा त्याला नरम करतो की, त्यानं परत त्रास देता कामा नये. मी तुम्हांला तसं वचन देतो !'

मध्यरात्रीच्या त्या थंडीनं ती तरुणी काकडली होती. गंगेच्या लाटांचा आवाज, झाडांच्या पानांमधून वाऱ्यामुळं निघणारा सळसळ आवाज आणि ती नीरव शांतता जणू म्हणत होती,

' जाऊ दे, तिला भीती वाटते. '

बुलाकी म्हणाला, ' आपणाला भीती वाटते ? मी मवाली आहे. कदाचित तुमच्या पतीला बडवून काढीन हीच ना ? पतीची एवढी काळजी घेता आणि तो भांडतो, मारतो म्हणून जीव द्यायला निघालात ! स्त्रिया अशाच असतात ' —

आणि तो हसला व पुढे म्हणाला, ' जाऊ द्या. तुमच्या पतिराजांना यातला एक शब्द सांगणार नाही की बोलणार नाही; परंतु माझा पत्ता लक्षात असू द्या. आपण कुठल्याहि आपत्तीत सापडला; तर ताबडतोब मला कळवा. त्या वेळी जेलमधे नसलो तर वाटेल ते करीन तुमच्यासाठी. ' बुलाकीनं आपला पत्ता सांगितला. ' राहील ना ध्यानात ?'

लहानपणी त्याला कळत नव्हतं तेव्हा त्याची आई निवर्तली होती. मनात कल्पना करून देखील त्याला त्याच्या आईचं रूप आठवत नव्हतं. त्या तरुणीच्या रूपात तो स्वतःच्या आईलाच पहात होता.

जळत्या काडीच्या उजेडात त्या तरुणीच्या गळ्यातलं सोन्याचं लॉकेट त्याला दिसलं होतं. मनात आणलं असतं तर लॉकेट घेऊन त्या तरुणीचा खून करून प्रेत गंगेत टाकून त्याला पसार होता आलं असतं.

नाही, नाही ! तो त्याच्या अंतःकरणातल्या सैतानाला आता आश्रय देणार नाही. परिवर्तनाचा असा सुवर्णक्षण परत येणार नाही. आतापर्यंतचं त्याचं सारं आयुष्य जुगार, दारू, वेश्या यांच्या संगतीत गेलं आहे. त्याला आठवण येत राहील या रात्रीची, अचानक भेटलेल्या या तरुणीची.

' परत चला घरी. ' तो म्हणाला. तरुणी जागच्या जागी उभी होती.

' तुम्हाला भीति वाटते काय ? चला मी येतो घालवायला. मी नावाचा बुलाकीराम आहे. जोपर्यंत मी तुमच्याबरोबर आहे तोपर्यंत तुमच्या अंगाला हात लावण्याची कोणाची छाती होणार नाही. मी तुम्हाला आई मानलं आहे. माझ्यासारखा तुमचा

मुलगा बरोबर असताना भिण्याचं कारण काय ?'

ती तरुणी विचारात पडली. परत फिरायला तिचं मन धजत नव्हतं. इतकं समजावलं तरी ती तरुणी आपलं ऐकत नाही हे पाहून त्याला वाईट वाटलं. परत तो म्हणाला,

'चला ना !'

'पण ?'

'पणबीण काही नाही. आता चलायलाच हवं ! तुमचं घर कसं आहे ते पाहीन !' ती तरुणी आता चालू लागली. स्टँडरोडवरून अंधःकारात तो दोघं चालली होती. कुणी काहीच बोलत नव्हतं. त्या तरुणीच्या मनांत काय विचार चालले होते कुणास ठाऊक. बुलाकीपण मनातल्या मनात विचार करीत चालला होता.

किता आश्चर्य आहे नाही ? बुलाकीनं जणू दुसरा जन्म घेतला आहे. रेल्वेलाइन ओलांडल्यावर गल्लीच्या कोपऱ्यावर ती अचानक थांबली.

'का, चालवत नाही ? त्रास होतोय ? बरं असं करा. बाळाला द्या माझ्याजवळ !'

दूरवर एका दिव्याचा फिक्कट प्रकाश दिसत होता. त्या तरुणीनं कसला तरी निश्चय केला.

'घाबरू नका. मवाली असलो म्हणून बिघडलं कुठं ? बाळाला हातावर घेऊ शकेन.'

'बाळ झोपलं आहे !' ती तरुणी उत्तरली.

'झोपू द्या. त्याला उठवणार नाही मी.' कपडयात लपेटलेलं ते तान्हं मूल बुलाकीनं जपून दोन्ही हातात घेतलं.

ती तरुणी म्हणाली, 'मला पुढं चालताना भीती वाटतेय.'

'बरं मी पुढं चालतो.' बुलाकी पुढं चालू लागला. एका गल्लीतून दुसऱ्या गल्लीत. बुलाकीनं तान्ह्या मुलाला छातीशी धरलं होतं. त्याची झोपमोड होऊ नये म्हणून तो जपत होता. मवाली बुलाकीराम आज एका तान्ह्या मुलाला छातीशी धरून चालला होता. आज त्याचं परिवर्तन झालं. त्याच्या मित्रांना कळलं तर... . तर आश्चर्य वाटेल. अशा विचारांच्या तंद्रीत तो चालत होता. अचानक बॅटरीचा प्रकाशझोत त्याच्या चेहऱ्यावर पडला. त्यामागोमाग आवाज आला,

'कोण आहे ?'

समोरून एक इन्स्पेक्टर आणि दोन पोलीस त्याच्या रोखानं आले.

'तुझ्याजवळ काय आहे ?'

'एका मातेचं एक तान्हं मूल !'

'त्याची आई कुठं आहे ?'

बुलाकीनं वळून मागं पाहिलं. त्याला ती तरुणी दिसली नाही. बुलाकीच्या डोळ्यांपुढं काजवे चमकले. बॅटरीच्या उजेडात काळोखात बुडालेली गल्ली उजळून निघाली आहे.


'दाखव ते तान्हं मूल !'

बुलाकीला जास्त त्रास घ्यावा लागला नाही. बॅटरीच्या उजेडात पोलिसांनी पाहिलं. रक्तानं न्हाऊन निघालेलं एक तान्हं मूल... गळा दाबून त्याला मारलं होतं.

बॅटरीच्या उजेडात दिसणारं ते भयानक दृश्य म्हणजे पाताळपुरीतलं जणू दुःस्वप्नच होतं.

'खुनी, हरामखोर !' म्हणून इन्स्पेक्टरनं बुलाकीच्या डोक्यात एक जोरदार थप्पड लगावली. चक्कर येऊन बुलाकी धाड्कन् जमिनीवर कोसळला. डलहौसी स्क्वायरमध्ये खिसा कापताना पकडला गेल्यावर, लोकांचा मार खाल्ल्यावर कोसळला होता तसाच.

थोडयाच वेळापूर्वी अंधःकारात बुडालेली गल्ली आता अनेक बॅटऱ्यांच्या उजेडात उजळून निघाली होती.–परिवर्तनाचा आलेला तो सुवर्णक्षण आता सीमाहीन अथांग सागरात बुडून गेला होता. ☐ ☐





– खास पुस्तक पुरवणी

# सूर्याला न्याहाळणारा गरूड

सूर्याला न्याहाळणारा गरूड

कमलाकर धारप

## १ : ब्लेनहीमचा राजवाडा

ब्लेनहीम राजवाडा ! राजवाडा कसला छोटेखानी किल्लाच तो !

त्याचा विस्तारच मुळी दोन हजार सातशे एकर जमिनीवर पसरला होता. या विस्तारात ठायीठायी रेखीव ताटवे असलेल्या बागा होत्या. त्या बागांतून मॅपल, मेरीगोल्ड, लिली, मग्नेलिया ही फुलं सदैव बहरलेली असायची. या बागांच्या विस्तारात ब्लेनहीमचा राजवाडा दिमाखात उभा होता. त्याच्या दर्शनी भागात रेखीव हिरवळ होती आणि राजवाड्याच्या प्रवेशद्वारावर असलेले दोन दगडी गोलाकार खांब, त्या राजवाड्याचा सारा भार आपल्या अंगावर घेत उभे होते.

हा राजवाडा राणी अॅननं जॉन चर्चिलला भेटीदाखल दिला होता, त्यानं स्पेनच्या युद्धात गाजविलेल्या मर्दुमकीबद्दल. जॉन हा मार्लबरोचा पहिला ड्यूक होता. या राजवाड्यात तीनशेवीस खोल्या होत्या व त्याची संपूर्ण रचना व्हॅनब्रू या कलाकाराने केली होती.

ब्लेनहीमच्या राजवाड्यात त्या दिवशी नृत्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. वाद्यांच्या तालावर राजघराण्यातील जोडपी मजेत झुलत होती. सुगंधाचा मंद दरवळ सर्वत्र पसरला होता. रेशमी वस्त्रांची सळसळ आणि आभूषणांची झगमग त्या वातावरणाला अधिक मोहक बनवीत होती. पिआनोचे आर्त स्वर वेगवेगळी आवर्तनं घेत होते आणि त्या आवर्तनाबरहुकूम पावलांच्या हालचाली होत होत्या. मोजकी पावलं, मोजक्या गिरक्या, माफक हास्य, हातातल्या पंख्यांची हळुवार हालचाल. तो अपूर्व, मन बेभान करणारा नृत्यसोहळा पहात

लेडी चर्चिल उभी होती. नृत्याच्या त्या रंगोल्लासात स्वतःला बुडवून टाकण्याची अनिवार इच्छा तिच्या मनात उफाळून येत होती, पण तिची अवस्था तिला तसं करण्यापासून परावृत्त करीत होती. कारण ती गर्भार होती आणि तिचे दिवस भरत आले होते.

खरं म्हणजे तिनं इथपर्यन्त यायलाच नको होतं; पण राजवाड्यात नृत्यसोहळा सुरू असताना स्वतःच्या महालात एकटं पडूनही तिच्या ज़िवाला बरं वाटत नव्हतं.

तिला आठवत होते न्यूयॉर्कमधील ते सुखद क्षण. रॅन्डॉल्फच्या सहवासात घालवलेले ते भुरळ घालणारे दिवस. त्या वेळी ती जेनी होती आणि तो होता निव्वळ रॅन्डॉल्फ. ऐन पंचविशीतला एक तरुण लॉर्ड. सातव्या ड्यूक ऑफ मार्लबरोची कुळी सांगणारा. कोण्या बेटावर त्या दोघांची गाठ पडली आणि तेथील दोन दिवसांच्या वास्तव्यात त्या भेटीचं प्रणयात रूपांतर केव्हा झालं हे त्यांचं त्यांनाच कळलं नाही.

जेनीच्या काळ्याभोर, अथांग डोळ्याकडे रॅन्डॉल्फ तासन् तास पहात बसायचा, तर जेनी कधी हातात रंगफलक घेऊन त्याचे चित्र रेखाटायची, नाही तर कधी पिआनोवर प्रणयाचे आर्त स्वर आळवीत बसायची.

तिचे वडील लिओनार्ड जेरोम हे रेसकोर्सचे मालक होते आणि त्यांनी स्वतःचं खाजगी ऑपेरा हाउस बांधलं होतं. न्यूयॉर्क टाइम्स या वृत्तपत्रात त्यांची भागिदारी होती. ट्रीस्टे येथील अमेरिकेचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी काही काळ काम पाहिले होते आणि नंतर ते न्यूयॉर्क येथे स्थायिक झाले होते.

जेनीशी असलेल्या प्रणयाची वाच्यता रॅन्डॉल्फने एका पत्राद्वारे आपले वडील ड्यूक ऑफ मार्लबरो यांचेजवळ केली. ड्यूक व डचेसना हा संबंध मानवण्यासारखा नव्हता. त्यांनी त्यास याविषयी 'पुढे पाहू' असे कळविले.

पण त्यानंतर १८७४ च्या एप्रिलमध्ये रॅन्डॉल्फ हा ब्रिटिश पार्लमेंटवर निवडून आला आणि त्यानंतर लगेच त्यानं जेनीशी विवाह केला.

विवाहानंतर ते दोघे लंडन येथेच राहू लागले. सवड काढून ते ब्लेनहीम राजवाड्यात ड्यूक आणि डचेस यांच्या भेटीस जायचे. ब्लेनहीम राजवाडा हा ऑक्सफर्ड परगण्यात वुडस्टॉक येथे होता. तेथून लंडनला जाऱ्ये करणं त्यांना सहज शक्य होई.

या वेळी देखील जेनी नृत्याचं निमित्त करून ब्लेनहीम राजवाड्यात आली होती. डॉक्टरांची मनाई असतानादेखील !

राजवाड्याच्या त्या भव्य नृत्यमहालात उभं राहून नृत्य करणाऱ्या जोडप्यांना न्याहाळत असताना जेनीच्या दृष्टीसमोरून तिचा जीवनपट असा झरझर सरकला. त्या आठवणींनी तिच्या अंतर्यामात एक सुखद कळ उमटली आणि पाठोपाठ जीवघेण्या कळा सुरू झाल्या.

जेनीला जाणवलं की ज्या क्षणांची ती वाट पहात होती तो क्षण जवळ येऊन ठेपला आहे. नृत्यमहालातून घाईघाईने निघून ती लायब्ररीच्या खोलीत आली. ही खोली तरी केवढी लांब होती ! हे अंतर ती कसं काय पार करणार होती ? आणि त्या लायब्ररीनंतर येणारा, एखाद्या न संपणाऱ्या बोगद्याप्रमाणे दिसणारा कॉरिडॉर. तो ओलांडून ती आपल्या खोलीपर्यन्त कशी पोचणार होती.

तिचे पाय मध्येच लटपटू लागले. तिच्या घशाला कोरड पडली आणि कळा तर अशा जीवघेण्या उमटू लागल्या की ओटीपोट फुटतंय की काय असं तिला वाटू लागलं. ज्या राजवाड्याच्या भव्यतेचा नेहमी अभिमान वाटायचा, त्याच राजवाड्याचा या क्षणी तिला भयंकर संताप आला होता. साधं तिच्या खोलीपर्यंत चालायला तिला फर्लांग–दीड फर्लांग अंतर चालावं लागत होते.

पण ती तिच्या खोलीपर्यंत पोचू शकली नाही.

भिंतीचा आधार घेत ती बाजूच्याच खोलीत शिरली. ब्लेनहीम राजवाड्यात त्या रात्री नृत्यासाठी आलेल्या स्त्रियांचे फरचे कोट, व्हेलव्हेटचे अंगरखे, रेशमी गळपट्टे त्या खोलीत टांगले होते.

त्याच खोलीत जेननं आपल्या पहिल्या अपत्याला जन्म दिला. त्याचं नाव ठेवण्यात आलं 'विन्स्टन.'

विन्स्टन लिओनार्ड स्पेन्सर चर्चिल.

चर्चिल लहान असताना अक्षरशः किंचाळायचा. त्याची आजी कौतुकानं म्हणायची, 'मला पायलीभर पोरं झाली; पण त्या पोरांचं रडणं कसं माफक असायचं. हे पोर भारीच आक्रस्ताळी आहे !' आणि ती कौतुकानं चर्चिलचं चपटं नाक चिमटीत ओढायची आणि त्याच्या नाकाचा शेंडा लालीलाल व्हायचा !

लहानगा चर्चिल दिसायला अजिबात देखणा नव्हता. त्याचे केस तांबूस आणि टोकाशी कुरळे झाले होते. त्याचं नाक व तोंड बसकं होतं. याउलट त्याची आई जेनी दिसायला सुंदर होती लांब पायघोळ झगा परिधान केला की ती एखाद्या परीसारखी दिसायची. चर्चिलचं आपल्या आईशी अजिबात साम्य नव्हतं. त्याच्या चेहऱ्यावर मस्तवालपणाची छटा होती आणि लहानपणी ती व्रात्य म्हणूनच ओळखला जायचा.

चर्चिलचे वडील रॅन्डॉल्फ हे राजकारणात गुंतलेले असायचे तर आई सामाजिक समारंभात व्यस्त असायची. त्यामुळं आपले आई–वडील चर्चिलच्या वाट्याला कधी यायचेच नाहीत. त्याची गाठ पडायची ती त्याला सांभाळणाऱ्या दाईशी.

या दाईचं नाव होतं एव्हरेस्ट. ती चर्चिलला सांभाळायची. त्याल हिंडायला न्यायची.

एकदा ती त्याला एक मूकनाट्य दाखविण्यासाठी घेऊन गेली असता वाटेत त्यांना खूप मोठा जमाव दिसला. त्या जमावानं त्यांना पुढे जाऊ दिलं नाही. कारण ज्या नाट्यगृहात मूकनाट्य पाहण्यासाठी ते जाणार होते त्यालाच आग लागली होती

'त्या आगीत नाट्यगृहाचा व्यवस्थापक पार जळून गेला. त्याच्या खिशातल्या किल्ल्याच काय त्या शिल्लक उरल्या.' त्या गर्दीतलं कुणी तरी म्हणालं.

त्यावर लहानगा चर्चिल, 'मला त्या किल्ल्या पाह्यच्या आहेत' असा हट्ट धरून बसला !

शाळेतदेखील चर्चिल असाच हटखोरपणा करायचा.

ॲस्कॉट येथील जेम्स या शाळेतील शिस्त अतिशय कडक होती. त्या शाळेचे हेडमास्तर भारी रागीट आणि मारकुटे होते. शाळेतील मुलांना ते भरपूर मार द्यायचे. त्या मारानं पोरांच्या अंगावर वळ उठायचे आणि कधीकधी अंगातून रक्तदेखील निघायचं. या

मारातून चर्चिलचीदेखील सुटका झाली नाही. त्याचा सूड म्हणून चर्चिलनं एकदा त्या हेडमास्तरची हॅट पायाखाली तुडवून तिचा पार चेंदामेंदा करून टाकला !

अभ्यासात चर्चिलची प्रगती शून्यच होती. सेन्ट जेम्समधून तो हॅरोत गेला खरा; पण तिथं तो सारखा नापास होत राहिला. त्याला लॅटिन शिकणे अजिबात आवडायचे नाही; पण इंग्रजीचा त्याला अभिमान वाटायचा. शेक्सपिअरच्या नाटकातील प्रसंगच्या प्रसंग तो घडाघड पाठ म्हणून दाखवायचा.

चर्चिल लहानपणापासून बेडर होता. भीती ही त्याला कशी ठाऊकच नव्हती. एकदा त्यांच्या शाळेत एक तलवारबहाद्दर आला होता. मुलाच्या डोक्यावर सफरचंद ठेवून तलवारीच्या वारानं तो त्या सफरचंदाचे सफाईने दोन तुकडे करायचा. हा प्रयोग त्यानं त्या शाळेत करायचा ठरवलं. तेव्हा डोक्यावर सफरचंद ठेवून घ्यायला एकही मुलगा तयार होईना. त्या वेळी चर्चिल आपल्या जागेवरून उठला आणि तो तडक त्या तलवारबहाद्दरासमोर मान वाकवून उभा झाला !

चर्चिलला लहानपणापासूनच अभ्यासाऐवजी लढाईचे खेळ आवडत. त्याच्या खोलीत खेळण्यातले सैनिक, खेळण्यातल्या बंदुका यांचा पसारा पसरलेला असायचा. त्या सैनिकांना घेऊन तो लुटुपुटूची लढाई खेळायचा. त्या वेळी त्याची खोली रणमैदान बनायची. सैनिक आडवेतिडवे खाली कोसळायचे आणि मोठमोठे किल्ले जमीनदोस्त व्हायचे. हा लढाईचा खेळ खेळताना त्याच्यापुरता तो खेळ उरायचाच नाही, तर खरीखुरी लढाईच तेथे आकाराला यायची.

लॉर्ड रॅन्डॉल्फना आपल्या या मुलाच्या भवितव्याविषयी काळजी वाटू लागली होती; कारण त्याचं अभ्यासात मुळीच डोकं चालत नव्हतं. यानं अभ्यास केला नाही तर तो पुढे शिकणार तरी कसा होता आणि त्यांच्या स्वप्नातला वकील तरी कसा होणार होता ?

चर्चिलची लढाईची आवड ध्यानी घेऊन लॉर्ड रॅन्डॉल्फनी त्याचं नाव लष्करी शिक्षण देणाऱ्या वर्गात टाकलं.

ज्या लुटुपुटूच्या लढाईची चर्चिलला आवड होती, ज्या खेळण्यातल्या सैनिकांशी तो तासन् तास खेळत बसत असे, त्या खेळण्यांनीच त्याच्या आयुष्याला कलाटणी दिली व त्याच्या शिक्षणाला आकार दिला. येथून चर्चिलच्या जीवनाला खरी दिशा मिळाली आणि त्याच्या जीवनाचं भरकटलेलं तारू संथपणे वाटचाल करू लागलं. ◻

## २ : सदैव सैनिका पुढेच जायचे

चर्चिलचे लष्करी शिक्षण सँढर्स्ट येथील लष्करी महाविद्यालयात सुरू झाले. या महाविद्यालयात कॅप्टन जेम्स नावाचे एक शिक्षक होते. त्यांना चर्चिलचा निडरपणा व धैर्य मनापासून आवडायचे; पण शिक्षणात चर्चिलची प्रगती शून्य होती ! 'हा पोरगा हॅरो विश्वविद्यालयातून इथे कसा काय आला कुणास ठाऊक !' असे उद्गार जेम्सने त्याच्याविषयी बोलताना काढले. म्हणण्याचा अर्थ एवढाच की हा परीक्षा तरी कसा काय उत्तीर्ण झाला ?

पण नियतीनं चर्चिलसाठी लष्कराचं क्षेत्र निश्चित केलं होतं हेच खरं; कारण सँढर्स्ट येथे शिक्षण घेत असताना तो एका पुलावरून खाली कोसळला. त्यानंतर सतत तीन दिवस तो बेशुद्धच होता. नंतरही महिनाभर तो अंथरुणावरून उठू शकला नाही. या घटनेचा फायदा असा झाला की या सक्तीच्या विश्रांतीचा उपयोग त्याच्या अभ्यासासाठी झाला आणि लष्कराची प्रवेश-परीक्षा तो उत्तीर्ण होऊ शकला. अखेर गंगेत घोडे न्हाले म्हणायचे !

याच वेळी चर्चिलचे वडील लॉर्ड रॅन्डॉल्फ यांचे निधन झाले. त्यानंतरचा काही काळ चर्चिलने ब्लेनहीमच्या राजवाड्यात घालवला; पण अंतर्यामी तो अत्यंत अस्वस्थ झाला होता. कारण त्याची आजी त्याचा मनातून राग करायची. विन्स्टनने ड्यूक बनू नये अशी तिची इच्छा होती.

या वेळी विन्स्टनचा चुलतभाऊ मार्लबरोचा ड्यूक बनला होता. त्याचं त्या वेळी नुकतंच लग्न झालं होतं. त्याच्या बायकोला विन्स्टनच्या आजीनं बजावलं, 'तुला मुलगा झालाच पाहिजे म्हणजे तोच पुढे ड्यूक बनेल. हा विन्स्टन ड्यूक नको हो व्हायला !'

म्हातारीच्या तोंडात बत्तीस दात नव्हते तरी तिची बत्तिशी फळली आणि तिच्या सूनबाईला मुलगा झाला !

म्हातारीला अगदी हायसं झालं !


ब्लेनहीम राजवाड्यातील सुखाचा काळ संपून चर्चिलचा लष्करातील कष्टाचा काळ सुरू झाला. त्याला लष्करात लेफ्टनंटचा हुद्दा मिळाला होता. चौथ्या हुस्सार पथकावरोबर तो भारतात आला; पण या पथकाला पोलो खेळण्यापलीकडे काहीच काम करावे लागले नाही. त्यामुळे या एकसुरी जीवनाला चर्चिल कंटाळला आणि आपल्या अंगभूत धाडसाला साजेशा कामगिरीचा तो शोध घेऊ लागला.

याच वेळी सरहद्दप्रांतात उद्भवलेल्या पठाणांच्या बंडाचा बंदोबस्त करण्याची कामगिरी विन्स्टनचा दोस्त सर ब्लिडन ब्लड याचेकडे सोपविण्यात आली होती. या कामगिरीवर आपल्याला न्यावे अशी चर्चिलने ब्लिडनला गळ घातली. ब्लिडनने त्याला आपल्याबरोबर नेले आणि युद्ध-वार्ताहर म्हणून चर्चिलने या बंडासंबंधीची जी वार्तापत्रे लंडनच्या 'डेली टेलिग्राफ'कडे पाठविली ती वाचकांच्या पसंतीस उतरली. या बंडाच्या वेळी खैबरखिंडीत जी चकमक उडाली तीत चर्चिलने स्वतः भाग घेतला आणि आपल्या पिस्तुलाने अनेक बंडखोरांना यमसदनास पाठविले.

बंदुकीच्या गोळ्या चर्चिलच्या आजूबाजूने सटासट जात होत्या. 'मारो, चलो'चा ओरडा आसमंतात घुमत होता. हे संपूर्ण वृत्त डेली टेलिग्राफला पाठविताना चर्चिलने एका वार्तापत्रात लिहिले होते,

'माझ्यासमोर उभ्या असलेल्या माणसाच्या छाताडात बंदुकीची गोळी घुसून त्यातून रक्ताच्या चिळकांड्या उडत होत्या. माझ्याशेजारी असलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या उजव्या डोळ्यात गोळी घुसून त्याच्या चेहऱ्याच्या चिंध्या झाल्या होत्या.' इतक्या प्रत्ययकारी वर्णनामुळे चर्चिलची वार्तापत्रे रोचक झाल्यास त्यात नवल ते काय ?

या बंडानंतर चर्चिलने 'द स्टोरी ऑफ द मालाकांड फील्ड फोर्स'


दूरवर डोंगराची एक आडवट रेघ
त्यावर निरभ्र एकपटी आकाश
आकाश प्यालेला तुडुंब डोह
विष प्यालेला कंठ
थिरक थयथयणारा पक्षीराज
बुडीमाऱ्या खंड्या
आकाशावर गर्दपिसारी
ठिपका पाडणारा चाष
स्वैर
अनंत
शांत
निळ्या रंगाच्या अनेक छटा
NEROLAC
ACRYLIC EMULSION
NEROLAC
SOLDIER
WASHABLE DISTEMPER
OIL BOUND
नेरोलॅक

U-GNM-108

हे बंडाच्या अनुभवांवर आधारित पुस्तक हातावेगळे केले. लष्करात नोकरी करून दोन वर्षांत जेवढा पैसा मिळाला नसता तेवढा पैसा या पुस्तकाने त्याला मिळवून दिला. कर्तृत्व गाजविण्याचे नवे क्षेत्र त्याला गवसले.

त्यानंतर चर्चिल इंग्लंडला परतला तो वार्ताहर बनण्याचे स्वप्न पहातच. याच सुमारास द. आफ्रिकेत 'बोअरचे युद्ध' सुरू झाले होते. त्या युद्धाचे वृत्त पाठविण्याचे काम मॉर्निंग पोस्ट या वृत्तपत्राने चर्चिलवर सोपविले. चर्चिलने आपली बॅग भरली आणि तो केपकडे रवाना झाला.

त्या वेळी ईस्टकोर्ट येथे ब्रिटीश लष्कराचे ठाणे होते. या ठाण्यात चर्चिलची कॅप्टन हॅल्डेनशी भेट झाली. या कॅप्टनवर शत्रूच्या प्रदेशातून जाणाऱ्या रेलगाडीच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली होती, त्यामुळे तो अस्वस्थ झाला होता. कारण सामना प्रत्यक्ष मृत्यूशीच होता!

'या वेळी मला 'चार्ज ऑफ दी लाइट ब्रिगेड' या कवितेची आठवण होत आहे.' हॅल्डेन चर्चिलला म्हणाला.

हॅल्डेनची अस्वस्थता ओळखून चर्चिल त्याला म्हणाला, 'भितोस कशाला? मी पण तुझ्याबरोबर येतो. मग तर झालं?'

शत्रूच्या प्रदेशातून त्यांच्या रेलगाडीचा प्रवास सुरू झाला. या गाडीत ब्रिटनचे सैन्य व त्यांचा दारूगोळा भरलेला होता. ईस्टकोर्टपासून काही मैल अंतरावरच बंडखोरांनी या गाडीवर हल्ला चढविला. हॅल्डेनच्या पथकाने गोळीबारानेच या हल्ल्याला तोंड दिले. गोळ्यांचा पाऊस झेलीत त्यांची गाडी झपाट्याने पुढे चालली होती. या साऱ्या अकल्पित घटनेने चर्चिल मोठा खुषीत होता.

तो हॅल्डेनला म्हणाला, 'वा, वा, उत्तम! असाच प्रतिकार सुरू ठेवा म्हणजे मला मॉर्निंग-पोस्टकडे खमंग वार्तापत्र पाठविता येईल!'

पण याच वेळी झालेल्या दारूगोळ्याच्या स्फोटाने त्यांच्या आगगाडीचे मागचे दोन डबे गाडीपासून अलग होऊन रुळावरून खाली घसरले. त्यामुळे गाडी एकाच जागी अडकून बसली. बोअर सैनिकांचा प्रतिकार करीत हॅल्डेनच्या सैनिकांनी रुळावरून घसरलेले डबे गाडीपासून वेगळे केले आणि उरलेल्या डब्यात जखमी सैनिकांना लादून त्यांच्या गाडीने परतीचा मार्ग धरला. दोन डब्यांची नासधूस झाल्याने सगळ्यांना गाडीतून प्रवास करणे अशक्य होते. त्यामुळे काही सैनिक गाडीच्या मागून पायी येत होते. बोअर सैनिक परतले असले, तरी ते केव्हाही परत हल्ला करण्याची शक्यता होती.

सुरुवातीला चर्चिल गाडीतूनच प्रवास करीत होता; पण हॅल्डेनची सोबत करावी या हेतूने त्याने चालत्या गाडीतून उडी टाकली आणि हॅल्डेनच्या पथकाबरोबर त्याने पायीच वाटचाल सुरू केली. त्यांचा पायी प्रवास सुरू असताना अचानक बाजूच्या टेकड्यांवरून घोड्यांवर बसलेल्या असंख्य बोअर सैनिकांनी या पथकावर चाल केली. दोन्ही बाजू गोळीबार करू लागल्या, तशी चर्चिलच्या ध्यानात आलं की हॅल्डेनची सोबत करण्यासाठी त्याने जेव्हा इंजिनातून उडी मारली तेव्हा पिस्तूल असलेला त्याचा कंबरपट्टा इंजिनातच राहिला होता!

क्षणभर चर्चिलला काही सुचेना. अखेर त्याने आपले पिस्तूल आणण्यासाठी गाडीकडे धाव घेतली; पण अर्ध्या वाटेतच त्याचा मार्ग बोअर-सैनिकांनी संगिनींनी अडविला आणि एकाने आपली बंदूक चक्क त्याच्या छाताडावर रोखली!

शरणागतीशिवाय अन्य गती न आढळून आल्याने चर्चिलने हात वर केले आणि बोअर सैनिकांच्या पहाऱ्यात त्याने इतर कैद्यांबरोबर जमीन तुडवायला प्रारंभ केला. त्या डोंगराळ प्रदेशातून वाट तुडवताना चर्चिलच्या पायाची अक्षरशः चाळण झाली. साठ मैल अंतर चालून गेल्यावर या सर्व कैद्यांना एका आगगाडीत कोंबण्यात आले आणि त्यांना प्रिटोरिया येथे नेण्यात आले.

प्रिटोरिया येथे सर्व सैनिकांचे जाबजबाब घेण्यात आले. चर्चिल हा ब्रिटनमधील एका लॉर्डचा मुलगा आहे हे कळल्यावर प्रिटोरिया येथील बोअर अधिकाऱ्यांना झालेला आनंद त्यांना दवडता आला नाही.

'वा, छान तावडीत सापडलास!' एक अधिकारी म्हणाला, 'लॉर्डचा मुलगा वारंवार थोडाच हाती लागत असतो!'

प्रिटोरिया येथे तुरुंगात दिवस काढीत असताना चर्चिल बेचैन होता. साखळदंडानं बांधून टाकलेल्या गरुडाची झेप घेण्यासाठी धडपड सुरू होती. 'इथून पळून गेलं पाहिजे,' 'पळून गेलं पाहिजे!' असा त्याच्या मनानं एकच ध्यास घेतला होता.

एक दिवस पहाऱ्यावर असलेल्या सैनिकांची नजर चुकवून त्याने आवाराच्या भिंतीवरून पलीकडे असलेल्या बागेत आश्रय घेतला आणि लपतछपत तो तेथून सटकला. रात्रीच्या अंधारात, शत्रूच्या अनोख्या प्रदेशात तो वेड्यासारखा धावत होता. या वेळी तो बंधमुक्त झाला होता आणि ही बंधमुक्तता त्याला कसेही करून टिकवायची होती.

त्या अंधारातच त्याला दूरवर सिग्नलचे तांबडे-हिरवे दिवे दिसले आणि त्याच्या धपापणाऱ्या हृदयाने सुटकेचा निःश्वास टाकला. ते दिवे म्हणजे जवळच रेल्वेस्टेशन असल्याची खूण होती. तेथून मिळेल त्या गाडीने तो पुढे जाणार होता, कैद्यांच्या त्या कॅंपपासून तो दूर निघून जाणार होता. सिग्नलच्या रोखाने चालत तो स्टेशनपासून काही अंतरावर उभ्या असलेल्या गाडीपाशी आला आणि आपल्याला कुणी पाहत नाही ना याची खात्री करून त्याने समोर आलेल्या डब्यात उडी घेतली.

कोळशाची रिकामी पोती असलेल्या मालडब्यातून चर्चिलचा प्रवास सुरू झाला. रात्रीच्या अंधारात त्याचा प्रवास किती वेळ सुरू होता कुणास ठाऊक. कारण थकलेल्या चर्चिलला त्या रिकाम्या पोत्यावर अंग टाकताच झोप लागली होती!

त्याला जाग आली तेव्हा पहाट झाली होती. त्या डब्यात बसून राहणं आता धोक्याचं होतं. साधारण हिरवळीची जागा पाहून त्यानं डब्यातून खाली उडी घेतली. हिरवळीवरून गडगडत तो सुरक्षित जागी अडकून राहिला.

चर्चिलने तुरुंगातून सुटका करून घेतली तेव्हापासून त्याचे नशीब त्याला साथ देत होते. या वेळीदेखील त्याने गाडीतून जी उडी घेतली ती नेमकी जॉन हॉवर्ड या ब्रिटीश माणसाच्या मालकीच्या कोळशाच्या खाणीच्या परिसरात पडली होती.

जॉन हॉवर्डने त्याला आश्रय दिला आणि त्याच्यासंबंधी द. आफ्रिकेच्या लष्करी कार्यालयातून काढण्यात आलेले पत्रक त्याला

दाखवले. पत्रकात लिहिले होते,

'पंचवीस वर्षे वयाचा, पाच फूट आठ इंच उंचीचा इंग्रज तुरुंगातून पळाला आहे. समोर झुकून चालण्याची त्याला सवय आहे. नाकातून बोलतो. जिवंत वा मृत पकडून देणाऱ्यास २५ पौंडांचे बक्षीस देण्यात येईल !'

भविष्यात इंग्लंडची राजसत्ता गाजविणाऱ्या आणि जागतिक राजकारणात महत्त्वाचे स्थान मिळविणाऱ्या चर्चिलची किंमत १८९९ साली केवळ २५ पौंड होती ! ◻

## ३ : चर्चिल– एक चमत्कार

द. आफ्रिकेच्या सरकारने चर्चिलला पकडण्यासाठी बक्षीस लावले होते व त्याच्या शोधासाठी 'काळे कुत्रे' गाव न् गाव पालथे घालीत होते. अशा स्थितीत त्या कोळशाच्या खाणीवर चर्चिलला जास्त दिवस दडवून ठेवणे जॉन हॉवर्डला शक्य नव्हते. चर्चिल ट्रान्सव्हाल येथील त्याच्या खाणीवर असल्याचा शोध बोअर सैनिकांना लागला असता तर हॉवर्डला आपला व्यवसाय सोडून मायदेशी परतावे लागले असते.

चर्चिललासुद्धा असे लपूनछपून दिवस काढण्याचे जिवावर आले होते. त्याने हॉवर्डचा निरोप घेतला.

मालगाडीत कापसाच्या गाठी असलेल्या डब्यात हॉवर्डने त्याला दडवून ठेवले व त्या गाडीने द. आफ्रिकेतून पोर्तुगीजांचे स्वामित्व असलेल्या पूर्व आफ्रिकेत चर्चिलने प्रवेश केला.

चर्चिल तुरुंगातून निसटून गेल्याच्या बातमीने आफ्रिका आणि युरोपखंडात प्रचंड खळबळ उडाली. वृत्तपत्रातून त्यांच्या पलायनाचे वृत्तान्त रकानेच्या रकाने भरून छापून आले.

पोर्तुगीज आफ्रिकेतून इंग्लंडच्या आधिपत्याखालील दरबानला चर्चिल जायला निघाला तेव्हा पोर्तुगीज प्रदेशातील ब्रिटिश नागरिक त्याला निरोप देण्यासाठी बंदरावर हजर होते.

दरबानला चर्चिलचे एखाद्या वीरासारखे स्वागत झाले. लोकांनी त्याला खांद्यावरून मिरवीत शहरातील टाउन हॉलमध्ये नेले. तेथे लोकांनी त्याच्यावर स्तुतिसुमने उधळली. इंग्लंडात त्याच्या वीरकृत्याच्या सन्मानार्थ नृत्याचे आयोजन करण्यात आले आणि कवींनी त्याच्या शौर्याला कवितेत गुंफून ते काव्य लोकांसमोर सादर केले.

चर्चिल आता इंग्लंडचा हिरो झाला होता. त्याच्या नावाचा सर्वत्र बोलबाला होऊ लागला होता व त्याचे नाव सर्वांच्या जिभेवर नाचू लागले होते. एका सैनिकाला जनमानसात स्थान मिळाले होते !

चर्चिलची महत्त्वाकांक्षा आता वाढीस लागली होती. केवळ युद्धवार्ताहर म्हणून अथवा सैन्यातील हुद्द्यावर तो संतुष्ट राहणे शक्यच नव्हते. सामाजिक जीवनात भाग घेण्यासाठी तो संधी शोधीत होता. ती संधी त्याच्याकडे आयती चालून आली.

दक्षिण आफ्रिकेत हुजूर पक्षाने जे यश मिळविले त्यामुळे त्या पक्षाने निवडणुका घेण्याची मागणी केली. त्या मागणीनुसार १९०० साली ब्रिटिश संसदेच्या निवडणुका झाल्या. त्या निवडणुकीत चर्चिलने भाग घेतला आणि तो संसदेत निवडून आला.

अवघे सव्वीस वर्षांचे तरुण वय असताना चर्चिलच्या राजकीय जीवनाची सुरुवात झाली. एकोणिसाव्या शतकात लष्करात कामगिरी बजावण्याची स्वप्ने पाहणारा विन्स्टन चर्चिल विसाव्या शतकाच्या पहिल्याच वर्षी राजकारणात उतरला आणि यशस्वीदेखील झाला.

विसाव्या शतकातील संसदेचे पहिले अधिवेशन १५ फेब्रुवारी १९०१ ला सुरू झाले व त्याचे उद्घाटन ब्रिटनचे राजे सातवे एडवर्ड यांच्या हस्ते पार पडले. या संसदेत चर्चिलने मागच्या बाजूची जागा पकडली होती, त्या जागेवरून तो सर्व सभासदांना तुच्छतेने न्याहळत होता. जणु त्याच्या दृष्टीने ते सारे 'बच्चे' राजकारणी होते !

संसदेत भाषण करण्यापूर्वी चर्चिल अगदी तयारीने येत असे. आपली भाषणे तो कित्येक आठवडे मेहनत घेऊन तयार करायचा. ती भाषणे तो अगोदर पाठ करायचा आणि आपल्या खोलीत बसून समोर जणू शेकडो लोक बसले आहेत व आपण त्यांना भाषण ऐकवीत आहोत अशा थाटात, तो ती भाषणे मोठमोठ्याने म्हणायचा.

आपल्या तयार भाषणाच्या प्रती तो अगोदरच वृत्तपत्रांकडे पाठवून द्यायचा आणि वृत्तपत्रांकडे पाठविलेल्या भाषणांच्या प्रतीत 'हशा' व 'टाळ्या' यांची अगोदरच पेरणी केलेली असायची !

त्या काळी ब्रिटिश संसदेच्या सभासदांना कोणत्याही प्रकारचे वेतन वा भत्ता मिळत नसे. त्यामुळे संसदसदस्य म्हणून गुजारा करणे त्याला शक्य नव्हते. म्हणून चर्चिलने इंग्लंड आणि अमेरिकेत भाषणांचे दौरे काढले. या दौऱ्यांमुळे त्याला भरपूर पैसा मिळाला आणि राजकारणात स्थिरता पण लाभली.

काही व्यक्तींना स्वतःला संघर्षात झोकून देण्याची सवयच असते. अशा व्यक्तींमुळे देशाची शांतता धोक्यात येत असली, तरी पण याच व्यक्ती देशाचे भवितव्य घडवीत असतात, राष्ट्राची उभारणी करीत असतात आणि इतिहासालाही वळण लावीत असतात. चर्चिल अशा व्यक्तींपैकीच एक होता.

ज्या हुजूरपक्षात चर्चिलचे स्थान होते, त्या पक्षाची ध्येयधोरणे चर्चिलला नापसंत होती. चर्चिल हा मुक्त व्यापाराचा पुरस्कर्ता होता तर हुजूरपक्षाने व्यापाराला संरक्षण असावे अशी मागणी केली होती. लष्करावर अधिक खर्चाची तरतूद असलेल्या पक्षाच्या अंदाजपत्रकावर त्याने कडाडून टीका केल्यामुळे त्याच्या पक्षातच त्याला विरोध होऊ लागला होता. एक दिवस चर्चिल सभागृहात भाषण देण्यासाठी उभा असताना हुजूरपक्षातील त्याच्या सहकाऱ्यांनी सभागृहात त्याची हुर्रे केली; पण त्यामुळे न डगमगता चर्चिलने आपले भाषण पुढे चालू ठेवले. हाउस ऑफ कॉमन्सच्या सभागृहात हा प्रकार नवीन होता. या प्रकाराने चर्चिलला बोअर युद्धाचे वेळी मिळालेल्या प्रसिद्धीसारखीच प्रसिद्धी मिळाली.

पक्षातून असा उघड विरोध होत असताना चर्चिलला पक्षात राहणे कठीण झाले. अखेर १९०४ साली त्याने भर सभागृहात हुजूरपक्षातील आपले स्थान सोडून लिबरल पक्षात प्रवेश केला. लॉइड जॉर्जनी त्याचे मोठ्या उत्साहाने स्वागत करून त्याला आपल्या

शेजारचे स्थान दिले. या वेळी हुजूरपक्षीयांनी चित्रविचित्र आवाज काढून त्याची रेवडी उडविली तर लिबरल पक्षाने टाळ्यांच्या गजरात त्याचे स्वागत केले.

१९०६ साली ब्रिटनमध्ये सार्वत्रिक निवडणुका झाल्या. या निवडणुकात लिबरल पक्षाला भरघोस यश मिळून तो सत्तेवर आला. लिबरल पक्षाच्या मंत्रिमंडळात चर्चिलकडे वसाहतींचे खाते सोपविण्यात आले. अशा रीतीने वयाच्या ३१ व्या वर्षी तो ब्रिटनचा मंत्री बनला ! 'अल्पवयीन चमत्कार' म्हणून चर्चिलचा सर्वत्र बोलबाला झाला !

चर्चिलने पक्षान्तर केल्याची बाब अनेकांना आवडली नव्हती. त्याच्या लष्करातील सहकाऱ्यांना तर ही गोष्ट साफ नापसंत होती.

ब्रिटनच्या आफ्रिकेतील वसाहतींचा दौऱ्याचे वेळी चर्चिलचा मुक्काम एडन येथे होता. तेथील शरीरसंरक्षकदलाचा प्रमुख कॅप्टन कॅल्व्हर्ट होता. चर्चिलच्या पक्षान्तराने तोदेखील नाराज होता.

एक दिवस कॅल्व्हर्टच्या कचेरीतील फोन खणखणला. कॅल्व्हर्टने फोन उचलला.

'हॅलाव, मी चर्चिल बोलतोय.'

'यस सर.' कॅल्व्हर्टच्या चेहऱ्यावर त्रासिक भाव.

'मला तुमच्या सांडणीस्वारांच्या पथकातील एक चांगल्यापैकी उंट हवाय.'

'आपल्याला उंट पाठवून देतो.' कॅल्व्हर्टने सांगितले आणि फोन खाली ठेवला.

चर्चिलवर सूड उगवून घेण्याची ही चांगली संधी होती व कॅल्व्हर्टने तिचा पुरेपूर उपयोग करून घेतला. त्याच्या उंटदलातील एक उंट अत्यंत पिसाट म्हणून प्रसिद्ध होता. पाठीवर बसलेल्या स्वाराला खाली फेकून गुडघ्याचे रट्टे मारून त्या स्वाराला अर्धमेला करून टाकण्याचे अनेक प्रकार या उंटाने केले होते.

हाच उंट चर्चिलच्या स्वाधीन करण्याचे कॅल्व्हर्टने ठरविले. ड्यूटीवरील सोमाली नोकराला त्याने तो उंट चर्चिलसाहेबांकडे पोचता करण्यास सांगितले.

हा उंट चर्चिलची चांगली फजिती करील असा कॅल्व्हर्टचा कयास होता. त्यामुळे एखाद्या दुर्घटनेचा निरोप ऐकण्यासाठी तो आपल्या कचेरीत बसून राहिला.

इकडे रपेट मारण्यासाठी चर्चिल उंटावर स्वार होताच तो उंट स्वैर उधळला व त्याने चर्चिलला फेकून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला; पण चर्चिलने आपली उंटावरील मांड अजिबात सैल केली नाही. उलट आपल्या पायांतील बुटांच्या टाचा उंटाच्या पार्श्वभागावर मारून मारून त्याने त्या उंटाला नामोहरम करून सोडले. अखेर तो उंट चर्चिलला निमूटपणे शरण आला आणि चर्चिलने त्याच्यावर बसून भरपूर रपेट केली !

संध्याकाळी तो सोमाली नोकर कॅल्व्हर्टकडे परत आला, तेव्हा तो पार भेदरून गेला होता.

'काय रे चर्चिलची सफर कशी झाली ?' कॅल्व्हर्टने कुतूहलाने विचारले. चर्चिलला उंटाने चांगला घोळसला असावा अशी त्याची समजूत होती.

'फारच छान !' तो नोकर म्हणाला, 'चर्चिलसाहेबांना पाडण्याचा उंटाने खूप प्रयत्न केला. त्याने चर्चिलसाहेबांना लाथा मारल्या तर चर्चिलसाहेबांनी उंटाला लाथा मारल्या. अखेर तो उंट पार नरमला साहेब !' सोमाली नोकरानं सांगितलं.

कॅल्व्हर्टचा चेहरा पाहण्यासारखा झाला !

परिस्थितीवर स्वार होऊन त्यावर पकड बसविण्याचा हा निर्धार चर्चिलला पुढेही उपयोगी पडला. अपार कष्ट उपसण्याची त्याची नेहमी तयारी असायची. त्यामुळे मंत्रिमंडळातील सर्वांत कामसू मंत्री म्हणून चर्चिलची ख्याती झाली होती.

वसाहत-मंत्रिपदानंतर त्याने व्यापार-मंडळाचा अध्यक्ष म्हणून काम पाहिले आणि मग त्याच्यावर गृहखात्याची जबाबदारी येऊन पडली. जबाबदारीची कामे पार पाडीत असतानाच विन्स्टन चर्चिल क्लेमेन्टाइनच्या प्रेमपाशात गुरफटून जात होता.

ब्लेनहीममध्येच राहणाऱ्या ब्लान्च होझियरच्या मुलीने या करड्या माणसाला आपल्या प्रेमाने पार विरघळून टाकले होते. क्लेमेन्टाइनचा चेहरा उभट होता. बांधा प्रमाणबद्ध होता आणि डोळे टपोरे होते. त्या डोळ्यांनी विन्स्टनवर भुरळ टाकली होती. त्याची लाडकी 'क्लेमी' दिसायला जशी सुंदर होती, तितकीच ती हुषार होती व राजकारणात रस घेणारी होती.

चर्चिल-क्लेमेन्टाइनचा विवाह त्या काळी इंग्लंडमध्ये खूपच गाजला; पण चर्चिलने हाउस ऑफ लॉर्डसला विरोध केल्याने लोक त्याच्यावर नाराज झाले होते; पण त्या जोडप्यावर त्यांच्याच नातेवाइकांनी बहिष्कार टाकला होता.

स्त्रियांनी राजकारणात भाग घेऊ नये, त्यांना मतदानाचा हक्क नसावा असे चर्चिलचे मत होते. त्यामुळे त्याला प्रखर टीका सहन करावी लागली. सार्वजनिक समारंभात लोक चर्चिलवर सडकी अंडी फेकू लागले; पण चर्चिलने मोठ्या खिलाडूपणाने त्या सडक्या अंड्यांचा स्वीकार केला !

गृहमंत्री असताना लंडनच्या सिडने स्ट्रीटवर दरोडेखोरांच्या एका गटाने एका घराचा आश्रय घेऊन पोलिसांवर गोळीबार चालविला होता. त्यात काही पोलीस ठार झाले होते. या दरोडेखोरांविरुद्ध लष्कराचा वापर करण्याची परवानगी मागण्यासाठी काही अधिकारी चर्चिलकडे गेले. चर्चिल त्या वेळी आंघोळ करीत होता.

कुणी अधिकारी तातडीच्या कामासाठी आले असल्याचा त्याला निरोप मिळाला तेव्हा चर्चिलला काही राहवेना. तो घाईघाईत कंबरेला टॉवेल गुंडाळून त्या अधिकाऱ्याला सामोरा गेला व टॉवेल गुंडाळलेल्या अवस्थेतच त्याने दरोडेखोरांविरुद्ध सैन्याचा वापर करण्याची त्या अधिकाऱ्यांना परवानगी दिली !

ते अधिकारी निघून गेले; पण चर्चिलला स्वस्थ बसवेना. त्याने घाईघाईत आपला फरकोट चढविला. डोक्यावर हॅट घातली आणि ज्या ठिकाणी दरोडेखोरांविरुद्ध लष्करी कारवाई सुरू होती त्या स्थळी तो जातीने हजर झाला आणि तेथील अधिकाऱ्यांना सूचना देऊन त्या कारवाईचे त्याने सूत्रसंचालन केले ! याही गोष्टीचा वृत्तपत्रांतून खूपच गाजावाजा झाला व या घटनेची छायाचित्रेही वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली.

जेथे जेथे संघर्ष असेल तेथे तेथे पुढाकार घेऊन संघर्षात स्वतः

भाग घ्यायचा ही त्याची वृत्ती मंत्री झाल्यावरही त्याला कशी चिकटून राहिली होती, याचे प्रत्यंतर या घटनेतून पहावयास मिळते. या त्याच्या वृत्तीमुळेच पहिल्या महायुद्धाचे वेळी इंग्लंड स्वतःची चामडी बचावून युद्धातून सहीसलामत बाहेर पडू शकले ! ¤

## ४ : पाण्यात पेटलेले युद्ध

चर्चिलच्या कर्तृत्वाची चढती कमान सुरू झाली होती. तो गरीबांचा कनवाळू म्हणून विशेष प्रसिद्धीस आला होता. गरीबांसाठी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करणं हे काम परमेश्वरानं आपल्यावर सोपवलं आहे, अशी त्याची धारणा होती. मँचेस्टरमधील गलिच्छ वस्त्यांतून राहणारे लोक पाहून तो अनेकदा शहारला होता.

'या लोकांचं आयुष्य किती निरस आहे !' तो एकदा म्हणाला, 'सुंदरतेचा तर या जीवनाला स्पर्शच कधी झाला नाही. हे लोक चांगलं–चुंगलं कधी खात तरी असतील का? यांचं बोलणंदेखील यांच्या जिण्यासारखं घाणेरडं बनलं आहे.'

त्यानंतर ग्लासगो येथील भाषणात त्याने गरीबांविषयीच्या आपल्या भावना बोलून दाखविल्या होत्या. 'कष्ट आणि राहणीमान यांचा जागतिक किमान दर्जा असावा अशी माझी धारणा आहे. माणसानं एका ठराविक मर्यादेपलीकडे कष्ट करू नयेत व त्याचे जीवनमान एका किमान मर्यादेपर्यंत तरी सुधारावे आणि त्या मर्यादेनंतर माणसाने एकमेकांशी निकोप स्पर्धा करावी,' हे विचार त्याने या भाषणात बोलून दाखविले होते.

त्या काळात हा विचार नवीन होता आणि अनेकांनी चर्चिलचे विचार उचलून धरले. चर्चिलच्या पुढाकारानेच हाउस ऑफ लॉर्डसच्या अधिकारात कपात करण्यात आली व पार्लमेंटच्या सभासदांना प्रथमच मानधन मिळू लागले.

याच वेळी जगात युद्धाचे वारे वाहू लागले. चीनमध्ये राज्यक्रांती झाली व सन्यत्सेनने सर्व सूत्रे आपल्या ताब्यात घेतली. रेल्वे-संप आणि खाण-कामगारांचा संप या दोन संपांमुळे ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम झाले होते. अशा स्थितीत जर्मनीने १ जुलै १९११ रोजी फ्रेंच मोरोक्को येथील अगादीरवर हल्ला चढविला आणि संपूर्ण युरोपात युद्धाच्या नौबती झडू लागल्या.

जर्मनीच्या फ्रान्सवरील हल्ल्याचे संभाव्य धोके इतरांच्या जरी लक्षात आले नाहीत तरी चर्चिलने ते पुरेपूर ओळखले होते. जर्मनीला तोंड देण्यास फ्रान्स समर्थ आहे अशी ब्रिटिश जनरल्सची भ्रामक समजूत होती; पण चर्चिलने या समजुतीचा फुगा फोडला. या युद्धात फ्रान्सला माघार घ्यावी लागेल आणि जर्मन-हल्ल्यापुढे फ्रान्सचा टिकाव लागला नाही तर इंग्लंडला प्रत्याघाती कारवाई करावी लागेल, असा इशारा त्याने दिला. ब्रिटिश जनरल्सनी या इशाऱ्याची कुचेष्टा केली; पण पंतप्रधान अस्क्विथ यांनी त्याचे मर्म बरोबर ओळखले आणि त्यांनी ब्रिटनच्या नौदलाची व्यवस्था चर्चिलकडे सोपविली.

ब्रिटनची भौगोलिक स्थिती लक्षात घेता नौदल हे त्याचे एकमेव आशास्थान आहे हे ब्रिटिश पंतप्रधानांनी बरोबर ओळखले व त्याची स्थिती मजबूत करण्यासाठी चर्चिलपेक्षा दुसरा लायक मंत्री त्यांना कुठून मिळणार होता ?

एखादे कार्य अंगावर घेतले की त्याचा पुरेपूर पिच्छा पुरवायचा हा चर्चिलचा स्वभाव होता. ही नवी जबाबदारी अंगावर घेताच त्याने नौदलाची कसोशीने पाहणी सुरू केली. नौदलातील जनरल्स वयाने त्याच्याहून बरेच मोठे होते व अनुभवी; पण चर्चिलजवळ त्याहून मोलाची गोष्ट होती, ती म्हणजे दूरदृष्टी !

ब्रिटनच्या नौदलात कोणते दोष आहेत याचा अभ्यास करण्यासाठी त्याने सगळ्या बंदरांची व बोटींची पाहणी केली आणि सतत आठ महिने बोटीवर घालविले. त्याचे हे कृत्य जनरल्सना पसंत नव्हते; पण आपल्या तंबूत चरफडत बसण्यापलीकडे ते काहीच करू शकत नव्हते !

चर्चिलचे आगमन होईपर्यंत ब्रिटनच्या बोटी कोळशावर चालविल्या जात होत्या; पण चर्चिलने त्या जळाऊ तेलावर चालविण्याच्या दृष्टीने त्यांच्यात योग्य ते बदल घडवून आणले. या बोटींवरील कमी पल्ल्याच्या तोफा त्याने काढून टाकल्या व त्या जागी नव्या लांब पल्ल्याच्या तोफा बसविल्या आणि अशा रीतीने ब्रिटिश नौदलाची कार्यक्षमता वाढवून जर्मनीस तोंड देण्याची त्याने जय्यत तयारी केली.

१९१४ साली उन्हाळ्याची सुरुवात होण्यापूर्वी चर्चिलने नौदलाच्या वेगाने हालचाली सुरू केल्या आणि युद्धपातळीवरून त्याने सारे नौदल संघटित करून सरावाच्या लढायाही घेतल्या. या सरावाच्या लढाया घेण्यासाठी बादशहाची संमती घ्यावी लागे; पण चर्चिलने ते सारे संकेत धाब्यावर बसविले.

याच वेळी २८ जुलै १९१४ ला ऑस्ट्रियाचे आर्चड्यूक फ्रान्सिस फर्डिनेंन्द यांचा खून करण्यात आला आणि युरोपात युद्धाची मालिकाच पेटून उठली.

२८ जुलैला ऑस्ट्रिया–हंगेरीने संयुक्तरीत्या सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले.

१ ऑगस्टला जर्मनीने रशियावर आक्रमण केले आणि पाठोपाठ जर्मनीच्या सेना ३ ऑगस्टला फ्रान्सवर धडका मारू लागल्या.

ब्रिटनने जर्मनीला दिलेल्या निर्वाणीच्या इशाऱ्याची मुदत ४ ऑगस्ट १९१४ च्या रात्री संपली आणि ब्रिटननेसुद्धा जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारल्याची घोषणा केली.

राजवाड्यात 'गॉड सेव्ह द किंग' या गीताचे स्वर तारस्वरात आळवले जाऊ लागले आणि त्या स्वरांबरोबर 'बिग बेन' या



महाकाय घड्याळाचे टोले साऱ्या लंडनभर निनादून लोकांना सावधगिरीचा इशारा देत राहिले.

'जर्मनीविरुद्ध प्रत्याघाती कारवाई करा!' असे आदेश देणारी तार समुद्रात संचार करणाऱ्या सर्व बोटींकडे पाठविण्यात आली.

चर्चिलच्या आधिपत्याखाली ब्रिटनच्या नौदलाचा इतका विकास झालेला होता की त्याचे युरोपात सामुद्री प्रभुत्व प्रस्थापित झाले होते. जहाजांवरून विमाने उडविण्याचे तंत्र चर्चिलमुळेच प्रथम सुरू झाले आणि आधुनिक रणगाड्याचा जनक म्हणूनदेखील त्याच्याकडे अंगुलिनिर्देश करावा लागेल. याच काळात इंग्लंडच्या विमानांनी जर्मन विमानांवर प्रतिहल्ले करून जर्मनीचे हवाई सामर्थ्य खच्ची करण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

अशा प्रकारे युद्धाला तोंड लागलेले असताना जर्मनीच्या 'यू' बोटींनी ब्रिटनच्या अबोकीर, होग आणि क्रेसी या तीन क्रूझर–विनाशिका बुडवून ब्रिटनला प्रचंड धक्का दिला. त्यानंतर पाठोपाठ दोन महिन्यांच्या आतच ब्रिटनच्या आणखी दोन नौका 'गुड होप' व 'मॅमॉथ' ह्या बुडविण्यात आल्या. अशा रीतीने इंग्लंडला लागोपाठ धक्के बसत असतानाच चर्चिलने डार्डानेलिसच्या लढ्याची योजना आखली. या लढ्यामुळे जर्मनीने उभे केलेले युद्ध संपुष्टात येईल अशी चर्चिलला आशा वाटत होती. डार्डानेलिस हे ठाणे एजियनचा समुद्र आणि मार्माराचा समुद्र यांना जोडणारे मध्यवर्ती ठिकाण होते.

डार्डानेलिसहून नौदलाचा जोरदार हल्ला करून तुर्कस्थानला वेगळे पाडायचे आणि बाल्कन राष्ट्रांचा ताबा घेऊन रशियाच्या विजयाचा मार्ग मोकळा करायचा, अशी चर्चिलची योजना होती. या योजनेला इंग्लंडमधून प्रखर विरोध करण्यात आला; पण चर्चिलने ही योजना राबविण्याचा निर्धार केला होता.

१८ मार्च १९१५ रोजी ब्रिटनची जहाजे डार्डानेलिसच्या आखातात शिरली; पण या वेळी सुदैव चर्चिलची पाठराखण करीत नव्हते हेच खरं. डार्डानेलिसहून आगेकूच करीत असताना तेथे पेरून ठेवलेल्या पाणसुरुंगांचे स्फोट झाले आणि ब्रिटनला आपल्या तीन युद्धनौका गमवाव्या लागल्या. त्यामुळे या मोहिमेचे नेतृत्व करणाऱ्या ॲडमिरल्सनी ही मोहीम अर्धवट सोडून माघार घेण्याचा निर्णय घेतला. चर्चिलला हा निर्णय कळताच त्याने 'मागे फिरू नका. युद्ध सुरू ठेवा!' असा संदेश आघाडीवर पाठविला; पण तोपर्यंत उशीर झाला होता.

ॲडमिरल्सनी या आदेशाची अंमलबजावणी करण्यास विलंब लावला आणि शत्रूने त्याचा फायदा घेऊन त्या भागातील आपले सामर्थ्य वाढविले. त्यानंतर डार्डानेलिसहून ब्रिटिश सैन्याने जोरदार मुसंडी मारण्याचा प्रयत्न केला; पण मुसंडी म्हणजे दगडावर डोके आपटून घेणेच ठरले.

या युद्धात इंग्लंडचे जवळजवळ दोन लाख सैनिक मारले गेले. याचा परिणाम असा झाला की चर्चिलला आपले पद सोडावे लागले.

चर्चिलसाठी हा आयुष्यातील सर्वांत कटु असा अनुभव होता. एखाद्या माशाला खोल समुद्रातून काढून उथळ पाण्यात सोडावे, तशी चर्चिलची अवस्था झाली!

चर्चिलच्या आयुष्यातील कटु पर्व सुरू झाले. हे दिवस त्याच्या दृष्टीने न संपणारे दिवस होते. आपल्या दुःखाचे ओझे पाठीवर लादून सरे येथील आपल्या निवासस्थानात चर्चिल हतभाग्याचे जिणे जगू लागला.

सरे येथील मुक्कामात त्याला विरंगुळा होता तो चित्रे रंगविण्याचा. आपल्या पुतण्याची रंगपेटी घेऊन त्याने चित्रे काढण्याचा प्रयत्न केला आणि पाहता पाहता तो उत्कृष्ट चित्रे रंगवू लागला. त्याने मग तैलचित्रे काढायला सुरुवात केली व त्यातही त्याने प्रभुत्व प्रस्थापित केले.

चित्रे काढायचा कंटाळा आला की तो आपला वेळ खेळ खेळण्यात घालवी. जुने पायघोळ कपडे अंगावर चढवून, झुडुपाआड दडून, गोरिलासारखे आवाज काढून, लहान मुलांना भीती दाखविण्याचा खेळ खेळणे त्याला फार आवडायचे. हा खेळ खेळताना आपण कधी मंत्री होतो, नौदलाचे प्रमुख होतो, याचा त्याला पारच विसर पडायचा आणि गोरिलासारखी हाताने छाती पिटीत तो मुलांच्या मागे अल्लडपणे धावत सुटायचा ...

पण याही जीवनाचा चर्चिलला कंटाळा आला. त्याने पंतप्रधान ॲस्क्विथ यांना पत्र पाठवून फ्रान्समध्ये कामगिरीवर असलेल्या आपल्या रेजिमेंटबरोबर युद्धात सक्रीय भाग घेण्याची परवानगी मागितली.

ॲस्क्विथने परवानगी देताच मेजर चर्चिल आपल्या कामगिरीवर रुजू झाला. त्याला कर्नलचा हुद्दा देण्यात आला आणि एक बटालियन त्याचेकडे सोपविण्यात आली.

या कामगिरीवर असतानादेखील तो कधी स्वस्थ असा बसला नाही. बटालियनमधील प्रत्येक सैनिकाची विचारपूस करीत तो कॅंपभर हिंडायचा. जखमी सैनिकांची तो जातीने विचारपूस करायचा, त्यांच्याबद्दल डॉक्टरशी चर्चा करायचा. त्यामुळे सैनिक खूष असायचे; पण डॉक्टर मात्र त्याच्यावर नाराज असायचे. त्यांना वाटायचं 'हा बेटा आपल्याला आर्डर्लीसारखा वागवीत आहे!'

चर्चिल फ्रान्समध्ये असताना त्याचे पार्लमेंटधील मित्र त्याने इंग्लंडला परत यावे यासाठी प्रयत्न करीत होते. चर्चिललादेखील राजकारणापासून दूर राहून चैन पडत नव्हते. याच वेळी डार्डानेलिस मोहिमेची चौकशी पूर्ण झाली होती व त्या चौकशीत चर्चिलची मूळ योजना उत्तम होती; पण ती नीट राबविली गेली नाही, असा निर्वाळा देण्यात आला. चर्चिलवरील कलंक यामुळे पुसला गेला व त्याला मंत्रिमंडळात घेण्याचा मार्ग अशा तऱ्हेने मोकळा झाला.

दरम्यान अनेक घटना घडल्या. रशियात क्रांती झाली. जर्मनीविरुद्धच्या लढ्यात अमेरिकाही उतरली आणि जर्मनीची झपाट्याने पीछेहाट होऊ लागली. १९१८ साली जर्मनीने अखेरचे प्रतिहल्ले करण्याचा प्रयत्न केला; पण याच वेळी खुद्द जर्मनीतही क्रांतिकारी चळवळ सुरू झाली होती. कैसर हॉलंडमध्ये पळून गेला आणि अखेर ११ नोव्हेंबर १९१८ मध्ये जर्मनीने संपूर्ण शरणागती पत्करली व दोस्तराष्ट्रांशी तह केला! पहिले महायुद्ध अशा रीतीने संपुष्टात आले.

त्या दिवशी सकाळी चर्चिल आपल्या निवासस्थानाच्या खिडकीत 'बिग–बेन' ची घंटा वाजण्याची वाट पहात बसला होता. युद्ध–तहकरारावर स्वाक्षऱ्या झाल्याची शुभवार्ता 'बिग–बेन' ची घंटा देणार होती व ती ऐकण्यासाठी लंडनचे लाखो नागरिक जिवाचे कान

करून आपआपल्या घरात बसून होते. बिग–बेनची घंटा वाजली आणि सर्व लंडनभर घंटांचा निनाद घुमू लागला. घराघरातून संकेताची वाट पाहणारे लंडनवासी भराभर रस्त्यावर आले. त्यांच्या चेहऱ्यावर विजयाचा आनंद होता. भयानक दिव्यातून सुटल्याचा आनंद होता. युद्ध संपल्याचा आनंद होता. बावन्न महिन्यांच्या महाभयंकर, अंगावर शहारे आणणाऱ्या अनुभवातून मुक्त झाल्याचा आनंद होता.

ती माणसं नव्हतीच मुळी. मूर्तिमंत आनंदच लंडनच्या रस्त्यातून मोकाट सुटला होता. त्या आनंदात सहभागी होण्यासाठी विन्स्टन आणि क्लेमी आपल्या निवासस्थानातून बाहेर पडून मोटारीत बसली. त्याबरोबर शेकडो लंडनवासीयांनी त्यांना घेरून टाकलं. काही जण त्यांच्या मोटारीच्या टपावर चढले. काही मोटारसमोर गाणी म्हणत नाचत राहिले.

ती विजययात्रा अशा तऱ्हेने बराच वेळ चालत राहिली. बराच वेळ चालत राहिली ! ¤

## ५ : अज्ञातवासांतील दिवस

पहिले महायुद्ध संपले त्या वेळी रशियात क्रांति-प्रतिक्रांतीचा खेळ सुरू झाला होता. आपला अज्ञातवास संपवून लेनिनचे तेव्हा नुकतेच रशियात आगमन झाले होते व त्याने आपली सत्ता लेनिनग्राडवर (तेव्हाचे पेट्रोग्राड) प्रस्थापित केली होती. लेनिनच्या बोल्शेव्हिक पक्षाने मध्यरशियात आपले वर्चस्व स्थापन केले होते. याउलट जनरल डेनिकीन, अॅडमिरल कोलचॅक ही मंडळी उत्तर रशियांत बोल्शेव्हिक पक्षाला नामोहरम करण्याचा प्रयत्न करीत होती.

या वेळी चर्चिलकडे युद्ध व हवाईदल ही खाती सोपविण्यात आली होती. ब्रिटनचे बरेचसे सैन्य रशियात होते. ते परत घेण्याचा निर्णय पॅरिस-परिषदेत घेण्यात आला. त्यानुसार रशियातून फौजा मागे घेण्यात आल्या आणि डेनिकीन, कोलचॅक यांच्या सैन्यामागील फळी ढासळून त्यांच्या सैन्याची वाताहात झाली. बोल्शेव्हिकांची सर्वत्र सरशी होऊ लागली.

चर्चिलने रशियात केलेल्या हस्तक्षेपामुळे ब्रिटनची फक्त आर्थिक हानी झाली; पण त्यांचे सारे सैन्य सुखरूप राहिले. त्यामुळे लॉइड जॉर्जचा चर्चिल-विरोध संपुष्टात आला आणि चर्चिलकडे वसाहतखाते सोपविण्यात आले.

१९२३ साली ब्रिटनमध्ये झालेल्या पोटनिवडणुकीसाठी तो उभा झाला. याच वेळी चर्चिलचे अपेंडिक्सचे दुखणे उपटले आणि त्यावरील शस्त्रक्रियेसाठी तो इस्पितळात दाखल झाला. या निवडणुकीत चर्चिलच्या लिबरल पक्षाचा पराभव होऊन टोरी पक्ष अधिकारावर आला. चर्चिलने एका क्षणात आपले अधिकार, आपले पद, आपला पक्ष आणि आपला अपेंडिक्सदेखील गमावले आणि पुन्हा एकदा कंटाळवाणे रिकामपण त्याच्या वाट्याला आले !

या रिकामपणच्या काळात चर्चिलने आपला पूर्वीचा लेखनाचा व्यवसाय सुरू केला. पहिल्या महायुद्धाची पार्श्वभूमी कथन करणारा ‘द वर्ल्ड क्रायसिस’ हा चार खंडांतील ग्रंथ त्याने प्रसिद्ध केला. या ग्रंथाने त्याला पस्तीस हजार पौंडांची भली मोठी रक्कम मिळवून दिली.

या रकमेतून त्याने केंट परगण्यातील ‘चार्टवेल’ या नावाने ओळखली जाणारी इस्टेट खरेदी केली.

चार्टवेलची इमारत देखणी होती. तिच्याभोवती सुंदर बाग होती. त्या बागेत तऱ्हेतऱ्हेची आकर्षक फुलझाडे होती. या बागेत एक पाण्याचं लहानसं तळंदेखील होतं. त्याचा सुरेख तलाव करावा अशी कल्पना चर्चिलच्या डोक्यात आली. झालं. कुदळी आणि फावडी घेऊन त्याने सगळ्यांना त्या कामाला भिडविले. मदतीला नोकर दिले. याच काळात कुणी पाहुणा आला तर त्यालादेखील या श्रमदानात भाग घ्यावा लागे; पण नऊशे फूट लांबीचे हे तळे तयार झाल्यावर त्या वाड्याच्या शोभेत चांगलीच भर पडली.

परंतु तेवढ्याने चर्चिलचे समाधान होण्यासारखे नव्हते. निव्वळ माशांसाठी एक व पोहण्यासाठी एक अशी दोन तळी त्याने बांधून काढली.

पोहण्यासाठी केलेल्या टाक्यात उंच फळीवरून चर्चिल जेव्हा आपला देह पाण्यात झोकून देत असे, तेव्हा त्याच्या ऐसपैस शरीरामुळे दूर अंतरावर बसलेल्यांनाही सचैल स्नान घडत असे !

फावल्या वेळात चित्रे काढण्याचा उद्योग चर्चिलने चालूच ठेवला होता. चित्रकलेत त्याने चांगलीच प्रगती केली होती. आपल्या चित्रांचे प्रदर्शन भरवावे असे त्याच्या मनाने घेतले. त्या काळात पॅरिस हे ललितकलांचे माहेरघर समजले जाई. मोठमोठ्या चित्रकारांनी पॅरिस ही आपली कर्मभूमी केली होती. या कर्मभूमीत चर्चिलने चार्लस् मोरीन या टोपणनावाने हे प्रदर्शन भरवले. या चित्रांचा बराच गाजावाजा झाला आणि चित्रकार म्हणून चर्चिल प्रसिद्धीस आला.

चर्चिलने काढलेली चित्रे पाब्लो पिकासोनेदेखील गौरविली. ‘हा माणूस धंदेवाईक चित्रकार म्हणून सुखासमाधानाने जीवन जगू शकला असता,’ या शब्दांत त्याने चर्चिलच्या चित्रांची प्रशस्ती केली.

१९२४ साली चर्चिलने पक्षांतर केले आणि टोरी पक्षातर्फे तो पुन्हा निवडून आला. या निवडणुकीनंतर त्याच्याकडे अर्थखाते सोपविण्यात आले.

चर्चिलला ही नवी जबाबदारी मनातून नापसंत होती. त्याचे मन आकडेमोडीत गुंतणारे नव्हते. शिवाय या सुमारास इंग्लंड अत्यंत आर्थिक अडचणीत होते. अशा वेळी चर्चिलने देशात सुवर्णनाणी सुरू करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे इंग्लंडच्या निर्यात व्यापाराला फटका बसून इंग्लंडमधील कोळशाचा व्यापार थंड पडला. त्यामुळे खाणमालकांनी कामगारांच्या पगारात कपात केली. याचा परिणाम असा झाला की देशभर संपाची लाट उसळली. सार्वत्रिक संपाने ब्रिटनचे जनजीवन ठप्प झाले; पण बाल्डविन मंत्रिमंडळाने ताठर भूमिका घेतली आणि हा संप अखेर बारगळला.

चर्चिलने एकूण पाच वर्षे अर्थखाते सांभाळले. त्यानंतर झालेल्या १९२९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत चर्चिलचा पुन्हा पराभव झाला

आणि चर्चिल राजकीय जीवनापासून पुन्हा दूर फेकला गेला. १९२९ ते १९३८ पर्यंत सुमारे दहा वर्षे चर्चिल अज्ञातवासात होता.

या काळात चर्चिलने वृत्तपत्रीय लेखनास पुन्हा सुरुवात केली. ब्लेनहीमच्या राजवाड्यात असलेली जुनी कागदपत्रे उपसून, त्यांचे परिशीलन करून त्याने ' ड्यूक ऑफ मार्लबरो 'च्या जीवनाची कथा लिहिण्यास आरंभ केला. ब्लेनहीम राजवाड्यातील कागदपत्रांची टिपणे घेण्यासाठी त्याने काही साहाय्यक कामाला जुंपले होते. त्या टिपणांच्या आधारावर तो त्या साहाय्यकांना तासन्‌तास डिक्टेशन देत राही.

सकाळी ८ पासून दुपारी १ पर्यंत तो याच कामात गुंतलेला असे. त्यानंतर जेवण, चिरूट ओढीत थोडा आराम, ब्रँडीचा एखादा पेग, पुन्हा कामाला सुरुवात. पाच वाजता चहा, बागेत फिरणे झाले की पुन्हा लेखन. रात्रीच्या जेवणानंतर पहाटे दोनपर्यंत लेखन आणि मग विश्रांती अशी चर्चिलची दिनचर्या होती. केवळ सहा तास झोप त्याला पुरी पडे. तेवढ्या विश्रांतीवर तो दिवसातील निदान बारा तास तरी स्वतःला कामात गुंगवून ठेवी.

वृत्तपत्रीय लिखाण आणि पुस्तके यामुळे चर्चिलला वर्षाकाठी पस्तीस हजार पौंड इतके उत्पन्न होई. निव्वळ लेखनावर एवढे पैसे कमावणारा बर्नार्ड शॉनंतर चर्चिल हाच एकमेव लेखक असावा !

लेखनाशिवाय पैसे मिळविण्याचा आणखी एक मार्ग चर्चिलजवळ होता. तो म्हणजे भाषणाचा. त्यासाठी अमेरिका व युरोपात त्याचे दौरे वारंवार सुरू असत.

अशाच एका दौऱ्याचे वेळी न्यूयॉर्क येथे रस्त्यातून जात असताना एका टॅक्सीने चर्चिलला धडक मारली. या अपघातात चर्चिलला बराच मार लागून उपचारासाठी त्याला इस्पितळात राहावे लागले. ज्या टॅक्सीने चर्चिलला धडक मारली होती, तिच्या चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले होते; पण चर्चिलने या अपघातात टॅक्सी-चालकाचा मुळीच दोष नसल्याचे सांगून त्याला दोषमुक्त केले. चर्चिलच्या या कृत्याला वर्तमानपत्रातून बरीच प्रसिद्धी मिळाली. याशिवाय चर्चिलने इस्पितळातील काळात आपल्या अपघाताचा सुरस वृत्तांत लिहून तो प्रसिद्धीसाठी दिला. त्या वृत्तांताने त्याला ९०० पौंडांची प्राप्ती करून दिली !

चर्चिलची इंग्लंडच्या राजावर अव्यभिचारी निष्ठा होती. ते पद तो देवाइतकेच पूज्य मानायचा. राजा कसलेही अपकृत्य करीत नसतो अशी त्याची धारणा होती.

पण या धारणेला तडे पाडणारी एक घटना याच सुमारास घडली. आठवा एडवर्ड हा त्या काळी अधिकारावर होता. वॉलिस सिंपसन नावाच्या विवाहित स्त्रीवर त्याचे प्रेम बसले होते. राजसत्ता न सोडता हे प्रेमप्रकरण त्याला निभावून न्यायचे होते. चर्चिलने या प्रकरणात एडवर्डची बाजू घेऊन त्याला चर्चला न मानण्याचा सल्ला दिला; पण या प्रकरणात चर्चिलची साथ द्यायला कुणी नव्हते. खुद्द एडवर्डनेदेखील जनमताला मान देऊन राजसत्ता सोडून दिली आणि चर्चिल या साऱ्या प्रकरणात एकटा पडला !

या सुमारास ब्रिटनच्या भारताविषयीच्या धोरणातही बदल होऊ लागला होता. ब्रिटनच्या सार्वभौमत्वाला धक्का लागू न देता, भारताशी सल्लामसलत सुरू झाली होती. भारतात म. गांधींचा प्रभाव वाढू लागला होता. काँग्रेस पक्षाचे पुनरुज्जीवन झाल्याने सारीच स्थिती बदलली होती.

चर्चिलचा खास मित्र बर्केनहेड हा या वेळी ब्रिटनचा परराष्ट्र-मंत्री होता. ' भारताला स्वराज्य देण्याची कल्पनाच करवत नाही ' असे त्याचे स्पष्ट मत होते. चर्चिलनेदेखील भारतासंबंधी बरेच प्रक्षोभक लिखाण लिहिले होते.

१९३१ साली इर्विनने म. गांधींना सोडून दिले. त्याविरुद्ध चर्चिलने टीकेची झोड उठविली. ' गांधीवादाशी झुंज घेऊन त्याला पूर्णपणे चिरडून टाकले पाहिजे ! वाघाची भूक त्याला उंदीर खाऊ घातल्याने शमणार नाही. तेव्हा काँग्रेसपक्षाचे तुकडे करून त्याच्या नेत्यांना तुरुंगात डांबले पाहिजे !' असे विचार चर्चिलने एका भाषणातून व्यक्त केले. भारताला ' होम-रूल ' दिल्यास ब्रिटनमधील वीस लाख लोक बेकार होतील, असे भाकीत चर्चिलने वर्तविले.

' नंगा फकीर म्हणून ओळखला जाणाऱ्या गांधी नावाच्या माणसानं व्हाइसरीगल पॅलेसमध्ये इंग्लंडच्या राजाच्या प्रतिनिधीशी समानतेच्या भूमिकेवरून चर्चा करण्याची कल्पनाच भयंकर व अत्यंत किळसवाणी आहे !' या शब्दात चर्चिलने म. गांधींविषयीचा आपला तिरस्कार व्यक्त केला.

पण चर्चिलचा विरोध असतानाही १९३५ साली झालेल्या भारत-कायद्यानुसार भारताला गणतंत्राचा दर्जा देण्याचे तत्त्वतः मान्य करण्यात आले आणि त्यामुळे चर्चिलच्या अंगाचा तीळपापड झाला !

ब्रिटनमधील परिस्थिती अशी वेगवेगळी वळणे घेत असतानाच जर्मनीत हिटलरचा प्रभाव वाढू लागलेला होता. हिटलरच्या नाझी पक्षाने निवडणुका जिंकून जर्मनीत सत्ता संपादन केली होती. १९३४ साली हिंडेनबर्गचा मृत्यू झाला आणि हिटलर जर्मनीचा सर्वेसर्वा बनला. अधिकारावर येताच हिटलरने जर्मनीतील कामगार-चळवळ पार दडपून टाकली आणि आपल्या विरोधकांचे शिरकाण केले.

जर्मनीत घडत असलेल्या या विविध घटनांचे चर्चिलला यथार्थ आकलन झाले होते. जर्मनी आपले विमानदल मजबूत करीत आहे, आत्मसमर्पणासाठी सिद्ध झालेली तरुण सेना तयार करीत आहे, असे त्याने वारंवार इशारे दिले; पण सुरुवातीला त्याकडे कुणीच लक्ष दिले नाही. नंतर मात्र चर्चिलचेच म्हणणे बरोबर होते, असे सगळे म्हणू लागले !

हिटलरने ऑस्ट्रियावर हल्ला केला आणि संपूर्ण युरोपात युद्धाच्या घंटा खणखणू लागल्या. त्या वेळी चर्चिलने हाउस ऑफ कॉमन्ससमोर भाषण देताना म्हटले, ' गेल्या महायुद्धाचे वेळी ज्यांनी शस्त्रे फेकून दिली होती तेच आता जग जिंकायला निघाले आहेत. एके काळी अजिंक्य असलेल्या देशावर आता नष्ट होण्याची पाळी आली आहे. हजारो वर्षांनी जेव्हा इतिहासाचे अभ्यासक शोध घेऊ लागतील तेव्हा त्यांना एका विजयी राष्ट्राने ( ब्रिटनने ) स्वपराक्रमाने जे संपादन केले ते कसे गमावले याविषयी आश्चर्य करीत बसावे लागेल. ' ब्रिटनविषयी चर्चिलची ही टीका कटु वाटणारीच होती.

चर्चिलच्या या उद्‌गारांची सभागृहात टर उडविण्यात आली. त्यानंतर तेव्हाचे ब्रिटनचे पंतप्रधान लॉर्ड चेंबरलेन यांनी शांततेचे प्रयत्न सुरू केले.

त्यांनी म्युनिच येथे हिटलरची भेट घेतली. दरम्यान हिटलरने झेकोस्लोव्हाकिया गिळंकृत केला होता ! शांततेची बोलणी आटोपून चेंबरलेन ब्रिटनला परत आले. त्यांनी ' सन्माननीय शांतता ' संपादन करण्याची घोषणा केली.

त्या वेळी लोकांना सावधगिरीचा इशारा देताना चर्चिलने म्हटले, ' तुमचा आनंद मी समजू शकतो; पण तुम्ही अगोदर सत्य काय आहे ते जाणून घ्या. म्युनिच येथे आपला विजय झाला नसून युद्धाविना पराभव झालेला आहे. '

शांततेची बोलणी करीत असतांनाच प्रदेश जिंकत राहण्याचा हिटलरचा डाव चेंबरलेनच्या ध्यानात आला तेव्हा खूपच उशीर झाला होता. कारण डाव पूर्णपणे हिटलरच्या हातात गेला होता. नाझी सेना सप्टेंबर १९३९ मध्ये पोलंडमध्ये घुसली. आता ब्रिटनला बघ्याची भूमिका घेणे शक्यच नव्हते. १९१९ सालच्या पहिल्या महायुद्धाचे वेळी चर्चिलने ज्या कुशलतेने नौदल सांभाळले होते, ते ध्यानी घेऊन चर्चिलकडे तेच खाते पुन्हा सोपविण्याची निकड भासू लागली होती.

३ सप्टेंबर १९३९ ला फ्रान्स व इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारल्याची घोषणा केली आणि त्याच दिवशी चर्चिलच्या निवासस्थानी निरोप गेला, ' आपले अॅडमिरॅलिटीचे पद सांभाळा ! '

युद्ध सुरू झाल्यापासूनच चर्चिल अस्वस्थ झाला होता. युद्धात भाग घेण्यासाठी तो आतुर झाला होता–वयाच्या पासष्टाव्या वर्षी !

–आणि ती संधी मिळताच तो आनंदाने नाचायचाच तेवढा बाकी राहिला ! चार्टवेल येथील त्याच्या निवासस्थानातील सर्व खोल्यांतील दिवे पुन्हा झगमगू लागले. सगळीकडे वाढती चहलपहल दिसू लागली. चर्चिलने स्कॉचच्या दोन बाटल्या रित्या केल्या. स्कॉचच्या तंद्रीत त्याने लाँग कोट चढविला, फेल्ट हॅट घातली. स्टँडवर ठेवलेली काठी हातात घेतली आणि तो चार्टवेलच्या पायऱ्या उतरू लागला.

आणि नौदलाकडे संदेश रवाना झाले. ' चर्चिल येत आहे, चर्चिल येत आहे ! ' ◻

## ६ : ब्रिटनचा सर्वोत्कृष्ट क्षण

चर्चिल म्हणजे मूर्तिमंत चैतन्य होते. याउलट चेंबरलेन हा थंड प्रवृत्तीचा माणूस होता. युद्धकाळात थंडपणा ठेवून चालण्यासारखे नव्हते. कारण त्या वेळी प्रचंड गतिमानतेची गरज होती व ती चर्चिलमध्ये वयाच्या पासष्टाव्या वर्षीसुद्धा भरपूर प्रमाणात होती. त्यामुळे ब्रिटनने जर्मनीविरुद्ध युद्ध घोषित करताच चढाईची व्यूहरचना आखण्यासाठी चर्चिलला बोलावण्यात आले.

कोणतेही निर्णय टेबलावर बसून न घेता घटनास्थळी प्रत्यक्ष भेट देऊन तावडतोब निर्णय घेऊन प्रकरण निकालात काढण्याचा चर्चिलचा खाक्या होता. त्याप्रमाणे नौदलाचे अधिकार हाती येताच सर्व बंदरांना, जहाजांना, गोद्यांना, जहाज-दुरुस्ती-ठिकाणांना भेटी देण्याचे सत्र त्याने सुरू केले.

चर्चिलचा प्रत्यक्ष बोलण्यावर भर असे. त्याने रूझवेल्टशी पत्रव्यवहार सुरू करून त्याचेशी वैयक्तिक मैत्री संपादन केली– आणि रशियाशी संबंध प्रस्थापित करण्यास सुरुवात केली. चेंबरलेनला ही गोष्ट कधीच जमली नसती.

१९४० च्या एप्रिलमध्ये जर्मनीने हॉलंड ताब्यात घेतले आणि नॉर्वेच्या रोखाने आक्रमण सुरू केले. आता ब्रिटनला बघ्याची भूमिका घेणे शक्य नव्हते. ब्रिटनने फार मोठा फौजफाटा जहाजाने नॉर्वेला रवाना केला. समुद्रावरील युद्धात आपण जर्मनीचा सरळ पराभव करू अशी ब्रिटिश सरकारला खात्री होती; पण नौदलाला हवाईदलाचे छत्र हवे असते, त्याशिवाय नौदल प्रभावी कामगिरी करू शकत नाही हे त्या वेळी कुणालाच उमगले नाही आणि ब्रिटनला नॉर्वेची मोहीम चांगलीच भोवली.

या मोहिमेमुळे ब्रिटनमध्ये सरकारविरुद्ध संतापाची लाट उसळली. कॉन्झर्वेटिव्ह सरकारच्या जागी राष्ट्रीय सरकारची स्थापना करण्यात यावी अशी मागणी करण्यात येऊ लागली.

लिओ अमेरी या सभासदाने तर सभागृहात चेंबरलेनवर भरपूर तोंडसुख घेतले. तो म्हणाला, ' महाराज, आपण कसलीही भरीव कामगिरी न करता या पदाचा भरपूर काळ उपभोग घेतलात. आता कृपा करून इथून निघून जा ! '

चेंबरलेन-विरोधाची उसळलेली लाट इतकी जोरदार होती की त्या लाटेने चेंबरलेनला अक्षरशः सभागृहाबाहेर काढले ! ब्रिटनमध्ये राष्ट्रीय सरकारची स्थापना करण्यात आली आणि चर्चिलच्या अंगावर प्रथमच पंतप्रधानकीची वस्त्रे चढविण्यात आली !

त्या दिवशी चर्चिल समाधानाने झोपी गेला. युद्धाचे नेतृत्व तो आता व्यवस्थितपणे करू शकणार होता. कारण त्याच्या हाती सर्व सत्ता एकवटण्यात आली होती. त्याला वाटत होते की आपली सांगड दैवाशी घालण्यात आली आहे आणि भवितव्यतेच्या हातात हात घालून आपली वाटचाल सुरू झाली आहे. आतापर्यंतचे त्याचे सारे आयुष्य म्हणजे या घटकेची सिद्धताच होती. यापुढचा काळ म्हणजे त्याच्या सत्त्वपरीक्षेचाच काळ होता.

लोकमताला वळण देण्याचे चर्चिलचे स्वतःचे तंत्र होते. रेडिओवरून जोरदार भाषणे करून त्याने ब्रिटनमध्ये प्रचाराचा गदारोळ उडवून दिला.

' तुम्ही विचाराल, आमचे धोरण काय ? ' एका भाषणात तो म्हणाला, ' आमचे धोरण आहे युद्ध करण्याचे– जमिनीवरून, समुद्रमार्गाने, आकाशात. हे युद्ध आम्ही पूर्ण सामर्थ्यानिशी करू. एका जुलमी राजवटीविरुद्ध– जिनं मानवी हत्येची परमावधी केली. '

त्यानंतर आवाज उंचावून तो पुन्हा म्हणाला, ' तुम्ही विचाराल, आमचे ध्येय काय आहे ? विजय हेच आमचे ध्येय आहे. कोणतीही किंमत चुकवून विजय, झोटिंगशाहीविरुद्ध विजय, मग विजयाकडे नेणारा मार्ग किती का लांबचा असेना–'

चर्चिलची ही भाषणे सुरुवातीला मोठी लोकप्रिय ठरली; पण पुढे मात्र ती लोकांना रटाळ व कंटाळवाणी वाटू लागली.

एखादी गोष्ट कुणावर लादावी असा चर्चिलचा आग्रह नसे. चर्चा करून तो ती गोष्ट स्वीकारण्यास भाग पाडत असे. त्याच्या कल्पनांना सतत विरोध करणाऱ्या व्यक्ती त्याला आवडत नसत. त्याची सजा

त्या व्यक्तींना भोगावी लागे. वॅव्हेल आणि ऑचिनलेक यांनी चर्चिलचा आदेश धुडकावून आक्रमण करण्याचे टाळले तेव्हा त्या दोघांचेही अधिकार चर्चिलने तात्काळ काढून घेतले. हॅलीफॅक्स हा चर्चिलचा पंतप्रधानपदाचा प्रतिस्पर्धी होता. तेव्हा चर्चिलने त्याला अमेरिकेत राजदूत म्हणून पाठवून दिले. ईडन व बेव्हिन या व्यक्ती मात्र चर्चिलच्या प्रभावापासून मुक्त राहून चर्चिलवर प्रभुत्व गाजवू शकल्या !

जर्मनीची मुसंडी नॉर्वे येथे रोखण्यास ब्रिटनला अपयश आले आणि मे १९४० मध्ये जर्मनीने लक्झेमबर्ग, हॉलंड व बेल्जियम ही राज्ये जिंकून फ्रान्सवर हल्ले करण्यास सुरुवात केली.

फ्रान्स जर्मनीचा तीव्र प्रतिकार करील अशी चर्चिलला आशा होती. फ्रान्सनंतर जर्मनीचे ब्रिटनवर सरळ हल्ले सुरू होणार होते. त्या दृष्टीने सिद्धता करण्यासाठी ब्रिटनमधील सुमारे बारा लाख लोकांचे स्थलांतर करण्यात आले आणि अठरा ते चाळीस वर्षे वयाच्या युवकांसाठी लष्करी शिक्षण सक्तीचे करण्यात आले. जर्मनीचा हल्ला फ्रान्सच्या किनाऱ्यावरच थोपविण्यासाठी इंग्लंडने डन्कर्क या फ्रान्सच्या किनाऱ्यावरील जर्मनीच्या ताब्यात असलेल्या बंदरावर जोरदार हल्ला चढविला. या हल्ल्यात ब्रिटनच्या तीनशे लढाऊ जहाजांनी व चारशेवीस इतर जहाजांनी भाग घेतला. डन्कर्कचा संग्राम हा ब्रिटनच्या दृष्टीने फारच संस्मरणीय ठरला. कारण जर्मनीने ब्रिटनच्या सैन्याची तेथे कोंडी करून त्या कोंडीतून कसे निसटायचे एवढेच काम ब्रिटिश सैन्यासमोर शिल्लक ठेवले.

चर्चिलने हे आव्हान स्वीकारून आपल्या सैन्याच्या मदतीसाठी जहाजाचा भला मोठा काफिला पाठविला. डन्कर्क येथे ब्रिटनचे सुमारे अडीच लाख सैन्य मृत्यूच्या खाईत अडकले होते. त्या सैनिकांची मुक्तता हे इंग्लंडच्या इतिहासातील सुवर्णाचे पान ठरले. या प्रसंगामुळे 'चर्चिलने आपल्या खांद्यावर आकाश पेलले आणि देशाच्या स्वातंत्र्याचे रक्षण केले,' असा चर्चिलचा गौरव करण्यात आला.

पण चर्चिलला मात्र डन्कर्कवर ब्रिटनचा पराभव झाला असेच वाटत होते.

'या घटनेला विजय कसा म्हणू हा मला प्रश्न पडला आहे.' चर्चिलने डन्कर्क-मोहिमेची माहिती देताना सांगितले, 'पण आम्ही शरणागती पत्करली नाही, एवढे मी खास म्हणू शकतो. यापुढे आम्ही समुद्रावर लढा देऊ, जमिनीवर युद्ध करू, शेतातून, रस्त्यांतून आमचा लढा सुरू राहील; पण आम्ही शरणागती पत्करणार नाही आणि या युद्धात ब्रिटन जर समाप्त झाले तर समुद्रापलीकडे असलेले आमचे साम्राज्य (म्हणजे भारत !) हा लढा सुरू ठेवील आणि लढण्यासाठी आमच्या हातांत शस्त्र उरले नाही तर हातात वाटल्या घेऊन त्यांनी आम्ही शत्रूचा प्रतिकार करू; पण आम्ही शरणागती पत्करणार नाही !' चर्चिलच्या या भाषणामुळे सारे इंग्लंड उत्तेजित झाले नसते तरच नवल !

डन्कर्कच्या लढ्यानंतर सारे इंग्लंड लष्करी छावणी झाले होते. ब्रिटनमधील कारखाने रात्रंदिवस काम करून युद्धसाहित्याचे उत्पादन करीत होते. चर्चिलने सर्व सत्ता आपल्या हाती एकवटून प्रत्येक गोष्टीवर स्वतः नियंत्रण ठेवण्यास सुरुवात केली होती.

फ्रान्सबद्दल चर्चिलचा जो विश्वास होता तो मात्र पुन्हा एकदा खोटा ठरला होता. जर्मनीशी झालेल्या युद्धात फ्रान्सचा पराभव झाला होता. फ्रान्सने शरणागती पत्करल्याचे कळताच चर्चिलसारखा कठोर हृदयाचा माणूस एखाद्या लहान मुलासारखा रडला ! युद्धाची भयानकता ब्रिटनच्या दाराशी येऊन ठेपली असल्याची त्याला जाणीव झाली. जिंकू किंवा मरू या जाणिवेतून शत्रूचा प्रतिकार करण्याचा त्याने निश्चय केला.

या वेळी संपूर्ण जगातील परिस्थिती ब्रिटनच्या दृष्टीने अत्यंत अडचणीची होती. सारे युरोप जर्मनीने जिंकून घेतले होते आणि रशियाबरोबर त्याने अनाक्रमणाचा करार केला होता. अमेरिकेने तटस्थ भूमिका घोषित केली होती. त्यामुळे या युद्धात आपली साथ द्यायला कुणी नाही याची चर्चिलला जाणीव झाली.

त्याने आपल्या मंत्रिमंडळाची बैठक बोलावली. त्यांना सारी परिस्थिती समजावून सांगताना तो म्हणाला, 'आपण आता एकटे पडलो आहोत; पण मला मात्र त्यामुळेच खूप उत्साह वाटत आहे !'

अमेरिकेने तटस्थतेचे धोरण स्वीकारले असले तरी त्याने ब्रिटनला शस्त्रसाह्य करावे यासाठी चर्चिलने अमेरिकेचे अध्यक्ष श्री. रूझवेल्ट यांना भले मोठे पत्र लिहिले. त्याने लिहिलेले हे सर्वांत मोठे पत्र होते. त्यात त्याने लिहिले होते की, 'ब्रिटनचा पराभव झाल्यास सारे जग जिंकून घेण्याचा जर्मनीचा मार्ग मोकळा होईल !'

या पत्रामुळे रूझवेल्टचे अंतःकरण हेलावले; पण तटस्थेच्या धोरणाने त्याचे हात बांधले गेले होते. शेवटी जुन्या एका कराराचा आधार घेऊन ब्रिटनला शस्त्रास्त्रे उसनी देण्यास त्याने मान्यता दिली.

अशा रीतीने तटस्थेला पर्याय सापडला. अमेरिका ब्रिटनला शस्त्रे विकू शकत नव्हती; पण उसनवारीने शस्त्रे देण्यास हरकत नव्हती. या करारामुळे ब्रिटनला शस्त्रास्त्रे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

युद्धकाळात मंत्रिमंडळाच्या बैठकी घेण्यासाठी एक विस्तृत तळघर बांधण्यात आले होते. या बांधकामाने सहा एकरांहून अधिक जागा व्यापली होती. या तळघरात युद्धाचे डावपेच तयार होत. चर्चिलची तेथे स्वतंत्र व्यवस्था होती. एवढेच काय पण क्लेमेन्टाइनसाठी तेथे झोपण्याची वेगळी खोलीदेखील होती !

मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चिल आपल्या प्रभावाने साऱ्यांना दिपवून टाकीत असे. कधीकधी या बैठकीत मूळ मुद्द्याशिवाय इतर गोष्टींचीच चर्चा होई. बैठकी रंगत आणि शेवटी कसलाही निर्णय न होता त्या संपुष्टात येत. कधीकधी सगळे मंत्री आपआपल्या खात्याच्या मागण्या पुढे मांडीत तेव्हा चर्चिल विनोदाने म्हणे, 'म्हाताऱ्या डुकरीला कास कमी अन् पोरं खंडीभर, तसा प्रकार इथे सुरू आहे !'

राष्ट्राला उद्देशून होणारी चर्चिलची भाषणे याच तळघरातून होत. १४ जून १९४० रोजी जर्मनीने पॅरिस जिंकून घेतल्याचे वृत्त राष्ट्राला सांगताना चर्चिलने आपल्या तळघरातील कचेरीतून भाषण देताना म्हटले, 'फ्रान्सचे युद्ध आता आटोपले आहे. आता ब्रिटनचे युद्ध सुरू होईल. या युद्धावरच ख्रिश्चन संस्कृतीचे भवितव्य अवलंबून आहे. युरोप पादाक्रांत केलेला जर्मनी आपल्या पूर्ण सामर्थ्यानिशी ब्रिटनवर हल्ला करील याची जाणीव ठेवा ! या बेटावर एक तर तो आम्हाला नामशेष करील वा स्वतः युद्धात पराभव पत्करील ! आपण

त्याचा प्रतिकार करू शकलो तर सारा युरोप पुन्हा स्वातंत्र्याचा सूर्य पाहू शकेल; पण यात जर का आपण हरलो तर सारे जग अंधःकाराच्या खाईत लोटले जाईल याची जाणीव असू द्या! या युद्धात जर आपण आपली मान ताठ ठेवू शकलो तर भावी पिढ्या या क्षणाचा गौरवपूर्ण उल्लेख करून म्हणतील की हा त्यांच्या जीवनातील सर्वोत्कृष्ट क्षण होता!'

या भाषणानंतर चर्चिल आपल्या निवासात परतला व आपले कपाटातील पिस्तुल काढून ते कोटाच्या खिशात ठेवीत वॉल्टर थॉमसन या आपल्या शरीरसंरक्षकाला म्हणाला, 'थॉमसन, हिटलर मला जिवंत कधीच पकडू शकणार नाही आणि यदाकदाचित त्यांनी मला पकडण्याचा प्रयत्न केलाच तर मी दोघा-तिघांचा बळी घेतल्याशिवाय राहणार नाही!'

पंतप्रधानांचे निवासस्थान म्हणून ओळखली जाणारी १० डाउनिंग स्ट्रीट ही इमारत त्या काळात शत्रूच्या विमानांचे लक्ष्य ठरण्याचा धोका होता. त्यामुळे स्टोरी गेटजवळील सरकारी इमारतीतील तळघरात चर्चिलचे कार्यालय जरी हलविण्यात आले होते तरी पण स्वतः चर्चिल फारच थोडा वेळ त्या कार्यालयात राही. ग्रूप अकराच्या लष्करी कार्यालयातून तो लष्कराला सूचना देत बसलेला असे.

जर्मनीच्या विमानांनी ब्रिटनच्या बंदरांवर जोरदार हल्ले करण्यास सुरुवात केली तशी ब्रिटनच्या हवाईदलाने त्यांचा जोरदार प्रतिकार केला. १५ सप्टेंबर १९४० च्या रात्री झालेल्या लढाईत ब्रिटनने जर्मनीची १८३ विमाने पाडली आणि जर्मनीचे 'वॉटरलू' झाले.

त्यानंतर जर्मनीने सूड घेण्याच्या उद्देशाने लंडनवर सरळ बॉम्बहल्ले सुरू केले. जर्मन-विमानांच्या लाटा लंडनवर धडकत बॉम्बहल्ले करीत, विध्वंसाचे नाटच चितारीत होत्या. सारे लंडन आगीने धगधगत होते. इमारती जळत होत्या आणि त्यांचे सांगाडेच केवळ शिल्लक उरले होते!

या संहारातही चर्चिलची बटु मूर्ती ओव्हरकोट घालून, हातात काठी घेऊन दुःखितांना धीर देण्याचे कार्य करीत होती. लॉर्ड इस्मे यांच्यासमवेत चर्चिल हिंडत असताना ते एका खंदकापाशी आले. या खंदकात आश्रय घेतलेले सुमारे चाळीस लोक बॉम्बहल्ल्यात ठार झाले होते. त्या ठिकाणी खूप लोक जमले होते.

चर्चिलला पाहताच ते सारे लोक चर्चिलभोवती गोळा झाले.

'विनी, तुम्ही इथे अवश्य याल असे आम्हाला वाटले होते,' ते सर्वजण जवळजवळ ओरडलेच.

चर्चिलला पाहून ते उत्साहित झाले होते.

'असले आघात आम्ही हसत हसत झेलू आणि त्यांचा बदला घेऊच घेऊ!' ते म्हणाले आणि त्यांनी आपल्या मुठी वळल्या.

चर्चिलच्या डोळ्यांत अश्रू उभे झाले! लॉर्ड इस्मे चर्चिलला त्या गर्दीतून बाहेर नेत असताना एक म्हातारी म्हणाली, 'त्याला आपली किती काळजी वाटते पाहा. त्याच्या डोळ्यांत अश्रु उभे झाले आहेत!'

लंडनमधील ते दिवस अत्यंत दुर्दैवी दिवस होते. लंडनवर रोज बॉंबहल्ले होत होते आणि रोज दहा-पंधरा हजार माणसं निर्वासित होत होती. वीज, पाणी व गॅसची यंत्रणा मोडकळीस आली होती. सर्व इस्पितळे जखमी स्त्री-पुरुषांनी भरलेली होती. रस्त्यावर कोसळलेल्या घरांचे ढीग साचले होते व रस्त्यातून हिंडणेही मुष्किल झाले होते. गटारे तुंबली होती आणि सर्वत्र घाणीचे साम्राज्य माजले होते. लंडनवासीयांचे नीतिधैर्य अशाही स्थितीत मजबूत होते व कोणत्याही संकटाशी सामना करण्यास ते सिद्ध झाले होते.

लंडनवर बॉम्बवर्षाव करून जर्मनीची युद्धयंत्रणा थकली; पण लंडनवासी प्रतिकार करीत राहिले. अखेर हिटलरने लंडन पूर्णपणे नेस्तनाबूत करून ब्रिटनला शरण आणण्यासाठी ७ सप्टेंबर रोजी सर्वांत मोठा विमानहल्ला केला.

या विमानहल्ल्यात जर्मनीच्या सुमारे पाचशे विमानांनी भाग घेतला आणि एका दिवसात सत्तर हजार बॉम्ब लंडनवर टाकले! लंडनवरील या विमानहल्ल्याची गंमत पाहण्यासाठी आजूबाजूच्या गावांतून शेकडो लोक लंडनमध्ये जमा झाले होते!

जर्मनीचा हल्ला मोडून काढण्यासाठी चर्चिलने द. आफ्रिकेत नवी आघाडी उघडली. या आघाडीमुळे इटालीला धोका निर्माण झालेला पाहताच, जर्मनीचा ब्रिटनवरील दबाव कमी झाला. लंडनमधील आकाशात जर्मनीची विमाने तुरळक दिसू लागली. बॉम्बस्फोटाचे आवाज बंद झाले आणि सतत चार महिने बॉम्बवर्षावात जीवन जगणाऱ्या लंडनवासीयांना बॉम्बची अंगाई बंद झाल्याने रात्री चुकल्याचुकल्यासारखे वाटू लागले! ◻

## ७ : हा तुमचा विजय आहे

## ४ मे १९४१ !

ब्रिटनवरील जर्मनीच्या हल्ल्याचा तो पहिला वाढदिवस होता! लंडन पार्लमेंटसमोर चर्चिल भाषण देत होता.

चर्चिल म्हणाला, 'आज बरोबर एक वर्षापूर्वी आपण सगळ्यांनी एकमेकांच्या हातात हात गुंफून जर्मनीबरोबर शेवटचे युद्ध लढण्याचा निर्धार केला होता. भूतकाळावर मी जेव्हा नजर टाकतो तेव्हा केवढी संकटे आपण पार केली, आपल्या राष्ट्राची नौका पर्वतप्राय लाटांना पार करीत कशी सुखरूप हाकारण्यात आली, याचे मन सुखविणारे चित्र माझ्यासमोर उभे राहते आणि कोणत्याही वादळाला आता भिण्याचे कारण नाही याची खात्री वाटू लागते. जोरदार वादळाने लाटा कितीही उंच उसळू देत, समुद्र कितीही प्रक्षुब्ध होऊ दे, आम्ही त्याला लीलया पार करून पुढे जाऊच जाऊ!' पण चर्चिलचे ते शब्द पूर्णपणे विरले नाहीत तोच ब्रिटनवर नवे संकट कोसळले!

आठच दिवसांनी जर्मन विमानांनी अचानक बॉंबफेक करून हाउस ऑफ कॉमन्सची नासधूस केली! त्या बॉंबफेकीनंतर चर्चिलने त्या उध्वस्त सभागृहाला भेट दिली, तेव्हा ते सभागृह ठिकठिकाणी आगीने धुमसत होते. अनेक ठिकाणी त्याची पडझड झाली होती.

चर्चिलने त्या उध्वस्त वास्तूवरून नजर फिरविली. तो उभे राहून भाषणे देत असे ती जागा, सभासदांच्या बसण्याच्या जागा, प्रेक्षकांची गॅलरी यांचे ध्वस्त अवशेष पाहताना तो उदास झाला. जणु त्याच्या

डोक्यावर असणारी हॅट आज कुणी तरी पायदळी तुडवली होती! आपल्या हातातील काठी आपटीत तो त्या सभागृहात हिंडत राहिला. त्यानंतर आपल्या सचिवाकडे वळून तो म्हणाला, 'हे सभागृह पूर्वी जसे होते तसेच पुन्हा नव्याने बांधून काढा; पण सभागृहाचे कामकाज सुरू राहिलेच पाहिजे!'

त्या वाक्यातून केवढा निर्धार, केवढा आत्मविश्वास व्यक्त होत होता!

त्यानंतर महिनाभरातच जर्मनीने रशियावर आक्रमण केले.

चर्चिलला कम्युनिझमचा अत्यंत तिटकारा होता; पण शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या न्यायाने त्याने रशियाला जर्मनीच्या आक्रमणापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी सर्व प्रकारची मदत देऊ केली. या नव्या आक्रमणाने बड्या राष्ट्रांच्या प्रमुखांची एखादी बैठक होणे जरुरीचे होते.

ही बैठक न्यूफाउंडलंड येथे घेण्याचे ठरले. चर्चिल व रूझवेल्ट यांची येथे बैठक झाली. या बैठकीसाठी चर्चिलने सुप्रसिद्ध अॅटलांटिक चार्टरचा आराखडा तयार करून आणला होता.

'जगातील सर्व लोकांना स्वतःचे सरकार स्वतः निवडण्याचा हक्क आहे,' हे या करारात मान्य करण्यात आले होते; पण हा हक्क भारताला देण्यास मात्र चर्चिलने स्पष्ट नकार दिला. कारण भारताशिवाय इंग्लंडचे साम्राज्य उभेच राहू शकत नाही याची यथार्थ जाणीव त्याला होती.

या बैठकीनंतर ब्रिटिश सैन्य रशियन सैन्याच्या खांद्याशी खांदा लावून जर्मनीशी लढू लागले; पण जर्मनीच्या तुफानी आक्रमणामुळे रशियाला मागे हटावे लागले. अखेर १६ ऑक्टोबर १९४१ त रशियाने मॉस्कोतून सरकारी कचेऱ्या हलविण्यास सुरुवात केली. मॉस्कोचा रशियाने प्राणपणाने प्रतिकार केला आणि ४ डिसेंबरमध्ये जर्मनीचे आक्रमण रोखून धरण्यास रशियाला अखेर यश मिळाले.

युरोपमध्ये युद्ध सुरू असतानाच अचानक जपानने पॅसिफिक महासागरात दुसरी आघाडी उभारली. पर्लहार्बरवरील हल्ल्याने जपान व अमेरिकेत सरळ युद्ध सुरू झाले. जर्मनीचा कोसळणारा प्रतिकार थोपवून धरण्यासाठी जपानने मनीला, सिंगापूर, जावा येथे जोरदार हल्ले केले. त्यामुळे जर्मनीची मॉस्कोवरील धडक थांबली; पण स्टालिनग्राडवर जर्मनीने आपली पूर्णपणे पकड बसविली होती, ती मात्र मुळीच सैल झाली नाही.




जपानचा पर्लहार्बरवर प्रथम हल्ला होताच चर्चिलने रूझवेल्टशी संपर्क साधून त्या हल्ल्याची खातरजमा करून घेतली.

'आपण आता एकाच बोटीतून प्रवास करीत आहोत.' रूझवेल्टने उत्तर दिले.

या घटनेने चर्चिल मनातून खूष झाला. कारण पर्लहार्बर हे अमेरिकेचे प्रशांत महासागरातील महत्त्वाचे लष्करी ठाणे होते. त्याच्यावर हल्ला झाल्यामुळे या युद्धात प्रत्यक्ष उतरल्याखेरीज अमेरिकेला आता गत्यंतरच नव्हते.

चर्चिलने मनोमन जपानचे आभार मानले आणि तो त्या दिवशी समाधानाने झोपी गेला!

त्यानंतर चर्चिल अत्यंत गुप्तपणे रूझवेल्ट यांच्या भेटीस अमेरिकेस गेला. चर्चिल अमेरिकेस आल्याचे वृत्त कळताच अमेरिकेत उत्साहाची लाट उसळली.

चर्चिल व रूझवेल्ट यांच्या भेटीची छायाचित्रे घेण्यासाठी छायाचित्रकारांनी एकच गर्दी केली. रूझवेल्टने चर्चिलची पत्रकारांना ओळख करून दिली; पण मागे उभे असलेल्यांना चर्चिलचे दर्शन होत नव्हते. त्यांनी तसा ओरडा करताच चर्चिल खुर्चीतून उभा झाला आणि आपली हॅट काढून सुहास्य वदनाने त्याने जमलेल्यांना अभिवादन केले!

चर्चिलची ती अनपेक्षित कृती पाहून सगळ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. आपल्या अमेरिकन प्रेक्षकांना चर्चिलने पहिल्या भेटीतच मुग्ध केले!

अमेरिकेतील आपल्या मुक्कामात चर्चिल सतत कामात व्यस्त होता. टब-बाथ घेतानाही तो काम करीत राही.

एक दिवस अध्यक्ष रूझवेल्ट आपल्या चाकाच्या खुर्चीत बसून चर्चिलच्या निवासात हजर झाले. त्या वेळी चर्चिलचे स्नान सुरू होते. ब्रिगेडियर लेस्ली हॉलिस यांचा सेक्रेटरी विल्यम जोन्स चर्चिलची स्नानगृहात भेट घेऊन बाहेर निघत होता. अध्यक्ष रूझवेल्ट आलेले पाहून तो थबकला.

रूझवेल्टनी त्याला चर्चिल आहेत का म्हणून विचारले.

त्यावर विल्यम जोन्सने उत्तर न देता बाथरूमकडे बोट दाखविले.

रूझवेल्ट यांच्या ध्यानात न येऊन त्यांनी जोन्सला ते दार उघडण्यास सांगितले.

जोन्सने दार उघडले.

आपल्या कंबरेभोवती टॉवेल गुंडाळीत चर्चिल आत उभा होता!

रूझवेल्ट यांना पाहून त्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य उमटलेले दिसत होते.

'माफ करा!' असं म्हणून रूझवेल्ट परत जाण्यासाठी वळले.

तेव्हा चर्चिल म्हणाला, 'त्यात क्षमायाचना करण्यासारखं काय आहे? अमेरिकेच्या अध्यक्षापासून लपवून ठेवावं असं ब्रिटनच्या पंतप्रधानाजवळ काहीही नाही!'

त्यानंतर अमेरिकेच्या दोन्ही सभागृहांसमोर भाषण करताना तो गंमतीने म्हणाला, 'माझे वडील ब्रिटिश होते व आई अमेरिकन होती; पण याच्या उलट घडले असते तर मी अमेरिकेतच जन्मलो असतो!'

—आणि सभागृहात हास्याची लाट उसळली!

जपानने एव्हाना सिंगापूर ताब्यात घेऊन ब्रह्मदेशच्या रोखाने मुसंडी मारली होती. भारतावर आक्रमण होण्याचा धोका निर्माण झाला होता आणि याच सुमारास स्वातंत्र्याच्या चळवळीने भारतात जोर धरला होता. अशा वेळी सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांचे भारतात आगमन झाले. चर्चिल यांनी दिलेली योजना घेऊन क्रिप्स भारतात आले होते. या योजनेत स्वयंनिर्णयाचे तत्त्व मान्य करण्यात आले होते; पण त्याच वेळी प्रांतांना व संस्थानांना स्वायत्तता देण्याचाहि विचार त्यात नमूद केलेला होता. ही योजना स्वीकारणे म्हणजे देशाचे अनेक तुकडे करण्यास मान्यता देण्यासारखेच होते. याशिवाय देशाच्या संरक्षणाची व्यवस्था ब्रिटनच्याच ताब्यात राहणार होती व हे कॉंग्रेसला मान्य होण्यासारखे नव्हते, त्यामुळे ही योजना फेटाळण्यात आली.

चर्चिलनी याचा ठपका म. गांधींवर ठेवला !

त्यानंतर ८ ऑगस्ट १९४२ रोजी झालेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात 'भारत – छोडो' ठराव मंजूर करण्यात आला. युद्ध ऐन भरास आले असताना भारतीय स्वातंत्र्य मिळविण्याचा जोरदार प्रयत्न सुरू झाला होता !

त्याच महिन्यात चर्चिलने मॉस्कोला भेट दिली. चर्चिल व स्टालिन यांची भेट सुखावह ठरली नाही. या बैठकीत दोन्ही नेत्यांत बरीच शाब्दिक तणातणी झाली.

'तुम्ही लढाईत केव्हा भाग घेणार आहात ?' स्टालिनने विचारले.

तुम्ही आम्हाला सगळं करू देणार आहात का ?' चर्चिलने प्रतिप्रश्न केला.

'तुम्ही युद्धात भाग तर घ्या. मग तुम्हाला सारं आपोआप जमेल !' स्टालिन म्हणाला.

हा टोमणा चर्चिलला झोंबला. आपली मूठ समोरच्या टेबलावर जोराने आदळून त्याने स्टालिनवर भरपूर तोंडसुख घेतले.

'तुमच्या सैन्यानं अतुल पराक्रम गाजविला आहे. त्याकडे बघून मी तुम्हाला माफ करतो. नाही तर––, ' चर्चिल संतापून म्हणाला. तो पुढे म्हणाला, 'ही बोलणी कशासाठी ठरवली ? त्याचा उपयोग तरी काय ? तुमच्याशी मैत्री करावी म्हणून मी इथवर आलो; पण–पण तुमची साथ नसेल तर ब्रिटन हिटलरशी एकटेच लढत राहील!' त्याचा गुबगुबीत चेहरा संतापाने आणखीनच फुलून आला होता व त्याचे गाल रागाने लाल झाले होते. आपले बारीक डोळे स्टालिनवर रोखून तो त्याचे मनोगत जाणून घेण्याचा प्रयत्न करी होता.

पण चर्चिल संतापला तरी स्टालिन शांत होता. वेताच्या खुर्चीत मागे टेकून बसत तो मोठ्याने हसला आणि म्हणाला, 'तुम्ही एवढे संतापला का तेच मला कळत नाही; पण तुमच्या वागण्यावर मी खूप आहे !'

त्या बैठकीतून चर्चिल बाहेर जाण्यास निघाला तेव्हा मात्र त्याचं मन शांत झालं होतं व त्याच्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसत होती.

फील्ड मार्शल मॉन्टगोमेरी हा त्या काळात आफ्रिकेतील लढाईचे सूत्रचालन करीत होता. जर्मनीचा कुशल सेनानी म्हणून ख्यात असलेल्या रोमेलने उत्तर आफ्रिकेवर आक्रमण केले होते. या आक्रमणाची सुरुवात ४ मार्च १९४१ रोजी झाली होती. हे आक्रमण रोखण्याचे काम चर्चिलने मॉन्टगोमेरीवर सोपविले होते. रोमेलचे आक्रमण मोडून काढण्यासाठी मॉन्टगोमेरीने एल् अलामीनवर रणगाड्यासह जोरदार हल्ला केल. ८ नोव्हेंबरला त्याने 'ऑपरेशन टॉर्च' या नावाने गाजलेली व्यूहरचना आखून अॅटलांटिक महासागरातून लढाऊ जहाजांचा ताफा रात्रीच्या अंधारात मोरोक्कोकडे रवाना केला. या जहाजावरील आठव्या आरमाराने मोरोक्को आणि अल्जेरियात जोरदार मुसंडी मारून रोमेलच्या सैन्याला पळता भुई थोडी केली. या युद्धात जर्मनीचे साडेसात लाख सैनिक मारले गेले.

या विजयी सैन्याला पाठविलेल्या संदेशात चर्चिलने म्हटले, 'एवढ्याने युद्ध संपले असे वाटू देऊ नका ! युद्धाचा शेवट होण्याची ही सुरुवात देखील नाही; उलट सुरुवातीचीच ही अखेर समजा !'

त्यानंतर जर्मनीची पीछेहाट सुरू झाली. रशियाने खारकोव्ह मुक्त केले तर ब्रिटिश-कॅनडाचे सैन्य इटालीत उतरविण्यात यश मिळाल्याने ८ सप्टेंबर १९४३ ला इटालीने शरणागती पत्करली आणि उलट जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले ! जर्मनी आता एकाकी पडला होता !

२८ नोव्हेंबर १९४३ रोजी रूझवेल्ट, चर्चिल व स्टालिन यांची तेहेरान येथे बैठक झाली व या बैठकीत जर्मनीवर तिहेरी हल्ला करण्याची योजना आखण्यात आली.

चर्चिलने या वेळी पोलंडचे राष्ट्रीय सरकार नष्ट करण्यात रशियाला साथ केली; पण त्याचा फायदा घेऊन स्टालिनने रुमानिया, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया ही राज्ये कायमची गिळंकृत केली.

या काळात चर्चिल सदैव युद्धआघाडीवर होता. मॉंटगोमेरीच्या सैन्याने जर्मन भूमीवर प्रथम पाऊल ठेवले तेव्हा चर्चिलने त्या ठिकाणास भेट दिली.

लष्कराच्या छावणीत तो हिंडला. सैनिकांना त्याने शाबासकी दिली आणि एका बॉंबवर खडूने 'खास हिटलरसाठी' असे खरडून तो बॉंब तोफेतून बर्लिनच्या दिशेने उडविण्यास सांगितले.

तोफेतून तो गोळा सुटताच जमलेल्या सैनिकांनी हर्षभराने टाळ्या पिटून आनंद व्यक्त केला !

युद्धात विजय ही आता काही दिवसांची गोष्ट उरली होती. अशा वेळी अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांचे निधन झाले,

चर्चिलला या घटनेने फार दुःख झाले.

तो आपल्या शरीरसंरक्षकास म्हणाला, 'थॉमसन, आपणा दोघांचा मित्र आपल्याला सोडून गेला आहे ! विजय काही क्षणांवर येऊन ठेपला असताना, तो मरण पावला असला तरी विजयाचे पंख त्याने पाहिले होते. त्याचा फडफडाट कानांनी ऐकला होता.'

८ मे १९४५ रोजी जर्मनीने शस्त्रे खाली ठेवली व संपूर्ण शरणागती पत्करली !

त्या दिवशी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात चर्चिल म्हणाला, 'जर्मनीने युद्धबंदी स्वीकारली असून जर्मनीचे युद्ध संपले आहे. ज्यांनी आजवर दुष्कृत्ये केली ते आता शरण आले आहेत. या घटनेबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठी आपल्याजवळ फारच थोडा अवधी आहे. कारण अद्याप जपानचे युद्ध संपलेले नाही. ब्रिटानिया, आगे बढो ! स्वातंत्र्याचे समर अमर रहो ! गॉड सेव्ह द किंग !'

त्यानंतर १०–डाउनिंग स्ट्रीटमधून तो हाउस ऑफ कॉमन्सकडे

जाण्यास निघाला तेव्हा रस्त्याच्या दुतर्फा लोकांची अपार गर्दी जमली होती. पार्लमेंट स्क्वेअरवर त्याची मोटार आली तेव्हा तो बसलेला उभा झाला व गाडीच्या सीटवर चढून बसला. त्या वेळी त्याच्या लक्षात आले की त्याचा सुप्रसिद्ध चिरूट त्यांच्या तोंडात नाही ! तेव्हा तो थॉमसनवर ओरडला, 'जा लवकर चिरूट आण ! माझ्या तोंडात सदैव चिरूट पाहण्याची या लोकांना सवय झाली आहे !'

मग लोकांना उद्देशून तो म्हणाला, 'देव तुम्हाला सुखी ठेवो ! हा विजय तुमचा आहे. आपल्या संपूर्ण इतिहासात इतका उत्कृष्ट, चिरस्मरणीय दिवस आजवर कधी आला नव्हता !' आणि लोकांकडे पाहून त्याने आपली दोन बोटे उंच धरली. ब्रिटनच्या विजयाची ती खूण होती !

## ८ : असे व्यक्तित्व पुन्हा न होणे !

काही व्यक्ती अशा भाग्यशाली असतात की त्यांच्या वाट्याला उच्च-पद नेहमीच येत राहतं, तर काहींना मात्र आयुष्यभर आपले पद टिकविण्यासाठी संग्राम करावा लागतो. यश-अपयशाचा खेळ त्यांच्या जीवनात सतत सुरू असतो.

चर्चिलच्या आयुष्यात ऊन-पावसाचा हा खेळ जीवनाच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत सतत सुरू होता.

युद्धातील विजयामुळे चर्चिलच्या यशात मानाचा तुरा खोवला गेला होता व तो अनेकांना खुपत होता. त्यामुळे विजयदिनाचे नगारे वातावरणात निनादत असतानाच सुमारे तीन महिन्यांच्या अवधीत चर्चिलला त्याच्या पदावरून दूर करण्यात आले. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत त्याला पराभव पत्करावा लागला.

युद्धनेतृत्वाबद्दल त्याला 'ऑर्डर ऑफ गार्टर' ही सन्माननीय पदवी देण्याचे ठरले तेव्हा तो म्हणाला, 'मी ड्यूकपदाची कधी पर्वा केली नाही मग त्यापुढे या मानसन्मानाची मातब्बरी ती काय ? लोकांनी मला नुकतीच 'ऑर्डर ऑफ बूट' दिली नाही काय ?'

आपल्या पराभवाचा त्याने खिलाडूपणाने स्वीकार केला असला तरी त्याबद्दल त्याच्या मनात केवढा कडवटपणा होता हेच यावरून दिसून येते.

ज्या सभागृहात पंतप्रधानाचे पद भूषविले त्याच सभागृहात चर्चिलला विरोधी पक्षात बसावे लागावे ही दैवलीलाच नाही तर काय ?

त्यानंतर चर्चिलने पुन्हा चित्रे रंगविण्यास सुरुवात केली. वयाच्या सत्तराव्या वर्षीदेखील त्याचा चित्रे रंगविण्याचा उत्साह दांडगा होता. त्याच्या एका चित्राला तर तेरा हजार पौंडांचे बक्षीस देखील मिळाले ! त्याची चित्रे रॉयल अॅकाडेमीत प्रदर्शित करण्यात आली.

चित्रे रंगविण्याबरोबरच त्याला शेती करायला व घोड्यावरून रपेट करायला मनापासून आवडायचे. त्याशिवाय त्याने दुसऱ्या महायुद्धावरील आठवणींचे लेखनकार्य हाती घेतले होते. या कामासाठी त्याने लेखक, इतिहासकार, संशोधक यांचा ताफाच जवळ बाळगला होता. दुसऱ्या महायुद्धाच्या आठवणींचे एकूण सहा खंड त्याने लिहून काढले.

चर्चिल ७९ वर्षांचा असतानाही त्याचा उत्साह तरुणाला लाजवील असा होता. त्याचे गाल गुबगुबीत होते, डोळे बारीक होते व त्यामुळे त्याचा चेहरा बुलडॉगसारखा दिसायचा ! 'बुलडॉग वॉरियर' म्हणूनच तो प्रसिद्ध होता. वयाच्या ७६ व्या वर्षी निवडणूक जिंकून २६ ऑक्टोबर १९५१ रोजी ब्रिटनचे पंतप्रधानपद पुन्हा त्याच्याकडे चालत आले. क्लेमंट अॅटलीने सहाव्या जॉर्जच्या हाती आपल्या पदाचा राजीनामा सोपविला.

१९५२ साली सहाव्या जॉर्जचे निधन झाले आणि दुसरी एलिझाबेथ राज्यावर आली. राज्यारोहणाचा फार मोठा सोहोळा १९५३ सालच्या जून महिन्यात पार पडला. जगातील प्रमुख व्यक्ती या सोहोळ्यासाठी लंडनला आल्या होत्या.

१९५३ सालीच चर्चिलला साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळाले.

१९५३ सालीच चर्चिलला 'नाईटहूड' देऊन गौरविण्यात आले.

नाईट-हूड देण्याचा कार्यक्रम विंडसर किल्ल्यात झाला. या कार्यक्रमाला क्लेमेन्टाइन चर्चिल हजर होती. तिच्या देखतच चर्चिलने २७ वर्षे वयाच्या आपल्या राणीसमोर गुडघे टेकले. राणीने त्याच्या खांद्याला हातातील तलवारीने स्पर्श केला.

त्याला 'ऑर्डर ऑफ गार्टर'ने विभूषित करण्यात आले. चर्चिल आता सर विन्स्टन चर्चिल झाले होते !

मार्च १९५५ साली वृत्तपत्रात एक बातमी झळकली.

सर अॅन्थनी ईडन यांचेसाठी चर्चिल आपले पद सोडून देणार आहेत ! या घोषणेने सारे ब्रिटन चकित झाले !

आपल्या पदत्यागापूर्वी सर चर्चिलनी आपल्या सहकाऱ्यांना खाना दिला. या खान्याला राणी एलिझाबेथ हजर होती. त्यापूर्वी अशी घटना ब्रिटनच्या इतिहासात कधीच घडली नव्हती !

दुसऱ्याच दिवशी चर्चिलने पंतप्रधानांचे निवासस्थान सोडून दिले व 'चार्टवेल' या आपल्या निवासस्थानी तो पुन्हा रहावयास गेला.

'शेवटी आपले घरच बरे असते !' चार्टवेलला पोचताच चर्चिलच्या तोंडातून उद्गार निघाले.

त्यानंतर चर्चिल अधूनमधून आजारी असायचे; पण आजारातही ते सतत काम करीत.

कुणी सांगितले तरी त्याचे न ऐकता ते काम करीत बसत.

अखेर ब्रॅन्डन ब्रॅकन या त्यांच्या जिवलग मित्राने त्यांना बजावले, 'तुम्ही असे आजारपणात काम करीत रहाल तर लौकरच या जगाला सोडून जाल ! ही तुमची कागदपत्रे तुम्हाला शहीद करतील !'

टेबलाशी बसून कागदपत्रे चाळीत बसलेल्या चर्चिलना ब्रॅकनच्या बोलण्याचा राग आला. ते त्याच्यावर जोराने ओरडले, 'तू जा खड्डयात !'

पण मग मात्र त्यांनी सारी कागदपत्रे आवरून ठेवली व ते खुर्चीत मागे रेलून स्वस्थ पडून राहिले !

शेक्सपियरची नाटके पाहणे हा त्यांचा आणखी एक नाद होता.

शेक्सपिअरची मुख्य नाटके तर त्यांना मुखोद्गत होती.

एकदा ते हॅम्लेट पाहायला गेले. हॅम्लेटची भूमिका रिचर्ड बर्टन करीत होता. बर्टन स्टेजवर आला आणि त्याची नजर पहिल्या रांगेत बसलेल्या प्रेक्षकांकडे गेली.

पहिल्या रांगेत अगदी समोरच विन्स्टन चर्चिल बसले होते.

बर्टनने हॅम्लेटचे संवाद म्हणायला सुरुवात केली, तेव्हा मंद स्वरात तेच संवाद कुणी तरी त्याचेबरोबर म्हणत असल्याचा त्याला भास झाला. त्याने आपले संवाद जलद म्हणायला सुरुवात केली. तशी तितक्याच जलदतेने म्हटलेले ते संवाद त्याच्या कानी आले.

चर्चिलच बर्टनबरोबरीने हॅम्लेटचे संवाद म्हणत होते !

त्यानंतर बर्टन व चर्चिल यांच्यात हॅम्लेटचे संवाद म्हणण्याची जुगलबंदीच सुरू झाली. बर्टनने मधेच आपले संवाद हळू म्हटले की चर्चिलही ते हळू म्हणत. बर्टनने आपल्या बोलण्याचा वेग वाढविला की चर्चिल यांच्या बोलण्याचाही वेग वाढू लागे. बर्टनने चर्चिलला चुकविण्याचा प्रयत्न केला; पण अंहं—चर्चिलनी त्याचा शेवटपर्यंत पिच्छा पुरविला !

अमेरिकेचे अध्यक्ष श्री. केनेडी यांनी ९ एप्रिल १९६३ रोजी सर विन्स्टन चर्चिल यांना 'अमेरिकेचे प्रथम सन्माननीय नागरिक' म्हणून गौरविले. हा समारंभ व्हाइट हाउसच्या बगिच्यात झाला. या वेळी त्यांना जे मानपत्र देण्यात आले त्यात म्हटले होते, 'सर चर्चिल यांना हाउस ऑफ कॉमन्सने जन्म दिला आणि पुढे त्यांनीच त्या सभागृहाचे पितृत्व स्वीकारले. त्यांचा अमेरिकेचे प्रथम नागरिक म्हणून हा सन्मान करण्यात येत असला तरी त्यांनी तो स्वीकारावयास मान्यता देऊन आमचाच गौरव केला आहे. कोणत्याही पदवीने वा मानपत्राने त्यांच्या नावलौकिकात भर पडण्यासारखी नाही. कारण सर विन्स्टन चर्चिल हे नावच मानचिन्ह बनलेले आहे !'

या सन्मानानंतर चर्चिलनी पार्लमेंटच्या निवडणुका लढवण्याचे सोडून दिले. एव्हाना ते नव्वद वर्षांचे झाले होते; पण त्या उतारवयात ते चाकाच्या खुर्चीत बसून पार्लमेंटमधील प्रेक्षकांच्या गॅलरीत बसून सभागृहात होणारी भाषणं कान देऊन ऐकत. कधी ते काठी टेकत सभागृहात येऊन बसत. अशा वेळी पंतप्रधान पुढे होऊन त्यांचे सभागृहात स्वागत करीत. सभागृहात होणारी चर्चा जरा वेळ ते ऐकत आणि मग जाण्यासाठी निघत. जाताना त्यांची पावलं सभागृहाच्या दाराशी रेंगाळत. त्यांचे लक्ष अभावितपणे सभागृहाच्या प्रवेशद्वाराशी असलेल्या कमानीकडे जाई. जर्मन बॉम्बहल्ल्यात हे सभागृह कोसळल्यानंतर हे सभागृह पुन्हा नव्याने बांधण्यात आले. त्या वेळी ही कमान त्या सभागृहाच्या उध्वस्त अवशेषातून, छिन्नभिन्न झालेल्या दगडातून निर्माण केली होती व तिला 'चर्चिल आर्क' (चर्चिल कमान) असे नाव देण्यात आले होते.

त्या सभागृहात उभारण्यात आलेले ते चर्चिल यांचे खरेखुरे स्मारक होते. त्या कमानीकडे बघितले की चर्चिलना दुसऱ्या महायुद्धातील ते संस्मरणीय दिवस आठवत व त्या आठवणींनी त्यांना गहिवरून येई.

२८ जुलै १९६४.

ब्रिटनच्या इतिहासातील पुराणपुरुष या दिवशी इहलोक सोडून गेला ! सतत नव्वद वर्षे देशाची चिंता उरात बाळगणारा प्रपितामह जनमानसात कायमचा ठसा उमटवून निघून गेला !

पार्लमेंटमध्ये ज्या जागेवर सर चर्चिल बसत ती खुर्ची त्या दिवशी खऱ्या अर्थाने रिकामी झाली. त्या दिवशी चर्चिल यांना श्रद्धांजली अर्पण करताना ब्रिटनचे पंतप्रधान हॅरॉल्ड मॅक्मिलन म्हणाले, 'ब्रिटनच्या इतिहासात आजवर अनेक उत्कृष्ट शासक होऊन गेले, अनेक नेते झाले; पण सर चर्चिल यांना मागे टाकणारा एकही नेता झालेला नाही. चर्चिल यांना वक्तृत्वाची अभिजात देणगी मिळालेली होती! त्यांचे वक्तृत्व क्वचित घणाघाती, कधी मर्मभेदक तर मधूनच हास्याची कारंजी फुलविणारे होते.'

'ज्या जीवनाचा आज आपण सन्मान करीत आहोत ते खरोखरीच अद्वितीय होते. शेक्सपिअरच्या शब्दात सांगायचे म्हणजे असे व्यक्तित्व पुन्हा होणे नाही ! ( When comes such another ! )

'त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव करण्यासाठी युद्धस्मारकावर त्यांनीच कोरून ठेवलेल्या शब्दांची आठवण होते. ते शब्द होते, 'युद्धात निर्धार, पराभवात प्रतिकार, विजयात मनाचा मोठेपणा, शांततेत सद्भावना !'

चर्चिल हे जीवनापेक्षाही मोठे होते. त्यांना आधुनिक सीझर किंवा नेपोलियन म्हणणेच जास्त सयुक्तिक ठरेल. ब्रिटनचे मन त्यांनी जाणले होते, याशिवाय घटनांचे आकलन त्यांच्याइतके कधीच कुणाला झाले नाही ! उत्साहाचा अखंड झरा त्यांच्या ठायी वाहत होता. या झऱ्याने त्यांच्या बुद्धिमत्तेला जीवन पुरविले आणि त्यांना मोठेपणा प्राप्त करून दिला; ब्रिटनलाही मोठे केले !

**स मा प्त**

---

## आंतरराष्ट्रीय महिलावर्षाच्या निमित्ताने भरणारी संयुक्त स्त्री-मुक्ति-संघर्ष परिषद, पुणे

महाराष्ट्रामध्ये स्त्रियांच्या प्रश्नाबाबत विचार करणाऱ्या व ते प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणाऱ्या अनेक संस्था काम करीत आहेत. ह्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या निरनिराळ्या संस्थांचा व संघटनांचा परस्पर परिचय व्हावा, एकमेकांच्या कार्याची व प्रश्नांची माहिती व्हावी आणि अशा प्रयत्नांचे एकसूत्रीकरण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावा यासाठी पुणे येथे ऑक्टोबर महिन्यात संयुक्त स्त्री-मुक्ति-संघर्ष परिषद आयोजित करण्यात येत आहे. ही परिषद पुणे येथे शनिवार व रविवार दिनांक १८ व १९ ऑक्टोबर १९७५ या दिवशी होईल.

**स्थळ** : शारदा सभागृह, स. प. महाविद्यालयाच्या पिछाडीस, पुणे ४११ ०३०

**पत्रव्यवहाराचा पत्ता** : विद्या खरे, १२, सुनीम अपार्टमेंट, प्रभात रोड, गल्ली क्रमांक ७, पुणे ४११ ००४.

---

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

४-१०-७५ ते १०-१०-७५

### श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कौशल्याचा प्रभाव

अमेरिकेचे अध्यक्ष फोर्ड यांनी भारताच्या अंतर्गत कारभाराबद्दल जी मुक्ताफळे उधळली ती भारतीय जनतेचा संताप वाढवणारी ठरली तर नवल नव्हते. या पार्श्वभूमीवर भारताचे परराष्ट्रमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांचा संयुक्त राष्ट्र-संघाच्या आमसभेत व इतरत्र भाषण करण्याचा योग हा एका अर्थाने योगायोगच होय. त्यांची तेथे कसोटी लागणार असली तरी त्यांची जगातील राष्ट्रांवर अनुकूल प्रतिक्रिया घडेल अशीच कामगिरी होणार असून भारताची मानदेखील ते उंचावल्या-खेरीज राहणार नाहीत. अमेरिका व भारत यांच्यात जी पुन्हा दरी निर्माण होऊ पाहात आहे ती थांबवण्याचे काम श्री. चव्हाण यांच्याकडून नक्कीच होईल. भारताच्या मिथुनलग्नी सामर्थ्याचा साक्षात्कार घडव-णारा मंगळ प्रविष्ट झाला आहे. तो भारताच्या राजकारणावरही प्रभाव पाडणार आहे. महापूर, ओला दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्तींनी उत्तर भारत त्रस्त असला तरी लोकांना समाधान वाटावे असेच घडेल. वाढत्या किमतींना आळा बसल्याचा थोडा-फार प्रत्यय येऊ लागेल. कायद्याचे राज्य हा शब्दप्रयोगही लोकांना आवडू लागेल. मुख्य मंत्री शंकरराव चव्हाण यांना मनाविरुद्ध काही निर्णय घ्यावे लागणार आहेत.

---

### मेष : प्रगतीला मोकळी वाट

गुरु-शनीचा त्रिकोणयोग तुमच्यासाठी काही तरी चांगले करावे म्हणूनच निर्माण झाला आहे. बारावा गुरु स्वगृही आहे. त्यामुळे तुमचा पैसा उडाला तरी तो चांगल्या कामासाठीच उडेल. पुस्तके, प्रकाशने, शेती-वाडी अशा कामासाठी तुम्हाला पैसा खर्च करावा लागेल. यापुढे तुमची तब्येत चांगली राहणार असून औषधपाण्यासाठी होणारा खर्च थांबणार आहे. नोकरीचाकरीच्या बाबतीत काही अनुकूल व महत्त्वपूर्ण असे बदल होणार आहेत. इतके दिवस बढती-प्रमोशन तुमचा क्लेम असूनही तुम्हाला मिळण्यात अडचणी येत होत्या. आता मात्र ते काम मार्गी लागणार आहे. अडथळे व विरोध दूर होऊन तुमच्याबाबतीत सहानु-भूतीचा विचार चालू होणार आहे. खाजगी नोकरीत याचा विचार व अनुभव अधिक येणार आहे. बेकारीला तुम्ही कंटाळला आहात याची दैवाला काळजी आहे. म्हणूनच तुम्हाला काही तरी काम देण्याची योजना तुमच्यासमोर येईल. त्याचा तुम्ही स्वीकार करा. सोमवार, मंगळवार, शुक्रवार हे दिवस महत्त्वाचे ठरतील. अपेक्षित पत्रे येतील. उत्तरे समाधानकारक मिळतील. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अभिनय शिकून घ्यावा. तो व्यवसाय होऊ शकेल. आरोग्याची मात्र काळजी घ्यावी. महिलांना लघुउद्योगाच्या नव्या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळेल. चालू उद्योगातही प्रगतीची चिन्हे दिसू लागतील.

### वृषभ : अडचणींवर मात

हळूहळू होणारी सुधारणा हीच शेवटी टिकाऊ ठरते हे आता तुम्हाला अनुभवाने कळून येईल. मनात असलेल्या आशाआकांक्षा पुऱ्या होत नाहीत व अडचणींवर अडचणी येत होत्या म्हणून तुम्ही नाराज होत होता. तशी पाळी आता यापुढे तुमच्यावर येणार नाही हे मला मुद्दाम सांगावेसे वाटते. अनेक दिवस तुमचे डोके खाणारा एखादा प्रश्न-समस्या सुटण्याचा मार्ग आता तुम्हाला सापडणार असून यात सन्मान्य तडजोड होऊन तुमचा त्रास कमी होणार आहे. दुसरा मंगळ आर्थिक क्षेत्रात तुमच्या योजनांना यश मिळवून देणारा आहे. या वेळी मिथुनराशीतील हा मंगळ प्रकाशन व बौद्धिक क्षेत्रात मने घडवण्याची प्रेरणा देणार आहे. या आठवड्यातील शनिवार, बुधवार व शुक्रवार तुम्हाला अनुकूल आहेत. कोणत्याही महत्त्वाच्या कामात प्रगतिकारक घटना घडतील. अपेक्षित करार, अपेक्षित पत्रव्यवहार असे काही तरी घडू शकेल. कलापदवीधर, शेतीपदवीधर व इतिहासअभ्यासक यांना सरकारी आश्रय व मदत मिळणार आहे. चालू नोकरीत बदल करू नये. प्रमोशन मात्र याच वेळी मिळेल असे नाही. कामाचा ताण कमी होईल. उपासना करण्याची इच्छा सफल होईल. विद्यार्थी व विद्यार्थिनींना शिकताशिकताच पैसा मिळवण्याची संधी चालून येईल. महिलांना भरतकाम, विणकाम वगैरे क्षेत्रांत स्वकष्टाने पैसे मिळण्याचा योग आहे.

### मिथुन : व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटेल

गेल्याच आठवड्यात मंगळाने तुमच्या राशीत पदार्पण केले आणि तुमच्याबाबती-तील सारे तंत्रच बदलले आहे. साडेसाती असली तरी शनीदेखील तुम्हाला अनुकूल झाला आहे. आता तुम्ही कोणत्याही क्षेत्रात बाजी मारू शकाल. जे जे मनात आणाल ते ते करून दाखवण्याचे सामर्थ्य तुमच्यात प्राप्त होईल. या वेळी तुमच्या कामावर, कार्यावर व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटणार आहे. रविवार, बुधवार व शुक्रवार तुम्हाला यश व सिद्धी प्राप्त होणार आहे. नवे काही करण्याची प्रेरणा तुम्हाला मिळणार आहे. तुम्ही लेखक असाल तर तुमची वाङ्मयीन क्षेत्रात प्रतिष्ठा उंचावणार आहे. तुमची प्रतिभा जागृत होणार असून उत्तम असे साहित्य तुमच्या-कडून लिहून होणार आहे. तुमच्या वाङ्मयाला मागणीदेखील चांगली येणार आहे. नोकरीच्या दृष्टीने काही अकल्पित अशा घटना घडू शकतील. या क्षेत्रात एक महत्त्वाची व्यक्ती तुमचे काही भले करण्यासाठी उत्सुक असल्याचा प्रत्यय तुम्हाला येईल. वरिष्ठ दर्जाची जागा तुमच्या पदरात पडेल किंवा तुमची शिफारस तरी होईल. पदवीधर बेकारांनी स्वतंत्र उद्योग जास्त पसंत करावा. त्यासाठी त्यांना भांडवल व तंत्रज्ञान मिळू शकेल. व्यापारी लोकांनी परिस्थितीशी जुळते घेण्याची जास्त गरज आहे. विद्यार्थी-विद्यार्थिनी वक्तृत्वकलेत चमकतील. महिलांना नोकरीत प्रयत्न करायला हरकत नाही.

**कर्क : मतभेद टाळा**

हा आठवडा काही चांगले वरदान तुमच्यासाठी घेऊन येत आहे हे मला लिहायला आनंद वाटतो. शनिमहाराज राशीत आल्यापासून तुमचा प्रभाव वाढला आहे यात शंकाच नाही. अनेक विक्रम करण्याचे तुमचे मनसुबे काही प्रमाणात पुरेदेखील झाले आहेत. नोकरीधंद्याची तुमची परिस्थिती सुधारली आहेच. नोकरीत आशाआकांक्षा जरी हव्या तेवढ्या पुऱ्या झाल्या नाहीत तरीदेखील मागच्यापेक्षा अनुकूल बदल तुम्हाला जाणवत असेलच. या आठवड्यात काही जास्त अनुकूल घडावे असे नियतीचे म्हणणे आहे. तुम्ही नोकरीसाठी प्रयत्न करीत असाल तर शाळा, महाविद्यालये, इंजिनियरिंग उद्योग, खतप्रकल्प, सरकारचे रेव्हेन्यूखाते, न्यायालय या क्षेत्रांत प्रयत्न करावा. शनिवार तुम्हाला या वेळी विशेष फायदा मिळवून देणार आहे. चालू नोकरीत तुमची जबाबदारी व दर्जा वाढणार आहे. काही बदलही संभवतो. बुधवार, शुक्रवार उपासनेमुळे तुम्हाला बरेच स्वास्थ्य लाभणार आहे. व्यापारी लोकांनी नव्या मालाची मोठी उलाढाल करायला हरकत नाही. या वेळी तुम्ही कोणत्याही कामाच्या बाबतीत मतभेद होऊ देऊ नका. विद्यार्थ्यांना शिस्तीसाठी कानपिचक्या मिळतील. महिलावर्गाने हाताखालच्या माणसांना सांभाळून घेण्याकडे वृत्ती ठेवावी.

**सिंह : यशाचे चौघडे**

बाराव्या शनीचा बाऊ तुम्ही मुळीच करू नका. कारण तो इतक्यातच काही तुम्हाला त्रास देणार नाही. या आठवड्यात तुमचे राजकीय जीवन सर्व परिस्थितीवर मात करून तुमची प्रतिष्ठा वाढवणार आहे. लाभस्थ मंगळाच्या हाती तुमची या वेळी सूत्रे आहेत. तुम्ही जर राजकीय नेते, पुढारी असाल तर या वेळी तुमच्या मुत्सद्देगिरीचे कौतुक होईल. इतर बाबतीत हा आठवडा प्रगतिकारकच नव्हे तर तुमच्या यशाचे चौघडे वाजवणारा आहे. तुमच्यावर जर एखादे बालंट आणण्याचा प्रयत्न करून तुम्हाला नोकरीत त्रास देण्याचा प्रयत्न झाला असेल तर ते संकट या आठवड्यात टळणार आहे. तो वरिष्ठ अधिकारी अगर मालक एखाद्या लफड्यात तुमच्या हाती सापडेल. बेकारांना या वेळी काही तरी आशादायक असे घडेल. नोकरी तात्पुरती मिळेल. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या बाबतीत बरेच परिश्रम करावे लागतील. सोमवार शुभकारक घटना घडतील. महिलांना त्रास होणे या आठवड्यापासून कमी होईल. नोकरीचा प्रयत्न करावा.

**कन्या : मंगळाचे वरदान**

तुमच्या जन्मकुंडलीत जर मंगळ तुम्हाला अनुकूल असेल तर तो या वेळी तुम्हाला यश व सफलता देणार आहे. हा दशमाचा मंगळ म्हणजे एक प्रकारे माणसाला वरदानच होय. आशाआकांक्षा सफल करणे, महत्त्वाकांक्षेला उत्तेजन देणे, उद्योगधंद्यात नवनवीन कल्पनांना स्फूर्ती देणे व हे सारे घडवून आणण्याचे सामर्थ्य बहाल करणे हे या वेळच्या मंगळाचे मोठे कार्य आहे व ते तुमच्या वाट्याला आले आहे. या वेळच्या लॉटरीच्या सोडतीत तुम्ही भाग्यवान ठरलात तर आश्चर्य वाटून घेऊ नका. नोकरीत तुमच्या सुप्त गुणांना वाव मिळणार असून तुम्ही तुमच्या या गुणाचा वरिष्ठावर अगर मालकांवर सहज प्रभाव टाकू शकाल. तुम्हाला जे काही मागावयाचे असेल ते या वेळी मागा, सहानुभूतीने विचार होईल. कन्याराशीची कोणतीही व्यक्ती या वेळी बेकार अगर उद्योगाशिवाय राहणार नाही. विद्यार्थ्यांना मोठे यश मिळेल. शिकताना पैसे मिळवण्याची संधी तर मिळेलच. महिलांचा त्रास कमी होईल. आजार कमी होईल. प्रसन्नता वाटेल.

**तूळ : लॉटरीत फायदा**

सध्या तुम्हाला रवि प्रतिकूल आहे; पण तो नाही तरी तुम्हाला फारसा अनुकूल फल देतच नाही. तुमचे आर्थिक जीवनमान या वेळी उंचावणार आहे. लॉटरीत भाग घेत असाल तर या वेळी फायदा होईल. घेत नसाल तर अवश्य घ्या. स्थावराचे वाद या आठवड्यामध्ये तुमच्या फायद्याचे ठरतील. तुम्हाला जमीन अगर घर मिळू शकेल. राजकारणात मात्र तुम्ही या वेळी विशेष भाग घेऊ नका. अपमानाचा प्रसंग येईल. विरोधकांचा डाव जरी यशस्वी झाला नाही तरी तुम्हाला यश नाही. नोकरीविषयक जुन्या मागण्या या आठवड्यात मार्गी लागतील. सहानुभूतीतच विचार होईल. तुम्ही लेखक असाल तर विनोदी अगर तात्विक लेखन तुमच्या हातून होईल. कलावंताना लोकावर प्रभाव पाडता येईल. चित्रकार व नाट्यकलावंत यांना यश जास्त मिळेल. बेकारांना आश्वासन मिळेल. शेतीचा व्यवसाय प्रगतीचा वेग घेईल. विद्यार्थी-विद्यार्थिनी चैनी बनतील. महिलांना नोकरीत महत्त्व प्राप्त होईल. वक्तृत्व व लेखन लोकप्रिय होईल.

**वृश्चिक : आर्थिक स्थित्यंतर**

जीवनात काही विशेष घडावयाचे असेल तर मंगळ हाच ते घडवू शकतो. तो तुमचा राशिस्वामी आहे. बाराव्या हर्शलची तुम्ही आता मुळीच पर्वा करू नका. राहूही या आठवड्यात तुम्हाला अनुकूल आहे. शेतीवाडी, जमीनजुमला, घर, फ्लॅट, प्लॉट या



VP-735

सर्व बाबतींत तुमचा कुठे ना कुठं तरी संबंध हा येणारच आहे. यात जो तुमचा प्रश्न असेल तो मोठे यश तुमच्या पदरात टाकणार आहे. तुमचे येणे-देणे असेल तर तो व्यवहार समजुतीने पण तुमच्या हिताच्या दृष्टीने मिटेल. रविवार ते गुरुवार महत्त्वाचा पत्रव्यवहार, कुणाला भेटावयाचे असेल तर ती भेट, लॉटरी-रेसमध्ये उपयोगी पडेल असे काही तरी करा. नोकरीत या वेळी नवे धाडस करू नका. तुमचा जम बसायला अजून काही दिवस तरी वाट पहावी लागेल. बदली तहकूब होईल. विद्यार्थी-विद्यार्थिनींचा स्वभाव तर्कटी बनणार आहे. महिलांना शारीरिक त्रास कमी होईल. हाती पैसा राहील. नोकरीचा प्रश्न मार्गी लागेल.

## धनू : संसारात उणीव

या आठवड्यात रविसारखा एखादा ग्रह तुम्हाला जरी अनुकूल असला तरी शनि–मंगळ या सामर्थ्यवान ग्रहांच्या उपद्व्यापाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कारण शनि आठवा तब्येतीला काही तरी चिमटे घेत राहणार आहे तर मंगल संसारात अडचणी निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न करणार आहे. या वेळी तुम्ही पत्नीच्या तब्येतीला जास्त जपा. स्वतःच्या मनावर ताबा ठेवून वागा. अशक्तपणा, रक्तदाब, गॅसेस, पित्त, दमा असा ज्यांच्या स्त्रियांना आजार असेल त्यांनी विशेष काळजी घ्यावी. बाकी सर्वसामान्यपणे हा आठवडा प्रगतिकारक आहे. नोकरीत महत्त्वाचा बदल होईल किंवा नवीन कामाची जबाबदारी तुमच्यावर सोपवण्याच्या दृष्टीने काही नव्या योजना आखल्या जातील. चालू नोकरींत आता तुम्हाला कोणतीच भीति उरलेली नाही. बेकराना खूप प्रयत्नाने नोकरी मिळू शकेल. मात्र ती तात्पुरती असेल. शनिवारी महत्त्वाची घटना घडेल. रविवारी नवी ओळख होईल. मंगळवारी आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. लॉटरीचे तिकिट या दिवशी अवश्य घ्यावे. या आठवड्यांत लग्नाचा विचार लांबणीवर टाकणे उपयुक्त होईल. विद्यार्थी–विद्यार्थिनींनी प्रेमापासून दूर राहावे. महिलावर्गाने शेजारी आणि कुटुंबातील मंडळीबरोबर भांडण करू नये. नोकरीत यश मिळेल.


**मोफत ! मोफत ! मोफत !**

# पांढरे डाग

आमचे औषधाचा प्रभाव केवळ तीन दिवसातच पांढरे डागावर दिसू लागून त्याचा रंग बदलू लागतो. आमचे औषध अतिप्रभावी असून त्याचा एकवेळ अवश्य अनुभव घ्या. प्रचाराकरता, एक औषधाची कुपी ट्रायलकरता मोफत दिली जाते. रोगाचे सविस्तर वर्णनासहित संपर्क साधून त्वरित औषध मागवा.

**जवाहर चिकित्सा केन्द्र १०५**
**पोष्ट : कतरीसराय ( गया )**


## मकर : प्रगतीला वेग येईल

राहूकेतू आतां बदलत आहेत. ते गेल्यावर्षापेक्षा या वर्षी तुम्हाला अनुकूल आहेत. पाचवे व दहावे असे ते होणार आहेत. पण या वेळच्या तुमच्या प्रगतीची सूत्रें मंगळाच्या हाती आहेत. यावेळी कोणत्याही क्षेत्रांत तुम्हाला विरोध जाणवणार नाही. शिक्षण, उद्योग, व्यापार, कला यापैकी कोणत्याही क्षेत्रात विरोधक तुमच्याशी स्पर्धा करू शकणार नाहीत. आणि केलीच तर त्याला यश येणार नाही. रविवार, सोमवार व शुक्रवार हे दिवस विशेष महत्त्वाचे आहेत, आर्थिक क्षेत्रांत काही तरी महत्त्वाचे घडेल. लॉटरी, रेसमधे लाभ. व्यापारात नफा. खरेदी-विक्रीत फायदा. तुम्ही जर नवे वाहन खरेदी करायचे ठरवले किंवा ट्रान्स्पोर्टचा व्यवसाय सुरू करण्याचे ठरवले तर तुमची प्रगती वेगाने होईल. नोकरी कायम नसल्यास ती कायम होईल. प्रवासात महत्त्वाचे काम होईल. कृषिपदवीधरांना उद्योगांत अगर नोकरीत प्राधान्य मिळणार आहे. विद्यार्थी–विद्यार्थिनींना यशाचे नवे पैलू पहाता येतील खास मोठे यश पदरीं पडेल. महिलांचे सामर्थ्य वाढणार असून राजकारणांत त्यांची प्रतिष्ठा व दर्जा वाढणार आहे.

## कुंभ : मोठे यश मिळेल

आपली रास शनीची आहे. अंतरिक्षात शनीचे जेव्हा भ्रमण ज्या पद्धतीने चालू असेल त्या पद्धतीने हा शनी आपल्या राशीचा विकास घडवीत असतो. सध्या शनी तुम्हाला सहावा झाला आहे. तो तुमची उद्योगाची, नोकरीची परिस्थिती पार बदलून टाकणार आहे. या वेळी तुम्हाला चालू नोकरीत बदल करायचा असेल तर अवश्य करावा. त्यासाठी ज्या कुणाच्या गाठीभेटी तुम्हाला घ्यायच्या असतील त्यांच्या भेटीगाठी घ्या. तुमच्या व्यक्तिमत्त्वाला आकर्षक उठाव मिळणार असून तुमचे सामर्थ्य वाढणार आहे. जमीन खरेदी करणे अगर ती विकणे यासंबंधीचा व्यवहार फायद्याचा ठरेल. धंद्यासाठी तुम्हाला करारावर वा तारणावर पैसे मिळवायचे असतील तर ते काम तुमच्या फायद्याचे ठरेल. लोखंडी फर्निचर, पोलादाचा माल, खते, स्टेशनरी, औषधे, दगड, विटा, चुना अशा व्यापारात तसेच किराणामालात नुकसान भरून निघेल. चार पैसे फायदा मिळू शकेल. विद्यार्थ्यांनी शिकता शिकता काही उद्योग करायचा ठरवला तर त्यांचे हेतू पुरे होतील. सार्वजनिक कार्यकर्ते, राजकारणी लोक लोकांच्या कौतुकाचे ठरतील. परदेशी प्रवासाचे प्रयत्न करायला हरकत नाही. महिलांनी उद्योगधंद्यात स्वतःकडे मोठी जबाबदारी घ्यावी. ते काम त्या समर्थपणे पार पाडू शकतील.

## मीन : जागेच्या प्रश्नाची सोडवणूक

चौथा मंगळ आणि पाचवा शनी हे दोन वैभवसंपन्न सामर्थ्यशाली ग्रह तुमच्या पाठीशी उभे असताना तुम्ही चिंता का करता? चौथा मंगळ मानसिक अवस्था डळमळून टाकील हे खरे; पण राशीत गुरू आहे त्यामुळे तुमचा तोल जाणार नाही. कुणी कितीही अपमान करो, कोण कितीही वाईट बोलो, तुम्ही संयम पाळा व ते ऐकून घ्या. अशी माणसे पुन्हा लवकरच तुमच्या भजनी लागतील. तुम्हाला एखादी खोली मिळवायची असो की बंगला मिळवायचा असो तुम्हाला फार झिगझिग करावी लागत होती ती या आठवड्यात संपून तुमचे काम मनासारखे होईल. शेतकरी मंडळींना समाधान वाटावे असे या वेळी घडेल. पीक उत्तम येईल व मालाला उठावही येईल. मित्र, इष्टमित्र व नातेवाईक यांचेबरोबरचे संबंध सुधारतील. नोकरीच्या दृष्टीने हा आठवडा तसा वाईट नाही. पत्रकार, लेखक यांना स्वतःच्या बुद्धीचा प्रताप दाखवता येईल; पण वरिष्ठ अगर मालक यांच्या बरोबरचे मतभेद वाढवू नका. आरोग्याच्या दृष्टीने सुधारणा होईल. विद्यार्थी-विद्यार्थिनींना कलाकरमणूकक्षेत्रात नवी संधी उपलब्ध होईल. महिलांना दानधर्मात समाधान लाभेल. मंगलकार्यात पुढाकार मिळेल. ☐ ☐

# सुलभा देशपांडे

## ह्या असाच एक अपवाद आहे

**श्री.** महावीर अधिकारी ह्यांच्या 'तलाश' ह्या कादंबरीवर ललित मोहन चारुमिया 'जिंदगी और तूफान' नावाचा हिंदी चित्रपट निर्माण करीत असून ऑक्टोबरमधे हा चित्रपट प्रदर्शित होत आहे. ह्या हिंदी चित्रातील 'पेरिन' ही महत्त्वाची भूमिका मराठी रंगभूमीवरील सुविख्यात अभिनेत्री सुलभा देशपांडे करीत आहेत.

मराठी नाटकाच्या संदर्भात सुलभाताईंचे स्थान अपरिहार्य महत्त्वाचे आहे. हे स्थान सुलभाताईंनी आपल्या जबरदस्त अभिनयसामर्थ्याने प्राप्त करून घेतले आहे. खऱ्याखुऱ्या अर्थाने 'अभिनेत्री' असलेल्या ज्या काही मोजक्या स्त्री-कलावंत आहेत, त्यांत सुलभाताईंचा क्रम निर्विवादपणे खूप वरचा आहे. नाटचित्रक्षेत्रात 'नटचा' पुष्कळ आहेत; पण 'अभिनेत्री' अगदी विरळाच ! 'नटी'ला आवश्यक सुंदर चेहरा, आकर्षक बांधा नसूनही सुलभाताई श्रेष्ठ 'अभिनेत्री' आहेत !

'जिंदगी और तूफान'चे दिग्दर्शक उमेश माथूर 'पेरिन'च्या भूमिकेसाठी सुलभाताईंकडे 'ऑफर' घेऊन गेले तेव्हा खळखळून हसत सुलभाताईंनी माथुरांपुढे चक्क सवाल टाकला—'आपने मेरा थोबडा देखा है ? क्या यह ऐसा है जो फिल्मोंमें आ सके ?

ह्यातला विनोदाचा भाग बाजूला ठेवला तरी, रुपेरी पडद्यावर येण्यासाठी चेहरा आणि एकूणच शारीरिक सौंदर्य हे एक महत्त्वाचे क्वालिफिकेशन असते ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. किंबहुना, ही वस्तुस्थिती नियम म्हटली तरी फारसे बिघडणार नाही; पण नियमाला अपवाद हवाच— सुलभाताई ह्या असाच एक अपवाद !

सुलभाताईंच्या अभिनयात प्रेक्षकांच्या काळजापर्यंत जाऊन भिडण्याची असामान्य ताकद आहे हे त्यांच्या प्रेक्षकांना नव्याने सांगण्याची गरज नाही. मुद्राभिनयात त्या अतिशय वाकबगार आहेत. रुपेरी पडद्यावर त्यांच्या अभिनयाचे उन्मेष अधिक प्रकर्षाने आविष्कृत झालेले दिसतील. कारण नाटकापेक्षाही चित्रपटात विशेषतः मुद्राभिनयाची अधिक कसोटी असते. नाटकात मुद्राभिनयातले बारकावे प्रेक्षागारातल्या पहिल्या काही रांगांमधील प्रेक्षकांपर्यंतच पोहोचू शकतात. चित्रपटात मात्र क्लोजअप्मधे चेहेऱ्यावरची रेषान्–रेषा सर्वच प्रेक्षकांना अगदी स्पष्ट दिसते आणि म्हणूनच, चित्रपटातील अभिनय-मुद्राभिनय–हे एक आव्हान असते.

'शांतता, कोर्ट चालू आहे' ह्या नाटकावर त्याच नावाचा मराठी चित्रपट आला होता. त्यामधे सुलभाताई होत्या; पण एक तर तो चित्रपट मूळ नाटकापेक्षा फारसा काही वेगळा नव्हता आणि दुसरी गोष्ट म्हणजे मराठी आणि हिंदी सिनेमात बऱ्याच दृष्टींनी तसा प्रचंड फरक असतो. विशेषतः हिंदी सिनेस्टार्सच्या अवतीभोवती ग्लॅमरचे जे वलय असते, त्याच्या शतांशदेखील मराठी चित्रपटकलाकारांभोवती नसते. म्हणूनच, सुलभाताईंना हिंदी सिनेमात पहाणे हा एक आगळावेगळा अनुभव ठरावा. योगिताबाली, रेहाना सुलतान ह्या अलीकडे काही ना काही कारणाने चर्चाविषय ठरलेल्या नटचांबरोबर सुलभाताई ह्या चित्रपटात आहेत आणि सगळयात महत्त्वाचे म्हणजे उपरोक्त दोघींच्या व अन्य सर्वच स्त्रीभूमिकांपेक्षा सुलभाताईंचीच ह्या चित्रातली 'पेरिन' ही भूमिका सर्वाधिक महत्त्वपूर्ण आहे, मोठी आहे. वस्तुतः निर्मात्यांच्या डोळयांसमोर 'पेरिन' साठी वहिदा रेहमान, माला सिन्हा ही नावे होती. प्रत्यक्षात ती भूमिका दिली गेली सुलभाताईंना ! हे इथे स्पष्ट लिहिताना कोणाही 'बडचा' कलावंताबद्दल अनादर व्यक्त करण्याचा इरादा नाहीये, तर सुलभाताईंच्या अभिनयसामर्थ्याला निर्माता–लेखक ह्यांनी जी पावती दिली, त्या पावतीला ही पावती आहे !

अलीकडे सुलभाताईंची भेट झाली. 'जिंदगी और तूफान' संबंधी आणि त्यातल्या सुलभाताईंच्या भूमिकेविषयी गप्पा मारता आल्या. 'धर्मयुग' मधे दिग्दर्शक उमेश माथूर ह्यांनी लिहिलेल्या लेखातला 'आपने मेरा थोबडा देखा है ? क्या यह ऐसा है जो फिल्मोंमें आ सके ?' हा सुलभाताईंचा प्रश्न नुकतानुकताच डोळयांखालून गेल्याने डोक्यात रेंगाळत होता. साहजिकच मी त्यांना विचारलं—

—'सुलभाताई, तुम्ही दिग्दर्शक माथुरांजवळ ते 'थोबडा' वगैरे बोलला होतात ना ? मग त्या पिक्चरची ऑफर कशी स्वीकारली ?'

—'अरे तो रोल वाचल्यावर मला जाणवलं की 'पेरिन' सुंदर असण्याची आवश्यकता नव्हती–' सुलभाताई.

—'ते ठीक आहे; पण मला वाटतं की तुमच्या मते हिंदी चित्रपटांत 'अभिनय' ही चीज जवळजवळ नसतेच. तरीसुद्धा तुमच्यासारखी 'अभिनेत्री' हिंदी सिनेमात जाते म्हणजे–?'

—'हिंदी सिनेमात अभिनयाच्या बाबतीत एकूण आनंदच असतो असे मी म्हणते तेव्हा मला असं म्हणायचं असतं की हिंदी सिनेमांत स्त्रियांसाठी कॅरॅक्टर रोल्स अगदीच कमी आहेत. प्राणसारख्या एखाद्या पुरुष-कलाकाराला चरित्रभूमिका अलीकडे मिळताहेत; पण स्त्री-कलाकारांसाठी तशा भूमिका फारशा नाहीयेत. मी ह्या चित्रपटातली भूमिका स्वीकारली, ती खरोखरच चांगली भूमिका—चरित्रभूमिका–होती म्हणून. ह्या भूमिकेत अनेक भावछटा आहेत. इतक्या विविध छटा असलेला रोल मी ह्यापूर्वी पाहिला नव्हता. 'पेरिन' ही एकाच वेळी नायकाची आई आहे, पत्नी आहे…'

हो, हे खरंच ! सुलभाताई करतायेत ती 'पेरिन' म्हणजे साधीसुधी भूमिका नाही. विलक्षण आगळीवेगळी आणि उत्कट अशी ती व्यक्तिरेखा आहे. ह्या 'पेरिन'च्या मनात नायक टोनीबद्दल संमिश्र भावना आहेत. एकाच व्यक्तीबद्दल एकाच वेळी वात्सल्य आणि प्रीती अशा दोन पराकोटीच्या भावना असणे दुर्मिळ ! आणि त्या भावना एकाच वेळी, पण तरीही त्यांचे वेगळे अस्तित्व दाखवून सार्थपणे व्यक्त करणे, अभिनीत करणे हे खरोखरच येऱ्या गबाळयाचे काम नाही ! हे प्रचंड आव्हान स्वीकारण्यासाठी सुलभाताईंच्याच तोडीचं अभिनयसामर्थ्य हवे !

—'नाटकातला आणि सिनेमातला अभिनय ह्यांत काही फरक–अर्थात तुमच्या स्वतःच्याच संदर्भात–तुम्हाला वाटला का ?'

## मला माझ्या जगण्याचा अर्थ नाटकातून मिळतो...

–'नाटकात किंवा सिनेमात भूमिका करताना 'आतून' जर काही येत असेल, तर मला वाटतं की दोन्ही माध्यमांतला अभिनय सारखाच परिणामकारक, प्रभावी असू शकतो. नाटकाच्या संदर्भात बोलायचं झालं तर प्रेक्षकांचे डोळे हा कॅमेरा मानू या. प्रेक्षकांसमोर स्वतःला प्रोजेक्ट करताना अभिनयातले अनेक बारकावे प्रेक्षकांकडून दुर्लक्षित होतात. त्यामुळे काही गोष्टी बोल्ड, ठसठशीत करून दाखवाव्या लागतात–त्यासाठी मुव्हमेंट्स्, जेस्चर्स ह्यांचा आधार घ्यावा लागतो. उलट चित्रपटात, कलाकाराचा एखादा दृष्टिक्षेपही क्लोजअप्ने वगैरे प्रेक्षकांपर्यंत पोहोचू शकतो आणि त्या विशिष्ट दृष्टिक्षेपातून ती विशिष्ट भावना अभिव्यक्त करता येते; पण म्हणूनच, चित्रपटातील अभिनयाच्या वेळी अशी अगदी बारीकसारीक बाबही चांगली पारखून घ्यावी लागते. पडद्यावर 'पाठ'सुद्धा बोलू शकते. नाटकात, एखादी गोष्ट यथार्थपणे प्रेक्षकांच्या मनावर बिंबवण्यासाठी मघा सांगितलेल्या इतर एक्स्टीरिअर्सची (exteriors) गरज लागते, ती सिनेमात मात्र फारशी लागत नाही.' सुलभाताई.

–'बरं, आता असं सांगा की मोठ्या, खूप नाववाल्या नट्या वगळून तुम्हाला भूमिका दिली खरी–पण तुम्ही भूमिका स्वीकारल्यावर निर्मात्यांची वगैरे प्रतिक्रिया काय होती ?' माझा प्रश्न.

–'निर्माते आदि मंडळी प्रथम थोडीफार साशंक होतीच; पण माझा पहिला शॉट झाल्यावर त्यांच्या मनातला किंतू नाहीसा झाला. निर्माता-लेखक हे माझ्या कामावर खूष झाले. तुला सांगते, मुळात 'पेरिन'चा रोल जेवढा काही होता, तेवढ्याचे चित्रीकरण झाल्यावर तो 'रोल' पुन्हा वाढवला ! माझी 'पेरिन' त्या सगळ्यांच्या पसंतीला उतरलेली आहे–' सुलभाताई.

–'तुमच्या भूमिकेबद्दल तुमची स्वतःची भावना काय सांगाल ?–' मी.

–'एवढंच सांगते की चित्रपटमाध्यमाची चांगली माहिती असती, तर मी 'पेरिन' अधिक चांगली करू शकले असते–' सुलभाताई.

–'हिंदी सिनेमातल्या तुमच्या ह्या पहिल्याच भूमिकेबद्दल प्रेक्षकांची काय प्रतिक्रिया असेल असा तुमचा कयास आहे ?–' मी.

–'ते मी कसं सांगणार ? ह्या सिनेमातल्या माझ्या कामाबद्दल प्रेक्षकांची मते बनण्यासाठी तो सिनेमा चांगला चालायला हवा, नाही का ?–' सुलभाताई.

–'ह्या चित्रपटात काम करताना तुमचा काही विशिष्ट हेतू होता का ? म्हणजे अर्थप्राप्ती वगैरे–' मी.

–'केवळ रोल चांगला होता, मला तो आवडला होता म्हणून मी तो स्वीकारला. तू म्हणतोय्स तो आर्थिक दृष्टिकोण मुळीच नव्हता. तुला सांगायला हरकत नाही, मी ह्या सिनेमात टॅक्सीफेअरवर काम केलंय–' सुलभाताई.

–'म्हणजे निर्मात्याला हा व्यवहार फायद्याचाच पडला ! 'नाववाली नटी' न घेतल्याने लाखांच्या पटीत पैसा तर वाचलाच आणि त्याचबरोबर भूमिकेला यथायोग्य न्याय देणारी 'अभिनेत्री'सुद्धा मिळाली ! अवघ्या टॅक्सीभाड्यावर ह्या सिनेमात काम करण्यामागे कदाचित तुमचा दूरगामी हेतू असेल. म्हणजे असं की ह्या सिनेमाच्या निमित्ताने हिंदी सिनेसृष्टीत एकदा चंचुप्रवेश झाला की पुढे पुष्कळ चित्रपट मिळतील, त्यातून पैसा मिळेल...' मी.

–'तू म्हणतोय्स ते अगदीच काही असंभवनीय नाहीये. कदाचित माझा हा रोल पाहून, आईच्या–बहिणीच्या भूमिकांच्या मला ऑफर्स येतीलही–' सुलभाताई.

—'त्यातून पैसाही मिळेल; पण हिंदी सिनेमांतल्या त्याच त्याच शिळ्या – शिळ्या आणि गुळगुळीत भूमिका करताना तुम्हाला समाधान वाटेल का ?"— मी.

—'अरे, पण त्यातून मिळालेले पैसे मी माझ्या आवडीच्या क्षेत्रात खर्च करू शकणार नाही का ? डॉक्टर लागूंनी 'पोंगा पंडित' ह्या सिनेमात अलीकडे काम केलंय त्यामागे त्यांचा हेतू हाच होता. जो पैसा मिळेल तो आपल्या आवडीच्या कार्यासाठी खर्च करायचा. मला बालनाट्यांसाठी पैसे हवे आहेत. ते पैसे जर मी सिनेमात काम करून मिळवू शकले, तर मला हवेच आहेत—'

—'पण सुखाच्या संसारातून वेळ काढून तुम्ही सिनेमात काम करणार, पैसे मिळवणार आणि पुन्हा संसारातून वेळ काढून लहान मुलांसाठी नाटकं बसवणार, त्यासाठीच ते पैसे खर्च करणार. ह्यातून तुम्हाला स्वतःला काय मिळणार ? ह्या परमार्थातून तुम्ही काय साधणार आहात ?—' मी.

—'मला माझ्या जगण्याचा अर्थ नाटकातून मिळतो. चिल्ड्रन थिएटर हे माझं सर्वांत आवडीचं क्षेत्र आहे. नुसतं दोन वेळा जेवण करणं म्हणजे जीवन नाही ! नाटक, चिल्ड्रन थिएटर ह्यांमुळे माझ्या जीवनाला निश्चित अर्थ लाभत असतो असे मला प्रामाणिकपणे वाटतं...' सुलभाताई.

...छबिलदास शाळेतल्या एका वर्गात आम्ही बसलेले असतो. शेजारच्या हॉलमधे लहान मुलांच्या नाट्यशिक्षणाचा वर्ग चालू असतो. इतर बरेच व्याप पाठीशी असतानाही 'आविष्कार'चे लहान मुलांसाठी नाट्यशिक्षणवर्ग सुलभाताई नियमितपणे घेत असतात. अंगीकारलेल्या ह्या कार्यात आडकाठी येऊ नये म्हणून सुलभाताईंनी अलीकडेच दोन नव्या व्यावसायिक नाटकांतल्या भूमिका नाकारल्या आहेत...

स्वतःचा स्वार्थ सोडून परमार्थ साधताना जीवनाचा अर्थ सुलभाताईंना सापडतो ! सुलभाताईंमधला हा 'तपस्विनी कलाकार' माझ्या मनातले आपले स्थान अधिकाधिक अढळ करत जात आहे... !

–सुभाष सोनवणे


## ॥ पॅपिलॉन ॥

## ॥ पॅपिलॉन ॥

॥ प्रसिद्धी ५ ऑक्टोबर ॥ पंचवीस रुपये ॥

पॅपिलॉन योजनेच्या सभासदांना मात्र फक्त पाच रुपयात.

योजना : पृष्ठ ३ वर....